पुणे, रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 88 • वर्ष ४ थे, अंक ८८ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




P३



दुबईच्या मैदानावर टीम इंडिया अजिंक्य १२

# अमित शहांनी वाचला विकासाचा पाढा

## ठाकरे-पवारांना कान पिचक्या

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुणे शहरांमध्ये तीन भरगच्च कार्यक्रमांमध्ये मोदी यांच्या सरकारच्या अनेक पराक्रमांचा पाढा वाचला, तर राजकीय भाषा करत असताना त्यांनी खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी हे कोणाचे आहे हे जनतेने स्पष्ट केले असे सांगत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना कान पिच्क्या देखील घेतल्या. जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शहा यांनी बँकिंगच्या कामगिरीचा आढावा घेतला तर बालेवाडी स्टेडियम मध्ये घरकुलाचे लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप केले.

या कार्यक्रमांमध्ये त्यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पुण्यात देशातील विकासकामांचा पाढा वाचला. ७ कोटी घर, मोफत सिलिंडर, धान्य, रेल्वे स्टेशन आणि मेट्रो सेवांची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली. यावेळी अमित शहा यांनी उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. पुणे दौऱ्यावर असलेल्या अमित शहा यांच्या हस्ते महाआवस योजनेच्या पुस्तिकेचं प्रकाशन करण्यात आलं. महाआवास अभियान पोस्टर प्रकाशन करण्यात आलं. यावेळी लाभार्थींना मंजुरी पत्रक देण्यात आलं. अमित शहा यांच्या हस्ते पत्रक देण्यात आलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं.

शहा यावेळी म्हणाले की , एका वेळी २० लाख लाभार्थ्यांना घरे देण्यात आली आहेत. अनेकदा सरकारने आश्वासन दिल्यानंतर पूर्ण व्हायला वेळ लागतो, पण मुख्यमंत्र्यांच्या टीमने काम केलं. » पान ४ वर



पुणे — पुण्यातील जनता सहकारी बँकेचा अमृत महोत्सव सांगता सोहळा केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते

# भारतीयत्व हाच धागा !

## साहित्य संमेलनात रंगला मराठी - अमराठीचा मनमोकळा संवाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** माणसाची जडण-घडण, भाषा, संस्कृती भिन्न असली तरी माणूस आतून एकच असतो. प्रेम कधीही, कुठेही होऊ शकते, त्याला कशाचाच अडसर नसतो. समान भारतीय धागा जुळल्यानंतर प्रांत आणि भाषेचा अडथळा ओलांडून संसार आणि परिवार आनंदी होतो. भाषेचा सातत्याने व सतर्कतेने वापर झाल्यास ती आपोआप आत्मसाद होते आणि तिचे संस्कार रुजत जातात, असा सूर 'मनमोकळा संवाद-मराठीचा अमराठी संसार' या परिसंवादात उमटला.

अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे सरहद, पुणे-दिल्ली आयोजित ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात या आगळ्या-वेगळ्या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यशवंतराव चव्हाण सभागृहातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे मंचावर या दिलखुलास मनमोकळ्या गप्पा रंगल्या.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे-डॉ. साधना शंकर, राजदीप सरदेसाई, सागरिका घोष, रेखा रायकर-मनोजकुमार, डॉ. मंजिरी वैद्य-प्रसन्ना अय्यर यांचा सहभाग होता. अस्मिता पांडे आणि बाळ कुलकर्णी यांनी त्यांना हलके-फुलके प्रश्न विचारून बोलते केले. आमदार डॉ. विश्वजित कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजदीप सरदेसाई यांनी आपल्या मिश्किल शैलीत पत्नी सागरीका घोष यांच्याबरोबर झालेल्या पहिल्या भेटीची आठवण सांगत ओळख करून दिली.

डॉ. ज्ञानेश्वर मुळे म्हणाले, माझ्या फक्त मराठी बोलणाऱ्या आईशी तिचे अनुबंध जुळले होते. नोकरीच्या निमित्ताने देश-परदेशात वास्तव्य असल्याने » पान ४ वर



# केंद्रीय मंत्र्याला विमानातली मोडकी सीट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिल्ली :** आपल्या गैरवस्थापनामुळे सातत्याने चर्चेत असणाऱ्या एअर इंडिया चा फटका आज केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चव्हाण यांना बसला भोपाळ ते दिल्ली या प्रवासात त्यांना चक्क विमानात मोडक्या खुर्ची वरून प्रवास करावा लागला. केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हे एका कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी भोपाळहून दिल्लीला जात होते. यावेळी एअर इंडियाच्या विमानात त्यांना वाईट अनुभव आला.

यादरम्यान एका सहप्रवाशाने



त्यांना त्याची जागा देऊ केली. पण आपल्यामुळे त्याला का त्रास असा विचार करत शिवराज सिंह चौहान यांनी तुटलेल्या खुर्चीवरूनच प्रवास पूर्ण केला. त्यानंतर सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून त्यांनी हा अनुभव शेअर केला. आपल्याला मोडकी खुर्ची का देण्यात आली आहे असं त्यांनी विमानातील कर्मचाऱ्यांना विचारलं. तर याबाबत व्यवस्थापनाला सांगितलं होतं आणि त्यासाठी तिकीट » पान ४ वर

# सुरेश धस पुन्हा फ्रंट फुटवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मसाजोग :** भाजपचे आमदार सुरेश धस यांनी आज मसाजोग येथे भेट घेऊन आपल्या नेतृत्वाबद्दल कमबॅक करण्याचा प्रयत्न केला. दोन दिवसापूर्वी सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीबद्दल स्पोर्ट झाल्यानंतर सुरेश धस हे काहीसे बॅकफूट वर गेले होते .

मनोज जरांगे यांच्यासह अनेकांनी त्यांच्यावर आरोप केले होते . तसेच त्यांचे कडे असलेले मराठा समाजाचे नेतेपद बदनाम व्हावे यासाठी प्रयत्न केले जात होते .

परंतु आज सुरेश धस यांनी पुन्हा



एकदा आक्रमक होत थेट मसाजोग येथे जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली . त्यावेळी संपूर्ण गावकऱ्यांनी हात वर करून सुरेश धस यांच्यावर आमचा विश्वास असल्याचे स्पष्ट केले.

मनोज जरांगे यांनी यावर आजही टीका केली असून धस हे आता प्रामाणिक राहिलेले नाहीत आणि त्यामुळे त्यांच्यावर विश्वासहार्यता नाही असे विधान केले आहे. धस यांनी भेटीगाठी घेण्यापेक्षा थेट राजीनामा देऊन मैदानात उतरायला हवे होते असे सांगितले.

दरम्यान सुरेश धस यांना आज परळी मध्ये धक्काबुक्की झाली तसेच त्यांच्या गाडीवर दगडफेक झाली परंतु मस्साजोग येथे गेल्यानंतर मात्र संपूर्ण गावकऱ्यांनी त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आणि त्यांच्या नेतृत्वाला एक वाक्यता दिली.

संतोष देशमुख यांच्या बंधूनी देखील आज धस यांना समर्थन दिले . धस कुणाला भेटतात किंवा नाही यावर आमचे देणे घेणे नाही . शेवटच्या व्यक्तीला फाशी होण्यापर्यंत ते आमच्या संघर्षात सोबत आहेत यावर आमचा विश्वास आहे असे देशमुख यांनी सांगितले.

# 'मनसे' ला महायुतीत घेणे योग्य नाही- आठवले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भेटले ते ठिक आहे, मात्र ठाकरे यांना महायुतीत घेणे बरोबर नाही. त्यांचा महायुतीला काही फायदा होत नाही. आताच आम्हाला सत्तेत हिस्सा मिळत नाही. ठाकरे आले तर काय मिळणार? असा सवाल करून केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी राज ठाकरे यांना महायुतीत घेण्यास विरोध केला. तसेच महायुतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या



निवडणुका एकत्रित लढण्याची मागणीही त्यांनी केली.

चिंचवड, अजंठानगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गतच्या (एसआरए) तिसऱ्या टप्प्यातील इमारतीच्या कामाचे भूमिपूजन आठवले यांच्या हस्ते शनिवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार अण्णा बनसोडे, रिपाईंचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, माजी नगरसेविका चंद्रकांता » पान ४ वर

### वाळू खाली गाडली गेल्याने पाच मजुरांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** जिल्ह्यात भीषण दुर्घटना घडली आहे. जाफराबाद तालुक्यातील पासोडी येथे पुलाच्या कामावर गेलेल्या ५ मजुरांचा वाळूच्या ढिगाऱ्यात दबून मृत्यू झाला आहे. शनिवारी (22 फेब्रुवारी) पहाटे साडेचार वाजता ही घटना घडली. मजुरांच्या पत्र्याच्या शेडवर वाळूचा टिप्पर रिचवल्याने ७ कामगार रेतीखाली दबले गेले. रेतीत गुदमरून पाच जणांचा मृत्यू झाला असून दोन जणांना वाचवण्यात » पान ४ वर

### नवनीत राणा यांना हैदराबादच समन्स

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैद्राबाद :** भाजप नेत्या नवनीत राणा यांनी एमआयएम पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांना दिलेल्या चॅलेंज प्रकरणी राणा यांच्या अडचणीत अधिक वाढ होण्याची शक्यता आहे. हैदराबादला जाऊन नवनीत राणा यांनी खासदार ओवेसीं जाहीर आव्हान देत केलेल्या वक्तव्याप्रकरणी हैदराबाद न्यायालयाने नवनीत » पान ४ वर

### पुण्यातील ३ पर्यटकांचा तारकर्ली समुद्रात मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली इथं पर्यटनासाठी गेलेले पुण्यातील पाच पर्यटक इथल्या समुद्रात बुडाल्याचं वृत्त आहे. यांपैकी दोन जणांचा मृत्यू झाला असून तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. हे पाचही जण पुण्यातील हडपसर भागातील रहिवासी आहेत.

## सामान्य कार्यकर्त्यांची भेट

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



पुणे: भाजपा कार्यकर्ता देवेंद्र जोग याला झालेल्या मारहाणीनंतर आज पुण्यात आल्यानंतर ना. मुरलीधर मोहोळ यांनी या कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन त्याची विचारपूस केली.

# विरोधकांच्या गावांना निधी नाही

## मंत्री राणे यांचा धाडसी निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कणकवली :** उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकारी आणि नेते असलेल्या गावांना अजिबात विकासाचा निधी देणार नाही . कोणाला कुठे तक्रार करायचे असेल ते करू द्या , असे जाहीरपणे सांगत मंत्री नितेश राणे यांनी कोकणातील उबाठा संपवून टाकण्याचे सुतो वाच केले.

नितेश राणे यांनी आज पक्ष कार्यकर्त्यांचे बोलताना सांगितले की , अनेकदा सांगूनही ठाकरे शी काडीमोड न घेता आमच्या पक्षाच्या विरोधामध्ये काम केली.

विकासाचा निधी मिळणार नाही . योजना अपूर्ण राहतील. कर्जे प्रलंबित राहतील. इतके सांगून



देखील त्यांनी ऐकले नाही. त्यामुळे अशा अनेक विरोधकांना आता जागा दाखवण्याची गरज आहे.

आता पुन्हा आमचे सत्ता आली म्हणून तिकडची घाण इकडे आम्ही घेणार नाही. अनेकांना तिकडेच राहुद्या . देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा कंठ केला . त्यांचे फोन कॉल वायरल केले . त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला.

वेळ आली तर मी पक्षश्रेष्ठींच्या शिव्या खाईल परंतु आता या विरोधकांच्या गावांना निधी देणार नाही . माझा पक्ष मी वाढवूनच दाखवेन असे राणे यांनी सांगितले.

### पिंपरीतही 'आरओ' प्रकल्पासाठी कडक नियमावली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) रूग्ण आढळलेल्या भागातील ५८ खासगी पाणी (आरओ) प्रकल्प लाखबंद (सील) केल्यानंतर आता 'आरओ' प्रकल्पांसाठी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. प्रकल्प सुरू करण्यापूर्वी महापालिकेकडे नोंदणी करावी, संबंधित प्रकल्पातील पाण्याची वारंवार तपासणी करण्याच्या बंधनासह विविध अटी, शर्ती घातल्या आहेत. याबाबतचा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी प्रसृत केला आहे. शहरातील विविध भागात आतापर्यंत ३२ 'जीबीएस'चे रूग्ण आढळले आहेत. यामधील २३ रूग्ण उपचार घेऊन » पान ४ वर

# कादंबरीवरच कथानक तरीही माफी

## उतेकर यांनी वादावर पडदा टाकण्याचा केला प्रयत्न

**चित्रपट**

'छावा'चित्रपट वादात

**'छावा' चित्रपट हा पैसे कमवण्यासाठी केलेला नसून संभाजीराजांचे खरे चरित्र लोकांसमोर आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे असे सांगत हे कथानक पूर्णतः कादंबरीवरच आधारित आहे, तरी देखील तुमच्या भावना दुखावले असेल तर माफी मागतो असे स्पष्टीकरण दिग्दर्शक आणि निर्माते लक्ष्मण उतेकर यांनी दिले आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काल शिर्के कुटुंबच्या वतीने भूषण शिर्के यांनी पत्रकार परिषद घेऊन उतेकर यांचा निषेध केला आणि आंदोलनाची भाषा केली. त्यावर उतेकर यांनी आज त्यांना दूरध्वनी करून हा चित्रपट संपूर्णतः कादंबरीवरच आधारित आहे. चित्रपटाच्या सुरुवातीलाच आम्ही एक स्पष्टीकरण दिले आहे. आजपर्यंत ज्या ज्या मालिका झाल्या, मराठी चित्रपट झाले त्यात जे संदर्भ आहे तेच या चित्रपटात आहेत. त्यापेक्षा वेगळी काहीही नाही.

तरी देखील आम्ही शिर्के हे नाव देखील याच्यामध्ये वापरलेले नाही.




केवळ तिथे अंगुली निर्देश करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी आपली जर भावना दुखावले असेल तर मी माफी मागतो असे त्यांनी सांगितले.

पैसे कमवण्यासाठी हा उद्योग करत असल्याचे शिर्के यांनी म्हटले होते , त्यावर मात्र प्रतिउत्तर देताना उतेकर यांनी हा सगळा खटाटो पैसे कमवण्यासाठी केलेला नसल्याने सांगितले पैसे कमवण्यासाठी माझ्याकडे अनेक मार्ग आहेत. त्यासाठी मी एवढी रिस्क का घेऊ ? असेही त्यांनी सांगितले.

> संभाजी महाराज यांच्या चारित्र्यावर अनेक प्रकारे गालबोट लागण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे तो पुसावा आणि खरे चरित्र लोकांसमोर यावे यासाठी मी हा प्रयत्न केला "
> **— भूषण शिर्के**

#रा



## शिवणे परिसरात सोसायटी महासंघाची स्थापना

**खडकवासला :** शिवणे, उत्तमनगर, कोपरे, कोंढवे धावडे परिसरातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या एकत्रित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आणि रहिवाशांच्या हितासाठी सोसायटी महासंघाची स्थापना करण्यात आली आहे. या महासंघाच्या माध्यमातून परिसरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, सुरक्षा, वाहतूक समस्या, रस्त्यांची दुरावस्था, पार्किंगच्या समस्या आदी विषयांवर एकत्रितपणे काम केले जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिवशी सोसायटी महासंघाच्या उद्‌घाटन सोहळ्यास अनेक सोसायट्यांचे अध्यक्ष, सदस्य आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी महासंघाच्या अध्यक्षपदी नवनाथ नलावडे, उपाध्यक्षपदी राकेश सर्जेराव, सचिव प्रविण लांडगे, कार्याध्यक्षपदी सुनिल वरघुडे यांना बहुमताने नियुक्त करण्यात आले आहे. कार्यकारणी मध्ये सदस्यपदी सलिम शेख, धनंजय दंडवते, प्रशांत देशमुख, तुळशीदास नांदगावकर, अशोक मोरे, सतीश पटवारी, गंगाधर कुऱ्हाडे यांची नेमणूक करण्यात आली आहे.



## सांगरुणच्या सिंहगड विद्यालयात भरला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**खडकवासला :** सांगरुण येथील सिंहगड विद्यालयात सन २००८-०९ इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचा १५ वर्षांनी एकत्र येत स्नेहमेळावा उत्साहात पार पाडला.या मेळाव्यास ८० टक्के विद्यार्थी उपस्थित होते.१५ वर्षांनंतर आपल्या शालेय सवंगड्यांची भेट झाल्याने सर्वामध्ये उत्साहाचे वातावरण होते.सर्वानी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.या बॅचचे ज्येष्ठ शिक्षक महादेव गिरवले व धनजंय बर्डे यांनी त्या वेळेच्या जुन्या विविध आठवणी सांगताना विद्यार्थी भावुक झाले होते.त्या वेळेच्या प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षकांनी आम्हाला दिलेले ज्ञान,तसेच आचार व विचार आजही सार्वजनिक जीवनात उपयुक्त ठरत आहे.अशा भावना अनेक माजी विद्यार्थी व्यक्त केल्या.सिंहगड विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.डी. काळेल,महादेव गिरवले,धनजंय बर्डे,फुंदे व त्यांच्यासह विद्यालयातील शिक्षकवृंद,सेवकवृंद यांचा विद्यार्थ्यांनी यथोचित सत्कार केला.विद्यालयात माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेमार्फत विविध चांगले उपक्रम राबवावे,असे आवाहन मुख्याध्यापक जे.डी.काळेल यांनी केले.



**शुक्रवारी (दि.२१) रोजी मुक्तांगण बालरंजन सभागृहात सायंकाळी ५ वाजता साहित्यिक बबन पोतदार यांचे कथाकथन अतिशय उत्साहात पार पडले, या कार्यक्रमास रसिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.**

## कर्वे रस्त्यावरील अपघातात दुचाकीस्वार ठार

**पुणे :** कर्वे रस्त्यावर वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी वाहनचालकाविरुद्ध डेक्कन पोलिसांनी गुन्हा दाखल केला.



केशव बाबुराव मुंगे (वय ५१, रा. कुदळे पाटील आंगण, वडगाव बुद्रुक) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस शिपाई मुक्ता घोटे यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकीस्वार मुंगे हे १३ फेब्रुवारी रोजी सकाळी पावणेआठच्या सुमारास कर्वे रस्त्यावरील स्वातंत्र्य चौकातून निघाले होते. त्या वेळी भरधाव वाहनाने दुचाकीस्वार मुंगे यांना धडक दिली. अपघातात मुंगे गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान त्यांचा रुग्णालयात मृत्यू झाला. त्यानंतर याप्रकरणी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कुलकर्णी तपास करत आहेत.

# उद्रेक मराठा समाजाचा



पुणे — **आंदोलन :** येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन जवळपास ७० दिवसांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र या प्रकरणातील फरार आरोपींना अटक करण्यात यावी,या मागणीसाठी मराठा समाजाच्या नेत्यांनी शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कार्यक्रम स्थळी संतप्त प्रतिक्रीयेने निषेध केला.

## मराठा समाजाच्या नेत्यांना नाकारली केंद्रिय गृहमंत्र्यांची भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या होऊन जवळपास ७० दिवसांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र या प्रकरणातील फरार आरोपींना अटक करण्यात यावी,या मागणीसाठी राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे.

या सर्व घडामोडी दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली कोरेगाव पार्क येथील वेस्टिन हॉटेलमध्ये २७वी पश्चिम विभागीय परिषदेच्या बैठकीला सुरुवात झाली आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अधिकारी उपस्थित आहेत.

त्याच दरम्यान पुण्यातील मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक सचिन आडेकर आणि रेखा कोंडे आले होते. मात्र त्यांना भेट नाकारण्यात आली. त्यामुळे सचिन आडेकर आणि रेखा कोंडे हे आक्रमक झाल्याने पोलिसांनी त्या दोघांना ताब्यात घेतले.

बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी वाल्मिक कराड यांच्यासह अन्य आरोपींना कारागृहात व्हीआयपी ट्रीटमेंट दिली जात आहे.

# दहा दिवसात २५ टाक्या ‘चकाचक’

## उर्वरीत टाक्यांची स्वछता लवकरच; महापालिकेचा महत्वपूर्ण निर्णय

‘टाक्या स्वच्छ करणे कठीण काम’ शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या महापालिकेच्या टाक्या स्वच्छ करण्याचे काम ‘जीबीएस’च्या पार्श्वभूमीवर घेतले आहे. टाक्यांच्या स्वच्छतेबाबत अधिकाऱ्यांनी सांगितले, की या टाक्यांचा आकार खूप मोठा असतो आणि धरणातून पाणी येते, तेव्हा त्याबरोबर गाळ, पाण्याबरोबर वाहून आलेली वाळूही अनेकदा वाहून येते. विविध भागांना पाणीपुरवठा करणाऱ्या या टाक्यांमध्ये दररोज चार वेळा पाणी भरले जाते आणि पुढे ते सोडले जाते. त्यामुळे या टाक्या फारशा अस्वच्छ नसतात. टाक्या स्वच्छ करण्यासाठी कुठलेही रसायन वापरले जात नाही, असे अधिकाऱ्याने स्पष्ट केले. मात्र, या टाक्या नेमक्या किती काळाने स्वच्छ करण्यात येतात, यावर त्यांनी काही भाष्य केले नाही.

### Analytical

शहरातील ‘ईएसआर’ (उन्नत पाण्याच्या टाक्या) आणि ‘जीएसआर’ (भूमिगत पाण्याच्या टाक्या) स्वच्छ केल्या जाणार आहेत. त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.शहरात महापालिकेच्या सुमारे १५५ टाक्या आहेत. त्या टाक्यांची स्वच्छता महिनाभरात करण्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने निश्चित केले आहे. त्यानुसार गेल्या दहा दिवसांमध्ये २५ टाक्यांची स्वच्छता प्रशासनाने पूर्ण केली आहे.

**-नंदकिशोर जगताप,** प्रमुख पाणीपुरवठा विभाग, पुणे मनपा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात वाढत असलेल्या ‘गुइलेन बॅरे सिंड्रोम’च्या (जीबीएस) रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने गेल्या दहा दिवसांमध्ये २५ टाक्यांची स्वच्छता केली आहे. तसेच, उर्वरित टाक्यांची स्वच्छतादेखील पुढील काही दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन पाणीपुरवठा विभागाने केले आहे. ‘जीबीएस’च्या पार्श्वभूमीवर महापालिकेने शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांची स्वच्छता करण्याचा निर्णय घेतला होता.

सिंहगड रस्त्यावरील खडकवासला, नांदोशी, नांदेड तसेच किरकिटवाडी या भागात ‘जीबीएस’चे संशयित रुग्ण मोठ्या संख्येने आढळत असल्याचे समोर आले होते. या भागातील नागरिकांना दिले जाणारे पाणी दूषित असल्याने हे रुग्ण वाढत असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे महापालिकेने आवश्यक त्या उपाययोजना करण्यास सुरुवात केली **आहे.**

**टाक्यांची स्वच्छता का?**

‘जीबीएस’ आजाराला कारणीभूत असलेले जीवाणू ‘जीबीएस’चा हॉटस्पॉट असलेल्या भागातील वेगवेगळया ठिकाणच्या पाण्याच्या नमुन्यांत सापडले आहेत. मात्र, त्याचा नेमका स्रोत अद्यापही महापालिकेला सापडलेला नाही. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून महापालिकेकडून या साथीला अटकाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय केले जात आहेत. याच उपायांचा एक भाग म्हणून महापालिका प्रशासनाने टाक्यांच्या स्वच्छतेचा हा निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी याबाबतचे आदेश दिले होते.

### अशी होते टाक्यांची स्वच्छता

- * पाणीपुरवठा बंद ठेवून या टाक्यांची स्वच्छता
- * स्वच्छता करताना त्यामध्ये साठलेला गाळ, पाण्याबरोबर वाहून आलेली वाळू काढून टाकी स्वच्छ करण्यात येते
- * जमा झालेला गाळ पूर्ण स्वच्छ करुन टाक्यांची स्वच्छता
- * ज्या दिवशी पाणी बंद त्याच दिवशी स्वछतेला प्राधान्य
- * अन्य भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम नाही

### ‘आरओ’ प्रकल्पांची सोमवारपासून पाहणी

शहरातील नागरिकांना ज्या खासगी पाणी शुद्धीकरण प्रकल्पातून (आरओ प्लांट) मधून पाणी दिले जाते. ते पाणी पिण्यास योग्य नसल्याचा अहवाल आल्यानंतर पालिकेने त्या आरओ प्लांटला टाळे ठोकले होते. मात्र, त्यातील अनेक प्रकल्प पुन्हा सुरू झाल्याच्या तक्रारी महापालिकेकडे आल्या आहेत. हा प्रकार म्हणजे नागरिकांच्या जिवाशी खेळ असल्याचे समोर आल्याने महापालिकेने या प्रकल्पचालकांवर गुन्हे दाखल करण्याचा विचार सुरू केला आहे. सोमवारपासून (२४ फेब्रुवारी) आरओ प्लांटची तपासणी सुरू केली जाणार आहे. त्याच्या सर्व सूचना पाणीपुरवठा विभागातील कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत.

# बांधकाम व्यवसायिकांचे प्रदूषण ‘हवेत’..!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील प्रदूषणाचे प्रमाण वाढत असून त्याच्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर भीषण परिणाम होत आहे; त्याची गंभीर दखल घेत महापालिका प्रशासनाने शहरातील तब्बल २०८ बांधकाम व्यवसायिकांना नोटीसा बजाविल्या होत्या. मात्र; त्यातील अवघ्या पन्नास व्यवसायिकांनी ही स्थगिती उठविण्याची विनंती प्रशासनाकडे केली असून उर्वरीत व्यवसायिकांनी चक्क या नोटीसींनाच ‘केराची टोपली’ दाखविली आहे. त्यामुळे या बांधकामांचे प्रदूषण ‘हवेत’ मिश्रीत होत आहे, त्याचा गंभीर परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

बांधकामाच्या ठिकाणी धुळीचे प्रदूषण होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना न केल्याने शहरातील २०८ बांधकाम प्रकल्पांना नोटीस बजावित महापालिकेच्या बांधकाम विभागाने त्यांचे काम थांबविले होते. मात्र, दीड महिन्यानंतर यातील केवळ ५० बांधकामांनी उपाययोजना करत स्थगिती उठविण्याची विनंती महापालिकेकडे केली आहे.उर्वरित प्रकल्पांची कामे नक्की बंद आहेत की नाही, याची कोणतीही माहिती महापालिकेकडे नसल्याचे चित्र आहे. या प्रकल्पांचे सध्या काय चालले आहे, याचीच कुणाला माहिती नसल्याचे चित्र आहे.

शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे धुळीचे प्रदूषण वाढत आहे. धुळीचे प्रदूषण होऊ नये, यासाठी महापालिकेल्या बांधकाम विभागाने याची नियमावली तयार केली असून, त्याचे पालन करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

- असा होतो आरोग्यावर परिणाम
- * श्वसनाचा आणि सर्दीचा त्रास
- * लहान मुलांसह ज्येष्ठांना दम्याचा आजार
- * गर्भवती स्रिया आणि अन्य महिलांनाही खोकल्याचा त्रास
- * ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना चालताना धाप लागणे
- * सर्वच घटकातील नागरिकांना थंडी आणि तापाचा आजार

धुळीचे प्रदूषण केल्याप्रकरणी बांधकाम विभागाने २०८ प्रकल्पाचे बांधकाम थांबिवण्याच्या नोटीस दिल्या होत्या. यापैकी सुमारे ४० ते ५० प्रकल्पांनी उपाययोजना केल्या आहेत. त्यांना बांधकाम करण्यास पुन्हा परवानगी दिली आहे. उर्वरित बांधकाम प्रकल्पांनी उपाययोजना केल्या की नाही? याचा अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

**— राजेश बनकर, अधीक्षक अभियंता, बांधकाम विभाग**

# सिंहगड किल्ल्यावर ‘एनएसएस’ तर्फे साफसफाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आरएमडी सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट कॅम्पस, वारजे यांच्या एनएसएस विभागाच्या वतीने सिंहगड किल्ल्यावर गड स्वच्छता व पुनर्स्थापना मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात एनएसएस स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

ही मोहीम एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.ज्ञानेश्वर घुगे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. प्रो. अश्विनी दुधमळ यांनी मोहिमेत स्वतः सक्रिय सहभाग घेतला.या मोहिमेसाठी अविनाश जाधव (गड किल्ले संवर्धन सेल पुणे जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ), अमित नागपुरे ( गड किल्ले संवर्धन सेल हवेली तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ) आणि रोहन कुमार यांचे कार्यक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले. अविनाश जाधव यांनी विद्यार्थ्यांना गड संवर्धनाचे भविष्यातील परिणाम, पर्यावरणपूरक उपक्रमांचे महत्त्व यावर माहिती दिली.

प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. दीक्षित यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले डॉ. स्वाती विजय (डीन एमबीए), डॉ. आळंदकर ( डीन ॲडमिन ) व डॉ. कुलकर्णी ( डीन अकॅडमिक ) यांनी एन.एस.एस. स्वयंसेवकांना सातत्यपूर्ण पाठिंबा दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये डॉ. देवयानी इंगळे आणि नीता शिंदे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रो. अश्विनी धुधमल यांनी आभार मानले.

स्वच्छता शिवरायांच्या गडांची...!



पुणे — आरएमडी सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट कॅम्पस, वारजे यांच्या एनएसएस विभागाच्या वतीने सिंहगड किल्ल्यावर गड स्वच्छता व पुनर्स्थापना मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेत अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# भारतात ज्योतिष शास्त्राला अधिक महत्व - अभिनेते मुकेश खन्ना




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरूड :** भारतामध्ये अन्य शास्त्रांच्या बरोबरच ज्योतिष शास्त्राची परंपरा मोठी असून त्याचे महत्व अधिक असल्याचे मत प्रसिद्ध अभिनेते आणि महाभारत मालिकेतील भीष्माचार्य मुकेश खन्ना यांनी व्यक्त केले.

आदिनाथ साळवी व ॲड. वैशाली साळवी यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या "विधिलिखित ज्योतिष त्रिदशकोत्तर सोहळा -२०२५" या कार्यक्रमाचे उदघाटन त्यांच्या हस्ते झाले. यावेळी शशिकांत वामन पवार, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे, डॉ. दत्तप्रसाद चव्हाण, विधिलिखित संस्थेचे संस्थापक आदिनाथ साळवी आणि ॲड. वैशाली आदिनाथ साळवी आदी उपस्थित होते.

यावेळी ज्योतिर्विद कै. म. दा. भट, कै. काकासाहेब अवचट, कै. श्रीकृष्ण जकातदार, कै. ज्योतींद्र हसबे, कै.श्री. श्री. भट, कै. श्री. के. केळकर आणि कै. जयसिंगराव चव्हाण यांचा मरणोत्तर विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. तसेच वसंत दामोदर भट, चंद्रकांत शेवाळे, श्रीमती प्रतिभा शाहू मोडक आणि वि. शं. अष्टेकर यांचा विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार देऊन यावेळी गौरव करण्यात आला.

अभिनेता म्हणून काम करताना मला मुलांसाठी शक्तिमान आणि मोठ्यासाठी भीष्मपितामह अशा दोन भूमिका करण्याची संधी मिळाली. अटलबिहारी वायपेयीं यांच्या काळात प्रचार करताना तशा प्रकारचा उल्लेख देखील व्हायचे अशी आठवण सांगितली. या दोन भूमिकांमुळे मी प्रसिद्ध असलो तरी ईश्वराच्या इच्छेनुसार सगळे होत असते, आपण जो श्वास घेतो तो देखील त्याच्यामुळेच हे सांगताना आपण कृतज्ञ असायला हवे.

मला इंजिनयर व्हायचे होते, मला होता आले नाही, पण मी अभिनेता झालो. मला इंजिनिअरिंग कॉलेजला प्रवेश मिळाला नाही, त्यानंतर बीएस सी, एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले आणि अभिनेता झालो. माझ्या नशिबात अभिनेता होणे लिहिले होते. पुण्यातल्या फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये आता तेव्हाचे पुणे राहिलेले नाही, इथली वाहतूक आणि अन्य प्रश्न बदलत गेले आहेत.

**— मुकेश खन्ना,** ज्येष्ठ अभिनेते

# ‘छावा’ची दमदार झेप



सध्या सर्वत्र ‘छावा’ चित्रपटाची चर्चा आहे. तो बघण्यासाठी चित्रपतगृहांमध्ये आबालवृद्धांची गर्दी होत आहे. सकाळी सहाचे शो हाऊसफूल होण्याची किमया या चित्रपटाने साधली आहे. कमाईच्या बाबतीत, विकी कौशल आणि रश्मिका मंदान्ना यांच्या या चित्रपटाने देशात तसेच परदेशात जबरदस्त कामगिरी दाखवली आहे. सुरुवातीच्या वीकेंडनंतरही छावाने कमाईच्या बाबतीत आपली छाप सोडली असून चौथ्या दिवशी जगभरात बंपर बिझनेस करून सर्वांना आश्चर्यचकित केले आहे.१४ फेब्रुवारी रोजी व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झालेला या चित्रपट महान योद्धा संभाजी महाराजांच्या शौर्याची वीरगाथा दर्शवितो. विकी कौशलने राजांची भूमिका खूप छान साकारली असून ती चाहत्यांना आवडली आहे.

चित्रपटाने आत्तापर्यंत ३० कोटींपेक्षा जास्त व्यवसाय केला असून जगभरात चित्रपटाची एकूण कमाई आता २०० कोटी रुपयांच्या जवळपास पोहोचली आहे. रिलीजच्या तिसऱ्या दिवसापर्यंत या चित्रपटाची जागतिक कमाई १७६ कोटी रुपयांपेक्षा जास्त होती. एकंदरीत ‘छावा’ ची धमाकेदार कमाई सर्वांना आश्चर्यचकित करणारी ठरत आहे. खेरीज विकी कौशलच्या कारकिर्दीतील हा पहिलाच चित्रपट आहे, ज्याने रिलीजच्या चौथ्या दिवशीच जगभरात इतके मोठे कलेक्शन केले आहे. त्यामुळेही ‘छावा’ हा चित्रपट विकीच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार यात शंका नाही.

भारताव्यतिरिक्त विकी कौशलच्या ‘छावा’ला परदेशातील प्रेक्षकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. त्याच्या आधारे चित्रपटाने कमाईच्या बाबतीत आपला मजबूत दावा सादर केला आहे. तिसऱ्या दिवसापर्यंतच चित्रपटाने परदेशात ३२ कोटी रुपयांपेक्षा जास्त कमाई केली होती. आता ती ३५ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून मोठी धाव घेत आहे.

# यशाची ताजी चव



‘सनम तेरी कसम’ या रोमँटिक चित्रपटाचे पुनर्प्रदर्शन बॉक्स ऑफिसवर आपली मजबूत पकड कायम ठेवत आहे. विकी कौशल अभिनीत ’छावा’ चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतरही हर्षवर्धन राणे यांच्या ‘सनम तेरी कसम’ने हार मानलेली नाही. कलेक्शनच्या बाबतीत तो चमकदार कामगिरी दाखवत आहे. पुन्हा प्रदर्शित झाल्यानंतर या चित्रपटाने यशाची नवी उंची गाठली आहे. नऊ वर्षांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला बऱ्याच काळानंतर यश मिळाले असल्यामुळे सध्या तो सर्वत्र चर्चेत आहे. देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाचे निव्वळ कलेक्शन आता सुमारे ३६.७६ कोटी रुपये झाले आहे. ‘सनम तेरी कसम’ने याच वेगाने कमाई केली तर लवकरच तो ४० कोटींचा टप्पाही ओलांडू शकतो. अर्थातच, हे एक मोठे आव्हान आहे.

# ‘क्रिश ४’च्या प्रतीक्षेत

‘क्रिश’चा चौथा भाग बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. ‘क्रिश ४’ च्या रिलीजची सर्वांनाच उत्सुकता आहे. हृतिक रोशन स्टारर या चित्रपटाबद्दल दररोज ताज्या अपडेट्स येत राहतात. पण आता यातील अभिनेत्रीबद्दल मोठी बातमी समोर येत आहे.

अलिकडेच, ‘द रोशन्स डॉक्युमेंटरी’ मालिका ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाली. त्यामध्ये रोशन कुटुंबाच्या संघर्षाची आणि यशाची कहाणी दाखवण्यात आली. विशेष म्हणजे त्याला प्रेक्षक आणि समीक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. राकेश रोशन यांनी या डॉक्युमेंटरी-सिरीजसाठी एक सक्सेस पार्टी अलिकडेच आयोजित केली होती. या पार्टीत राकेश रोशनसोबत ज्येष्ठअभिनेत्री रेखा देखील दिसल्या होत्या आणि यादरम्यान पापाराझींनी राकेशला ‘क्रिश ४’ मधील रेखाच्या भूमिकेबद्दल प्रश्न विचारला. याला रोशन यांनी हसून उत्तर दिले आणि तुम्हाला लवकरच सर्व काही पहायला मिळेल... असे म्हटले. राकेश रोशनच्या या विधानावरून हे स्पष्ट होते की आपल्याला हृतिक रोशन स्टारर ‘क्रिश ४’ मध्ये रेखाची झलक पाहायला मिळेल.

अभिनेत्री रेखा ‘कोई मिल गया है’ मधील या सुपरहिरो चित्रपटाचा एक भाग आहे हे आपण जाणतो. हृतिकने ‘क्रिश’ आणि ‘क्रिश ३’ मध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. आशा आहे की ‘क्रिश ४’ मध्ये तो पुन्हा एकदा अद्भुत अभिनयाने चाहत्यांची मने जिंकेल. तथापि, ‘क्रिश ४’ च्या प्रदर्शन तारखेबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. खरंतर, अभिनेत्री प्रियांका चोप्रा गेल्या दोन ‘क्रिश’मध्ये हृतिक रोशनसोबत दिसली होती. या चित्रपटातील तिच्या उपस्थितीचा चांगला परिणाम बघायला मिळाला होता. पण आता प्रियांकाने बॉलिवूडपासून स्वतःला दूर केले आहे. त्यामुळे ती ‘क्रिश ४’ साठी परत येईल की राकेश रोशन तिच्या जागी दुसरी अभिनेत्री घेतील हा प्रश्न आहे. प्रियांकाच्या ‘क्रिश ४’ मध्ये पुन्हा प्रवेश करण्याबाबत अजूनही शंकांचे ढग आहेत.





# ‘पंचायत’ ला स्पर्धा ‘दुपाहिया’ची



ओटीटी प्रेमींमध्य नेहमीच कोणत्या ना कोणत्या मालिकांबद्दल चर्चा सुरू असते. यामध्ये ‘पंचायत’चे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. या मालिकेचे तीन सीझन प्रदर्शित झाले आहेत आणि लोक आगामी भागाची आतुरतेने वाट पाहत आहेत. जितेंद्र कुमार, नीना गुप्ता आणि फैसल मलिक यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या ‘पंचायत’ मध्ये एका गावाची कथा दाखवण्यात आली असून ज्याने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. मात्र आता ग्रामीण वातावरणाचे चित्रण करणारी अशीच आणखी एक मालिका प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. अमेझॉन प्राइम व्हिडिओने नुकतीच ‘दुपाहिया’ नामक वेब सिरीजची घोषणा केली आहे. या मालिकेअंतर्गत एका छोट्या गावातील एक अनोखी कहाणी दाखवली जाईल. या मालिकेत अभिनेते गजराज राव आणि रेणुका शहाणे यांच्यासारखे कलाकार प्रेक्षकांना हसवतील. थोडक्यात ही मालिका ‘पंचायत’ला स्पर्धा देताना दिसेल. ‘पंचायत’ची कथा फुलेरा गावावर आधारित आहे त्याचप्रमाणे ‘दुपाहिया’ मध्ये धडकपूर या काल्पनिक गावाची कथा दाखवली जाईल.

# संगीत नाटकातील हिरा हरपला



अलिकडेच प्रख्यात गायक पं. प्रभाकरबुवा कारेकर यांचे निधन झाले. त्यांच्या रुपाने शास्त्रीय संगीत तसेच संगीत नाटकांमधील एक जाणते नाव काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. अभिषेकीबुवांचे शिष्य असणाऱ्या कारेकरबुवांचे प्रिये पहा... ही गीत रसिकमान्य होते. खरे तर आधीच छोट्या गंधर्वांनी हे गाणे एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. मात्र कारेकरबुवांनी ते वेगळ्या प्रकारे गायले आणि रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. त्यांनी गाण्याला वेगळे वळण देताना घेतलेली लांबलचक तान प्रेक्षकांना, संगीतप्रेमींना इतकी भावली की हे गाणे ऐकण्यासाठी लोक वेडावून जात असत. त्यामुळेच हे गाणे कारेकरबुवांची खासियत वा मुख्य ओळख बनले.

प्रभाकरबुवांचा रियाज वाखाणण्याजोगा होता. त्यांना आपले विश्व नाट्यसंगीतापुरते सीमित ठेवायचे नव्हते. ते शास्त्रीय संगीताचाही भरपूर रियाज करायचे. त्यामुळेच ते शास्त्रीय संगीतही फार छान गायचे. राग मांडताना, चीज-बंदिश समजून घेताना त्यांची एकाग्रता पाहण्यासारखी असायची. शास्त्रीय संगीताचा गाढा अभ्यास आणि प्रचंड मेहनत याने त्यांना गायनक्षेत्रात विशेष ओळख मिळवून दिली होती.

कारेकरबुवांनी संगीतालाच आपले संपूर्ण आयुष्य वाहिले होते. ते दिवसभर याच विश्वात रममाण असायचे. स्वाभाविकच त्यांची बैठक पक्की होती. दिवसभर रियाज केल्यामुळे आवाजाला कमालीची फिरत होती. एक राग घ्यायचा, त्याची बढत करायची, चीज आणि बंदिशीवर विचार करायचा असे करत त्यांचे काम तासन तास सुरू असायचे. या अभ्यासाचा अतिशय चांगला परिणाम त्यांच्या मैफिलींमध्ये दिसायचा, कारण बसताक्षणी मंचावर एक ऑरा, वलय तयार व्हायचे. म्हणजेच मैफिलीमध्ये स्थानापन्न होताक्षणीच त्यांनी अर्धी मैफिल जिंकलेली असायची. चेहऱ्यावरील सौम्य हास्य, प्रेक्षकांकडे बघणे, सूर लावणे या सगळ्याद्वारा ते रसिकांच्या मनाचा ताबा घ्यायचे आणि नंतर आपल्या दमदार स्वरांच्या अभिषेकात त्यांना चिंब भिजवायचे. शतजन्म शोधिताना... हे त्यांचे गाणेही रसिकप्रिय होते. दे हाता शरणागता... कोण विसरु शकेल? हे गाणेही ते आपल्या खास शैलीत गायचे. अशा या थोर गायकाच्या आठवणी कायमच मनात ताज्या राहतील.

# प्राजक्ताचा अनोखा अंदाज



अभिनय, नृत्य आणि निर्मिती या क्षेत्रात वावरणारी अभिनेत्री प्राजक्ता माळीने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. चित्रपटाची निर्मिती केली आहे. ती नेहमीच काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याच्या प्रयत्नात असते. आगामी ‘चिकी चिकी बुबूम बम’ या आगामी चित्रपटातही तिचा असाच अनोखा अंदाज प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे. यात ती रावी या मुलीच्या भूमिकेत दिसणार असून हे पात्र खूप खेळकर आणि उत्साही आहे. पण त्याचवेळी ते खूप गोंधळलेलेही आहे. तेव्हा प्राजक्ता विनोदी ढंगाने येणारी ही आव्हानात्मक भूमिका कशी साकारते ते लवकरच समजेल. ‘चिकी चिकी बुबूम बम’ हा चित्रपटपुनर्मिलन समारंभासाठी जमलेल्या पण काही मजेदार गोष्टी करताना दिसलेल्या मित्रांची मजेशीर गोष्ट दाखवणारा आहे. मजा, धमाल आणि विनोदाने भरलेला हा चित्रपट २८ फेब्रुवारीचा प्रेक्षकांसमोर येणार आहे.

या चित्रपटाविषयी बोलताना प्राजक्ता म्हणते, ‘नावाजलेल्या विनोदी कलाकारांसोबत काम करण्याची संधी माझ्यासाठी खूप खास आहे. मला खात्री आहे की आमच्या भूमिकेला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे आणि ‘चिकी चिकी बुबूम बुम’चे प्रेक्षक स्वागत करतील. या चित्रपटात प्राजक्ता माळीसोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, नम्रता सांभेराव, वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शिनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, प्रभाकर मोरे, चेतना भट, निखिल बने, श्याम राजपूत, ऐश्वर्या बडदे, श्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे अशी कलाकारांची मोठे फौज आहे.

# चर्चा ‘अ सायलेंट एस्केप’ची...



सध्या लघुपट मोठा प्रभाव पाडण्यात यशस्वी होत आहेत. या पार्श्वभूमीवर चित्रपट निर्माते योगी देवगण यांचा ‘अ सायलेंट एस्केप’ हा लघुपटदेखील चर्चेत असून समीक्षकांनी त्याचे खूप कौतुक केले आहे. सत्य घटनांनी प्रेरित असणारा ‘अ सायलेंट एस्केप’ एका आईच्या अढळ धैर्याची कहाणी सादर करतो. एका दुःखद घटनेनंतर न्यायासाठी लढणाऱ्या आईची कहाणी प्रेक्षकांना एका वेगळ्याच जगात घेऊन जाणारी आहे.

या लघुपटाने बॉलिवूड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (बीआयएफएफ) , १४ वा दादासाहेब फाळके चित्रपट महोत्सव आणि जगभरातील इतर अनेक प्रतिष्ठित प्लॅटफॉर्मवर सर्वोत्कृष्ट दीर्घ लघुपट, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि सर्वोत्कृष्ट अभिनेता असे अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. माउंट लॉफ्टी स्टुडिओज आणि योगी देवगण फिल्म्स अंतर्गत निर्मित ही अर्धा तासाची कथा आई आणि मुलाच्या वेदनादायक प्रवासावर आधारित आहे. सरदारनी प्रीत, रुडी देवगन, किरण प्रीत कौर आणि अरविंद कुमार यांच्या प्रमुख भूमिका असणाऱ्या या लघुपटाचे दिग्दर्शक योगी देवगन म्हणाले की, ‘लघुपटांमध्ये कमी वेळेत सखोल कथा सांगण्याची ताकद असते. ‘अ सायलेंट एस्केप’ हा असाच एक विचार करण्यास भाग पाडणारा लघुपट असून तो अन्याय आणि जगण्याच्या अनेक विषयांना स्पर्श करतो. खेरीज तो फक्त एका आईच्या लढाईबद्दल नाही तर आपल्या सर्वांमध्ये असणाऱ्या शक्तीबद्दल आहे.’ तेव्हा ही प्रभावी कथा प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करेल यात शंका नाही.




दैनिक राष्ट्र संचारच्या पाठपुराव्याने आणि ग्रामस्थांच्या मागणीनंतर, त्यानंतर ठेकेदाराने अपघात प्रवण ठिकाणी लावलेला फलक

# 'स्वच्छ जल'च्या दिशेने एक सार्थक पाऊल...!


## बारामतीत रविवारी होणार दशक्रिया विधी घाटासह कऱ्हा नदीपरिसराची स्वच्छता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** संत निरंकारी मिशनची सेवा भावना आणि मानव कल्याणाचा संकल्प साकार करण्याच्या हेतुने 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' परियोजनेच्या तिसऱ्या टप्प्याचा शुभारंभ रविवार, दि.२३ फेब्रुवारी रोजी परम श्रद्धेय सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि सत्कारयोग्य निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात रविवारी यमुना नदीच्या छठ घाट, आई.टी.ओ. दिल्ली येथे केला जात आहे.या परियोजनांतर्गत संत निरंकारी मिशन बारामती येथील दशक्रिया विधी घाट व कऱ्हा नदी परिसरात साफसफाई करण्यात येणार असल्याचे सातारा झोनचे प्रभारी नंदकुमार झांबरे यांनी सांगितले.

रविवारी सकाळी ७ ते १० यावेळात होणाऱ्या स्वच्छ जल, स्वच्छ मन परियोजनेच्या तिसऱ्या टप्प्यासाठी बारामतीसह शेठफळ गढे व मदनवाडी परिसरातून मोठया संख्येने निरंकारी अनुयायी भाग घेणार असल्याचेही झांबरे यांनी सांगितले. या महाअभियानाच्या पहिल्या दोन टप्प्यांना अभूतपूर्व यश प्राप्त झाले आहे.

याच प्रेरणेतून यावर्षी तृतीय टप्पा अधिक व्यापक, प्रभावी व दूरगामी दृष्टीकोनातून वाढविण्यात आला आहे ज्यायोगे हे अभियान सातत्याने विस्तारीत होऊन समाजामध्ये जागरुकता, सेवा आणि समर्पणाची एक सशक्य लाट उत्पन्न करु शकेल.






"हे बृहत अभियान देशभरातील २७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील ९०० पेक्षा अधिक शहरांमध्ये १६०० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी आयोजित करण्यात येईल. या महाअभियानाची ही अभूतपूर्व व्यापकता त्याला एक ऐतिहासिक स्वरूप देईल ज्यातून जल संरक्षण व स्वच्छतेचा संदेश अधिक प्रभावशाली रीतीने जनसामान्यांपर्यंत पोहचू शकेल."
— **जोगिंदर सुखीजाजी,** सचिव संत निरंकारी मंडळ

### असा आहे मोहिमेचा उद्देश...!

- जल संरक्षण व स्वच्छतेच्या प्रति जागरूकता निर्माण करणे
- २०23 मध्ये संस्कृति मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहयोगाने 'प्रोजेक्ट अमृत'चा शुभारंभ
- पिढ्यांना निर्मळ जल आणि स्वस्थ पर्यावरणाचे वरदान प्राप्त होऊ शकेल
- जलस्रोतांची स्वच्छता सुनिश्चित करणे
- संरक्षणाला मानवी जीवनाचे अभिन्न अंग बनविण्याचा विचार विकसित करणे
- शेठफळ गढे व मदनवाडी परिसरातून मोठया संख्येने निरंकारी अनुयायी
- नद्या, सरोवरे, तलाव, विहिरी आणि झरे यांसारख्या प्राकृतिक जलस्रोतांची स्वच्छता
- १६०० हून अधिक ठिकाणी राबविणार अभियान
- या महाअभियानाच्या पहिल्या दोन टप्प्यांना अभूतपूर्व यश

## जातेगावमध्ये सरपंचाची कर्मचाऱ्याला मारहाण

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक ता. शिरूर येथील विद्यमान सरपंचाने पाणीपुरवठा करणाऱ्या एका ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना घडली असून याबाबत शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे सरपंच निलेश संपत उमाप याच्यावर अदखलपात्र स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जातेगाव बुद्रुक ता. शिरूर येथील पाणीपुरवठा करणारे ग्रामपंचायत कर्मचारी प्रकाश डहाळे यांना सरपंच निलेश उमाप यांनी जिल्हा परिषद शाळेसमोर बोलावून घेत कामा बाबत लोकांच्या तक्रारी असल्याचे सांगत सुरु असलेल्या एका बांधकामाला पाणी मारण्यास सांगितले. त्यानंतर जेवण करुन आल्यावर पाणी मारतो असे प्रकाश डहाळे यांनी सांगितले.

## मारुती जारकड यांचे निधन



**अवसरी :** गावडेवाडी फाटा जारकड स्थळ (ता आंबेगाव )येथील प्रगतिशील शेतकरी मारुती नामदेव जारकड (वय - ७५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्याने निधन झाले. अतिशय कष्टातून व गरीबीतून त्यांनी आपला प्रपंच उभा केला होता. त्यांच्यामागे दोन भाऊ, पत्नी, दोन मुलगे, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे पुतणे असा परिवार असून दुग्ध व्यवसायिक व प्रगतिशील शेतकरी वामन जारकड यांचे ते मोठे बंधू तर दत्तात्रेय जारकड व प्रयोगशील शेतकरी संतोष जाटकड यांचे ते वडील होत.

# बारामतीत सुरू झाला रुग्णसेवेचा नवीन आयाम

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून गरजू बालकांसाठी मोफत शस्त्रक्रिया उपक्रम


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेऊ न शकणाऱ्या बालकांसाठी एक दिलासादायक उपक्रम बारामतीत सुरू झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांच्या पुढाकाराने गरजू मुलांसाठी विनामूल्य शस्त्रक्रिया उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

बारामतीतील मुथा हॉस्पिटलमध्ये बालरोगतज्ज्ञ डॉ. राजेंद्र मुथा आणि डॉ. सौरभ मुथा यांच्या सहकार्याने मुंबईतील प्रख्यात शल्यविशारद डॉ. संजय ओक आणि त्यांचे सहकारी हे बालकांवर सेवाभावी वृत्तीने मोफत शस्त्रक्रिया करत आहेत.

शनिवार व रविवार या दोन दिवसांत ३० बालकांवर विविध शस्त्रक्रिया केल्या जाणार असून, त्यात हर्निया, टाळूला चिटकलेली जीभ दुरुस्त करणे, तसेच शरीरावरील गाठी काढणे यासारख्या शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत म्हस्के, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मनोज खोमणे, तसेच डॉ. राजेंद्र मुथा, डॉ. सौरभ मुथा, अनिल नवरंगे, अनिल जोगळेकर, माजी नगराध्यक्षा भारती मुथा, प्रियांका मुथा, डॉ. अनिल मोकाशी, अजित पवार यांचे विशेष कार्यकारी अधिकारी नितीन हाटे, किरण तावरे आणि प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे यांची उपस्थिती होती.



### मोफत शस्त्रक्रियांचा उपक्रम नियमित राबवणार!

- "उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुनेत्रा पवार यांच्या प्रेरणेतून बारामतीत हा उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प केला आहे. यामुळे गरजू बालकांना मोफत आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळेल," असे डॉ. संजय ओक यांनी सांगितले.

### उपचारांची नवी पहाट!

- या अभिनव उपक्रमामुळे बारामतीतील गरजू कुटुंबांसाठी आरोग्यसेवेचे नवे दार खुले झाले आहे. आर्थिक अडचणींमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या मुलांसाठी हा उपक्रम एक मोठी संधी ठरणार आहे.

## खेड तालुक्यातील सरपंच पदाची आरक्षण सोडत गुरुवारी

**खेड :** खेड तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत गुरुवारी (दि. २७) जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार ज्योती देवरे यांनी दिली.

ग्रामविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार दिनांक ०५ मार्च २०२० च्या अधिसुचनेव्दारा ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी फेरआरक्षण निश्चित करणे आवश्यक असल्याने दि.१ जानेवारी २०२४ ते ४ मार्च २०२५ या कालावधीत मुदत संपणा-या राज्यातील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत निश्चित करण्यासाचे निर्देश दिले आहेत. पुणे जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, महिला राखीव, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग यातील महिलांसह आरक्षण काढण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर तालुकानिहाय होणारी सरपंच आरक्षण सोडत निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे.

यामध्ये खेड तालुक्यातील खराबवाडी, जऊळके खुर्द, कोहींडे बु., सोळू, वडगाव घेनंद , धामणे, गुळाणी , रौंधळवाडी, आसखेड बु., आंबेठाण, वाशेरे, सायगाव, कडाचीवाडी, बोरदरा , पाईट, कोये, खालुंब्रे, टेकवडी या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत होणार आहे.

आरक्षण सोडतीला खेड तालुक्यातील सर्व आजी माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीच्या सदस्यासह, राजकीय पक्षाचे पदाधिकारी ग्रामस्थांनी उपस्थित आवाहन प्रांतअधिकारी अनिल दौंडे यांनी केले आहे.

## ट्रकला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**शिक्रापूर:** कासारी फाटा ता. शिरुर येथील पुणे नगर महामार्गावरुन एकनाथ चव्हाण हे ट्रक घेऊन पुणे बाजूने अहमदनगरच्या दिशेने चाललेले असताना पाठीमागून दुचाकीहून एक युवक आला त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी ट्रकला पाठीमागून धडकून नवनाथ बाळासाहेब चौधरी वय ३० वर्षे सध्या रा. कोंढापुरी ता. शिरुर जि. पुणे याचा मृत्यू झाला आहे.

पान १ वरून

## अमित शहाणी वाचला विकासाचा पाढा

राहुल गांधी म्हणत होते की, सरकार बँकेचं खातं उघडून देतं. मात्र, त्यावर काय देणार, पण आता १० लाख लोकांना एका क्लिकवर पहिला हप्ता जाईल.

आता सिलिंडर पण देणार आहोत. विकसित भारत करायचा आहे. नरेंद्र मोदी, तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले, त्यांनी घरे देण्याचा संकल्प केला. सर्वात जास्त घरे महाराष्ट्राला दिली आहेत.

घरासोबत शौचालय, लाईट, सिलिंडर धान्य देण्याचे काम केले आहे. आता १३ लक्ष घरे दिली, आता २० लक्ष घरे देण्याचे काम करत आहेत. कोणत्याही पंतप्रधानांनी ७ कोटी घर,सिलेंडर, धान्य, २५ कोटी लोकांना गरिबीतून वर काढण्याचं काम केलं नाही. राज्यात नरेंद्र मोदी यांनी अनेक इन्फ्रास्ट्रक्चरचे काम केली आहेत. सिंचन,जलयुक्त शिवाराचं अनेक कामं सुरू आहेत.

देशात आणि राज्यात अनेक विकास काम सुरू आहेत. रेल्वे स्टेशन नवीन होत आहेत. नागपूर, पुणे मेट्रो काम होत आहे. अटल सेतूसह इतर काम करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. अमित शहा यांनी राज्यातील विकास कामे वाचून दाखवले. महाराष्ट्रातील जनतेचे आभार महायुती सरकारला परत निवडून दिले. महाराष्ट्रातील जनतेने कोणती शिवसेना खरी आहे, तसेच कोणती शिवसेना खोटी आहे, याचाही निर्णय दिला. तसाच राष्ट्रवादीबाबतही निर्णय दिला आहे.

## भारतीयत्व हाच धागा !

आमची मुले बहुभाषिक बनली आहेत. डॉ. विश्वजित कदम म्हणाले, माझा विवाह मराठी आणि त्यातही पुण्यातील मुलीशी झाल्याने मला भाषा, संस्कार, रितीभाती यांच्या आंदोलनांना सामोरे जावे लगाले नाही.

## 'मनसे' ला महायुतीत घेणे योग्य नाही- आठवले

सोनकांबळे यावेळी उपस्थित होते.

आठवले म्हणाले, 'अनेकदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढल्या जात नाहीत. महाविकास आघाडीही एकत्र निवडणूक लढण्याची शक्यता नाही. पण, महायुतीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका एकत्रितपणे लढवाव्यात असा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी एकत्र बसावे. महायुतीने लोकसभा, विधानसभेला रिपाईंला डावलले असले तरी मी त्यांना डावलणार नाही. रिपाई पक्ष छोटा असला तरी गावागावात कार्यकर्ते आहेत. कार्यकर्त्यांना संधी द्यायची आहे. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत आम्हाला डावलले जाणार नाही, अशी खात्री आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चर्चा झाली आहे. संधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे'.

## पिंपरीतही 'आरओ' ...

पूर्णपणे बरे झाले आहेत. दूषित पाण्यामुळे 'जीबीएस'ची लागण होत असल्याच्या शक्यतेने महापालिकेच्या पाणी पुरवठा विभाग आणि वैद्यकीय विभागाच्या वतीने विविध उपाय योजना करण्यात येत आहेत. शहरातील विविध भागातील बेकायदेशीर ५८ आरओ प्रकल्प लाखबंद केले आहेत. प्रकल्प अनिश्चित काळासाठी बंद ठेवले होते. अटी व शर्तीसह या प्रकल्पांना पुन्हा सुरू करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.

## वाळू खाली गाडली गेल्याने ...

यश आले आहे. यात एका तेरा वर्षीय मुलीचा आणि एका महिलेचा समावेश आहे. पहाटे गाढ झोपेत असताना एका वाळूच्या टिप्परने त्यांच्या शेड वरच वाळू रिकामी केली. या वाळूमुळे पत्र्याचा शेड खचून मजूर गाडले गेले. काही वेळाने ही घटना लक्षात आल्यानंतर स्थानिकांनी तातडीने बचाव कार्य सुरू झाले. मोठ्या प्रयत्नानंतर एका महिलेसह तेरा वर्षीय मुलीला सुखरूप बाहेर काढण्यात आले मात्र पाच मजुरांचा वाळूखाली दबून मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ आहे.

## केंद्रीय मंत्र्याला ...

देऊ नये अशी विनंती केली होती. पण तरीही व्यवस्थापनाने त्यासाठी तिकीट आकारल्याचं सांगण्यात आलं. या प्रकाराबद्दल शिवराज सिंह चव्हाण यांनी संताप व्यक्त केला आहे.

## नवनीत राणा यांना...

राणांना समन्स पाठवला आहे. शिवाय येत्या २८ फेब्रुवारीला न्यायालयात हजर राहण्याचेही आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे आता माजी खासदार नवनीत राणा न्यायालयात हजर राहणार का याकडे सऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**PUBLIC NOTICE**

अगस्टा सहकारी गृह रचना संस्था मर्यादित गहुंजे पुणे या संस्थेच्या वतीने सोसायटीसाठी सौरऊर्जेपासून वीजनिर्मिती प्रकल्पासाठी 90 KW चे वेगवेगळ्या निवेदिता मागविण्यात येत असून त्याच्यासाठी इच्छुक विक्रेत्यांनी आपल्या निवेदिता सोसायटीचे मॅनेजर यांच्या नावे 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत जमा करा.

संपर्क : योगेश क्षिरसाठ
९८५०३०७७५४

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०६/२०२५/५१४२

**अर्जदार**
पोलाईट होम्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सेक्टर नं. २०, प्लॉट नं. ३३ए/२, पीसीएनटीडीए, चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२
तर्फे, अध्यक्ष: श्री. संतोष भानुदास अडाणे, सचिव : श्री. सुरेश वासुदेवन नायर

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

गैरअर्जदार / जमिनमालक
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. पोलाईट प्रमोटर्स अँन्ड बिल्डर्स नोंदणीकृत भागीदारी संस्थातर्फे भागीदार, श्री. सतिषकुमार रावजीभाई पटेल, ऑफिस पत्ता: पोलाईट होम्स, सेक्टर नं. २०, प्लॉट नं. ३३ए/२, पीसीएनटीडीए, चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२
अनु क.३ ते ८ तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, पुणे - ४११०४४
तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी (पुर्वीचे)
२ अ. पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सध्याचे) भाडेपट्टाधारक / जाब देणार नं. ३
३. श्री. हनुमंत तुकाराम म्हेत्रे, ४. श्री. दत्तात्रय तुकाराम म्हेत्रे, ५. श्री. सतिष तुकाराम म्हेत्रे तर्फे कुलमुखत्यारधारक, मे. जी. एम. सी. असोसिएट्स
६. श्री. धोंडीराम व्ही. गुंठे, ७. श्री. दामोदर वामनराव मोरे, ८. श्री. गुरुराज रचैया चरंतीमठ
सर्व रा. सेक्टर नं.२०, प्लॉट नं. ३३ए/२, पीसीएनटीडीए, चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये पोलाईट होम्स सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सेक्टर नं. २०, प्लॉट नं. ३३ए/२, पीसीएनटीडीए, चिखली, ता. हवेली, जि. पुणे - ४११०६२ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ०६/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर,गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ८ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ८ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुणे दिनांक : २०/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम १९(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५८० / २०२४ / ५१५९

**अर्जदार**
गुरुमाऊली विहार सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सर्वे नं.५२, हिस्सा नं. ४/१ (पै), ४/१/३४, ४/१/३५, ४/१/३६, ४/१/३७, ४/५४, ५/३, लेन नं. ४,
पाषाण सुरु लिंक रोड, प्लॅटिनम च्या मागे, बाणेर, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४५.
तर्फे, अध्यक्ष: श्री. श्रीकांत रविंद्र पत्की,
सचिव : श्री. भुषण चंद्रकांत भानेगांवकर

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक / जाब देणार
१. गुरुमाऊली विहार नोंदणीकृत भागीदारी संस्था
ऑफिस पत्ता : १७, कॉटीनेंटल चेंबर, सोनाल हॉल शेजारी, कर्वे रोड, पुणे - ४११००४
तर्फे भागीदार, अ. अविनाश विनायकराव बंगाळे,
रा. जगत जननी बंगला, ज्ञानदीप कॉलनी, कर्वे नगर, पुणे - ४११०५२
ब. मुकुंद सिद्धेश्वर गोसावी, रा. बी-३३, गणेश प्रसाद, वडगाव धायरी, पुणे - ४११०४१
क. श्री. राजकुमार किशनचंद जसवानी, रा. फ्लॅट नं. ६, पदमजी कंपाऊंड,
अमरज्योती को. ऑप. हौ. सो. लि. भवानी पेठ, पुणे - ४११०१५
श्री. पंकज नारायणराव बंगाळे, रा. अष्टविनायक अपार्टमेंट, ज्ञानदिप नर्सरी शाळेमागे न-हे, ता. हवेली, पुणे - ४११०४१
इ. सौ. अनिता अशोक पालारपवार, रा. अ ३०१, डॅफोडील्स अॅव्हेन्यु, मराठा मंदिराचे मागे, बावधन, पुणे- २१.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये गुरुमाऊली विहार सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्वे नं.५२, हिस्सा नं.४/१ (पै), ४/१/३४, ४/१/३५, ४/१/३६, ४/१/३७, ४/५४, ५/३, लेन नं. ४, पाषाण सुरु लिंक रोड, प्लॅटिनम ९ च्या मागे, बाणेर, ता.हवेली, जि. पुणे - ४११०४५ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ५८०/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ( अ व इ) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ( अ व इ) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ( अ व इ) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुणे दिनांक : २०/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०८/२०२५/५१४३

**अर्जदार**
वृंदावन रेसिडन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सेक्टर नं. २९, प्लॉट नं. ६ ते ८ व १९ ते २१, प्राधिकरण, रावेत, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१
तर्फे, सचिव : श्री. श्रीकृष्ण राजेंद्र जोशी, खजिनदार: सौ. रुपाली श्रीकृष्ण जोशी

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

गैरअर्जदार / जमिनमालक
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. त्रिलोचन एंटरप्रायजेस नोंदणीकृत भागीदारी संस्था तर्फे भागीदार
A) मे. चेतन डेव्हलपर्स तर्फे भागीदार, अ. श्री. चेतन मनिभाई पटेल, ब. श्री. मनुभाई डी. पटेल
B) मे. युनिटी डेव्हलपर्स, तर्फे भागीदार, अ. श्री. मनिभाई सावदासभाई पटेल, ब. श्री. किरीटभाई सवजीभाई पटेल
C) मे. अर्थ डेव्हलपर्स,तर्फे भागीदार, अ. श्री. वसंतकुमार डाहयाभाई पटेल, ब. श्री. जयेशकुमार शिवरामभाई पटेल
ऑफिस पत्ता: सेक्टर नं. २९, प्लॉट नं. ६ ते ८ व १९ ते २१, प्राधिकरण, रावेत, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१
अनु क्र. ३ ते ५ तर्फे कु.मु. म्हणुन जाब देणार नं. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, पुणे - ४११०४४, तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी
भाडेपट्टाधारक / जाब देणार नं. ३
३. श्री. किर्तीभाई सावजीभाई पटेल,
४. श्री. वसंतकुमार डाहयाभाई पटेल,
५. श्री. चेतन मनिभाई पटेल सर्व रा. सेक्टर नं. २९, प्लॉट नं. ६ ते ८ व १९ ते २१, प्राधिकरण, रावेत, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये वृंदावन रेसिडन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता : सेक्टर नं. २९, प्लॉट नं. ६ ते ८ व १९ ते २१, प्राधिकरण, रावेत, ता. हवेली, जि. पुणे- ४१२१०१ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ०८/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ५ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ५ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ५ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुणे दिनांक : २०/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०९ / २०२५ / ५१५८

**अर्जदार**
अनुसुया इन्क्लेव्ह - १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : इमारत क्रं. अॅ १ ते ३.९, अॅ. विंग, स.नं. ७६, हिस्सा नं. १९ अ / १ (पार्ट), वानवडी,
जि. पुणे-४११०४०.
तर्फे, अध्यक्ष: श्री. नारायणन मुरलीधरन शंकर, सचिव : श्री. दिपक गजानन डाके

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

गैरअर्जदार / जमिनमालक
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. कुमार कंपनी, ऑफिस पत्ता: ७८३, भवानी पेठ, पुणे - ४११०४२, तर्फे भागीदार
श्री. विमल केसरीमल जैन, पत्ता: कुमार कॉर्नर, १९८६, कॉन्व्हेन्ट स्ट्रीट, पुणे - ४११००१
कुमार कॅपिटल, २४१३, इस्ट स्ट्रीट, पुणे - ४११००१
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. पांडूरंग नामदेव जगताप, ३. श्री. सुदाम पांडूरंग जगताप, ४. श्री. रमेश पांडूरंग जगताप
५. श्री. नंदकुमार पांडूरंग जगताप, ६. श्री. शशिकांत पांडुरंग जगताप, ७. श्री. मारुती नामदेव जगताप
८. श्री. धनंजय मारुती जगताप, ९. श्री. बाळासाहेब नामदेव जगताप, १०. श्री. अविनाश बाळासाहेब जगताप
११. श्री. स्मितीन बाळासाहेब जगताप, १२. श्री. गणेश बाळासाहेब जगताप, १३. सौ. द्वारकाबाई वामन जगताप
१४. श्री. विजय वामन जगताप, १५. श्री. अनिल वामन जगताप, 16. श्री. संजय वामन जगताप
१७. उज्वला वामन जगताप, अ.क्रं. २ ते १७ रा. ५३०, वानवडी गाव, ता. पुणे सिटी, पुणे - ४११०४०.
१८. सौ. यमुनाबाई शांताराम पायगुडे, रा. पुणे महाविद्यालय वुमन हॉस्टेल समोर, पुणे- ७
१९. सौ. हिराबाई विठ्ठल तावरे, रा. धनकवडी, ता. हवेली, जि. पुणे
२०. सौ. ताराबाई गणपत गायकवाड, रा. मुंढवा, ता हवेली, जि. पुणे
२१. सौ. सुजाता दशरथ शितोळे, २२. मुक्ताबाई पांडुरंग जगताप, २३. उज्वला राजेश जगताप स. नं. ७६, हिस्सा नं.१९ अ / १ (पार्ट), वानवडी, जि. पुणे - ४११०४०.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये अनुसुया इन्क्लेव्ह १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता : इमारत क्रं. १ ते ३.९, ओ.विंग, स.नं. ७६, हिस्सा नं. १९ अ / १ (पार्ट), वानवडी, जि. पुणे-४११०४० या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ०९/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. २ ते ८ व १० ते २३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. २ ते ८ व १० ते २३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. २ ते ८ व १० ते २३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुणे दिनांक : २०/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत

( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५

**जाहीर नोटीस**

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ११/२०२५/५१४४

**अर्जदार**
स्मृती हाईट्स बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सर्वे नं. २०/१/२/३अ, २०/१/२/४, २०/१/२/६, २०/१/२/७, २०/१/२/४/३,२०/१/२/७/३
कात्रज, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४६,
तर्फे, अध्यक्ष : श्री. संदिप बाळासाहेब नरोडे, सचिव : श्री. गणेश काशिनाथ पायगुडे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

गैरअर्जदार / जमिनमालक
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. एस. जे. असोसिएट्स नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता: २०६, यादव व्यापार भवन ६०२, शुक्रवार पेठ, पुणे तर्फे भागीदार,
अ. श्री. बाबाजी बाबुराव जाधव, रा. प्लॉट नं. ०७, सदगुरु हौ. सोसायटी, धनकवडी, पुणे - ४११००३
ब. श्री. मधुकर नारायण शहाणे, रा. प्लॉट नं. ३९, अमर सोसायटी, लॉ कॉलेज रोड, पुणे - ४११००४
अनु क. २ ते १० तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार न. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. सुमतीलाल भिकुलाल देसाई, ३. सौ. स्नेहलता सुमतीलाल देसाई, ४. कु. अंजली सुमतीलाल देसाई
५. सौ. शुभांगी राजीव देसाई, अनु क. २ ते ५ रा. ३७, रुतुराज सोसायटी, पुणे - ४११०३७
६. श्री. निखिल अरुण शहा, ७. श्री. नितांत अरुण शहा,
८. श्री अरुण माणिकचंद शहा अनु क. ६ ते ८ रा. कृतार्थ सोसायटी, पुणे सातारा रोड, पुणे - ४११०३७
९. श्री. चंद्रकांता मोहनलाल शहा, रा. माधा, जि. सोलापुर - ४१३२०९
१०. श्री. विलासराव बलवंतराव सरनोबत, रा. धनकवडी, पुणे - ४११०४३. जाब देणार नं. ३/इतर सहकारी गृहरचना संस्था
११. स्मृती हाईट्स ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता : सर्वे नं.२०/१/२/३अ,२०/१/२/४,२०/१/२/६,२०/१/२/७,२०/१/२/४/३,२०/१/२/७/३,
कात्रज,ता.हवेली, जि.पुणे

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये स्मृती हाईट्स बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्वे नं. २०/१/२/३अ, २०/१/२/४, २०/१/२/६, २०/१/२/७, २०/१/२/४/३,२०/१/२/७/३ कात्रज, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४६ या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ११/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ११ गैरहजर, गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ११ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ११ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पुणे दिनांक : २०/०२/२०२५**

शिक्का

सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

लाखो खातेदार, ठेवीदार असलेल्या मुंबईतील न्यू इंडिया सहकारी बँकेमध्ये उघडकीस आलेला कोट्यावधी रुपयांचा घोटाळा आणि रिझर्व्ह बँकेने त्याबाबत केलेली कारवाई यामुळे पुन्हा एकदा सहकारी बँकिंग क्षेत्र व बँकिंग क्षेत्राची नियामक असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या एकूण क्षमतेविषयीच सर्वसामान्यांमध्ये प्रश्न निर्माण होत आहेत. या आर्थिक गैरव्यवहाराचा घेतलेला लेखाजोखा.



# "न्यू इंडिया" प्रकरणी रिझर्व्ह बँकेकडेच संशयाची सुई?



मुंबईतील न्यू इंडिया सहकारी बँकेमध्ये फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या सप्ताहात 'स्पॉट' लेखापरीक्षण गैरव्यवहार उघडकीस आल्यामुळे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नुकतीच बँकेचे संचालक मंडळ एक वर्षासाठी बरखास्त करून तेथे प्रशासक व सल्लागार मंडळ नेमले आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया चे माजी सर्व व्यवस्थापक श्री श्रीकांत हे प्रशासक असून त्यांना सल्ला देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचे सर व्यवस्थापक श्री रविंद्र व सीए अभिजीत देशमुख यांची समिती नेमली आहे.

दरम्यान बँकेला नवीन कर्ज वाटप करण्यास, मुदत ठेवी घेण्यास व कोणतेही आर्थिक व्यवहार करण्यास मनाई केली आहे. एकंदरीतच बँकेचे व्यवहार स्थगित करण्याची कडक कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान २०१९ ते २०२५ कालावधीत बँकेचा महाव्यवस्थापक असलेल्या हितेश मेहता याला आर्थिक गुन्हे शाखेतर्फे अफरातफरीबद्दल अटक करण्यात आलेली आहे. हितेश याने पदाचा गैरवापर करून अन्य साथीदारांच्या मदतीने बँकेत कोट्यावधी रुपयांचा अपहार केल्याची कबुली दिली आहे. त्याने मुंबईतील धर्मेश पौन या बांधकाम व्यावसायिकाला ७० कोटी रुपये दिले होते. कांदिवली येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी त्याने ही रक्कम दिल्याचे उघडकीस आल्याने धर्मेश पौन यालाही पोलिसांनी ताब्यात घेतलेले आहे. परंतु या दोन व्यक्तींच्या अटकेमुळे खऱ्या प्रश्नाचे उत्तर मिळण्याची शक्यता नाही.

बँकेचे विद्यमान प्रमुख कार्यकारी अधिकारी देवर्षी घोष यांनी पोलिसांमध्ये दिलेल्या तक्रारीनंतर रिझर्व्ह बँकेने ही कारवाई केली आहे. वरकरणी हा

> एकंदरीत ही अफरातफर अचानकपणे एका रात्रीत झालेली नाही. याबाबत रिझर्व्ह बँकेने काही वर्षांपूर्वीच ही कारवाई करणे अपेक्षित होते. विशेषतः २०२१ पासून या बँकेमध्ये अचानकपणे मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम शिल्लक असल्याचे आढळलेले होते. त्याचवेळी बँकेच्या राखीव निधीमध्ये एक नवा पैसा नसल्याचे लक्षात आलेले होते. असे असतानाही गेल्या तीन वर्षात रिझर्व्ह बँकेच्या तपासणी पथकाने त्याबाबत कोणताही प्रश्न उपस्थित केला नाही किंवा यात काही गडबड असल्याचे निदर्शनास आणून दिले नाही. त्यामुळे या सर्व आर्थिक घोटाळ्यामागे रिझर्व्ह बँकेच्या उच्च पदस्थांचा हात आहे किंवा कसे याचा शोध घेण्याची निश्चित वेळ आलेली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे रिझर्व्ह बँकेने याबाबत दाखवलेला निष्काळजीपणा अत्यंत गंभीर आहे.किंबहुना या प्रकरणात रिझर्व्ह बँकेची अकार्यक्षमता प्रकर्षाने जाणवत असून कदाचित त्यांनी जाणून-बुजून हे प्रकरण झाकण्याचा प्रयत्न केला आहे किंवा कसे हे अत्यंत गंभीरपणे शोधले पाहिजे.



आर्थिक
प्रा. नंदकुमार काकिर्डे
राष्ट्रसंचार

घोटाळा बँकेतील अधिकाऱ्यांनी केलेला असला तरीही याबाबत महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो तो रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासारख्या नियामकाला आर्थिक घोटाळा शोधण्यात किंवा टाळण्यामध्ये आलेले अपयश हे अत्यंत गंभीर व महत्त्वाचे आहे.

न्यू इंडिया सहकारी बँकेच्या संबंधात एका माजी कर्मचाऱ्याने जानेवारी २०२० मध्ये रिझर्व्ह बँकेकडे लेखी तक्रार करून बँकेत आर्थिक गैरव्यवहार, व्यवहारातील अनियमितता, भ्रष्टाचार व अनैतिक व्यवहार होत असल्याबाबतचे पत्र पाठवले होते. या तक्रारी मध्ये बँकेचे अध्यक्ष हिरेन भानू यांचा सहभाग असल्याचेही नमूद करण्यात आले होते. बँकांच्या विविध शाखा व्यवस्थापकांना डावलून २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्जे बँकेच्या संचालक मंडळांनी दिल्याचा उल्लेख त्यात केला होता. यामध्ये बॉलीवूडमधील लोकप्रिय नटी प्रीती झिंटा हिला १८ कोटी रुपये असे कर्ज वाटप केले होते. ते थकल्यानंतर बँकेने ही रक्कम वसूल करण्याऐवजी 'राईट ऑफ' केलेली होती. तसेच राजहंस ग्रुप व अन्य काही उद्योजकांना मोठ्या प्रमाणावर कर्ज वाटप केले व ही सर्व कर्जे "अनुत्पादक कर्जे' म्हणून बुडीत झालेली आहेत. एका माजी कर्मचाऱ्यानी 'व्हिसल ब्लोअर' नात्याने केलेल्या तक्रारीचा संपूर्ण तपशील 'मनी लाईफ' या गुंतवणूक विषयक साप्ताहिकाने प्रसिद्ध केला आहे.

आरोपी हितेश मेहता याने बँकेतून २०२० पासून रोख रकमेची अफरातफर केल्याची कबुली दिलेली आहे. अशी जर वस्तुस्थिती होती तर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ला त्यांच्या दरवर्षीच्या बँकेच्या तपासणीमध्ये याबाबत काहीही सापडले नाही असे म्हणणे हे योग्य ठरणार नाही. विशेषतः रिझर्व्ह बँक जेव्हा बँकेच्या सर्व खात्यांची दरवर्षी तपासणी करत असते तेव्हा ते मुदत ठेवी, कर्जवाटप आणि त्याची वसुली, यासह प्रत्येक गोष्टी अत्यंत बारकाईने तपासत असते. एका माहितीनुसार रिझर्व बँकेचे तेच अधिकारी अनेक वर्षे या बँकेची तपासणी करत असून त्यांनी या बँकेला सातत्याने 'क्लीन चीट' दिलेली आहे. पीएमसी बँकेमधल्या गैरव्यवहार प्रकरणात याच तपासणी अधिकाऱ्यांचा संबंध असल्याचे सांगण्यात येते.

रिझर्व बँकेने दिनांक १२फेब्रुवारी २०२५ रोजी या बँकेच्या रोख रकमेची तपासणी केलेली होती मात्र त्यांनी त्याच वेळेला बँकेचे व्यवहार गोठवणे आवश्यक होते ते काम केले नाही. या घटनेनंतर २४ तास उलटून गेल्यानंतर नियमकाने ही कारवाई केलेली आहे. याचा अर्थ या काळात काही मंडळींना बँकेतील ठेवी काढून घेण्याची संधी त्यामुळे लाभली असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणात सीबीआय सारख्या संस्थेने किंवा आर्थिक गुन्हा अन्वेषण विभागाने तपासणी करून बँकेतील ठेवी कोणी काढून घेतल्या याचा शोध घेतला पाहिजे. जेव्हा रोख रक्कम गायब झाल्याचे रिझर्व्ह बँकेच्या लक्षात आले होते तेव्हाच त्यांनी का कारवाई केली नाही हा प्रश्न यामुळे निर्माण होत आहे.

हा आर्थिक घोटाळा शोधून काढण्यात रिझर्व्ह बँकेला सपशेल अपयश आलेले आहे हे नाकारता येणार नाही. उलटपक्षी यामुळे रिझर्व्ह बँके मधील अंतर्गत व्यवस्थेवर प्रकाश पडत आहे. त्यांच्या विविध विभागांमध्ये, अधिकाऱ्यांमध्ये योग्य समन्वयाचा अभाव असल्याचे या घटनेमुळे स्पष्ट होत आहे. एखाद्या नागरी बँकेमध्ये मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम गायब होते आणि त्याच्यावर कोणीही कारवाई करत नाही यावर विश्वास बसणे केवळ अवघड आहे. त्यामुळेच रिझर्व्ह बँकेतल्या काही अधिकाऱ्यांचे अशा नागरी सहकारी बँकांमध्ये "हित संबंध"आहेत किंवा कसे हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. या संबंधांचा त्यांना काही लाभ होत आहे किंवा कसे याचाही शोध घेण्याची गरज आहे.

सहकारी बँकिंग क्षेत्रात आर्थिक घोटाळा ही नवीन गोष्ट नाही. २०१९ मध्ये पंजाब अँड महाराष्ट्र सहकारी बँकेमध्ये ( पीएमसी) मोठा घोटाळा झाला होता. त्या घोटाळ्यामुळे रिझर्व बँकेने देशातील सर्व नागरी व बहुराज्य स्तरावरील सहकारी बँका आपल्या थेट नियंत्रणाखाली घेऊन त्यांच्यावर कडक नियंत्रण ठेवण्यास प्रारंभ केला. परंतु न्यू इंडिया सहकारी बँकेच्या प्रकरणात रिझर्व्ह बँकेची भूमिका संशयास्पद असून त्यांचे नियामकाचे पितळ उघडे पडले आहे असे वाटत आहे. याची केंद्रीय वित्त मंत्रालयाने वेळीच दखल घेतली नाही तर सर्वोच्च न्यायालयांमध्ये याबाबतचे दरवाजे ठोठावले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## न्यू इंडिया सहकारी बँकेच्या सध्या ३० शाखा

२०२२-२३ या आर्थिक वर्षात बँकेला २३ कोटी रुपयांचा निव्वळ तोटा होता तर २०२३-२४ या वर्षात हा निव्वळ तोटा ३१ कोटी रुपयांवर गेलेला होता. एवढेच नाही तर मार्च २०२४ अखेरच्या वर्षात बँकेचे कर्जवाटप १३३० कोटी रुपयांवरून ११७५ कोटी रुपयांवर घसरलेले होते. मात्र ठेवींचे प्रमाण याच काळात २४०६ कोटी रुपयांवरून २४३६ कोटी रुपयांवर थोडेसे वाढलेले होते. बँकेमध्ये १ लाख ३० हजार पेक्षा जास्त ठेवीदार असून ९० टक्के ठेवी पाच लाख रुपयांपेक्षा कमी रकमेच्या आहेत. यामध्ये बचत खात्यात २७.९५ टक्के म्हणजे ६७१.७५ कोटी रुपयांच्या ठेवी असून चालू खात्यामध्ये १०३.२१ कोटी रुपये आहेत. तसेच विविध मुदतीच्या १६५२.२५ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. त्याचे प्रमाण ६८ टक्क्यांच्या घरात आहे. या वर्षात बँकेचा भांडवल पर्याप्तता रेशो ९.०६ टक्के होता. नियमानुसार तो किमान दहा टक्के असण्याची आवश्यकता होती. परंतु बँकेने त्याचे पालन केलेले नव्हते. बँकेचा २०२३ अखेरचा जो ताळेबंद प्रसिद्ध झाला आहे त्या बँकेच्या हातात १२२ कोटी रुपयांची रोख रक्कम उपलब्ध होती. हीच रक्कम एप्रिल २०२४ या वर्षाच्या अखेरीस १३५ कोटी रुपयांवर गेलेली होती.

# समाजसुधारक गाडगेबाबा..

> जयंतीनिमित्त स्मरण करताना संत गाडगेबाबा यांच्या विचारांची उजळणी करणे गरजेचे ठरते. त्यांनी आयुष्यभर समाजातील अंधश्रद्धा, जातीपाती, अस्पृश्यता आणि कुपोषणाच्या विरोधात काम केले. त्यांच्या शिकवणीमुळे लाखो लोक जागरूक झाले आणि चुकीच्या परंपरा सोडून दिल्या. गाडगेबाबांनी समाजाला स्वच्छता पाळण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश दिला. त्यांचे समाजसुधारणेचे कार्य आजही महत्त्व राखून आहे.

भारत हा अनेक मान्यता मानणारा आणि जपणारा देश होता आणि आहे. इथे अनेक धर्म, पंथ असून जनमानसावर त्याचा प्रचंड पगडा आहे. कोणताही धर्म माणसाला वाममार्गाला नेत नाही, तशी शिकवण देत नाही. मात्र पाखंडी वा सामान्यांना कर्मकांडांमध्ये गुंतवणारे, त्यांचा विविध मार्गाने गैरफायदा घेणारे तथाकथित साधू, बाबा, गुरु समाजाला भरकवतात. अशांच्या नादी लागणारा समाज नेहमीच आधुनिक दृष्टिकोन, ज्ञान-विज्ञानाच्या वाटा, विद्याभ्यास यापासून कित्येक योजने लांब राहतो. बुवाबाजीमध्ये गुरफटलेला आणि घाबरलेला समाज दांभिकांच्या नादी लागून आणखी अधोगतीला लागतो. म्हणूनच त्याला जागेवर आणणाऱ्या, शहाणपणाच्या चार गोष्टी सांगणाऱ्या, सामान्यांना समजणाऱ्या भाषेत बोलून उपदेश करणाऱ्या लोकांची समाजाला नेहमीच गरज असते. आपल्याकडील संतांनी नेहमीच हे काम केले आहे. गाडगेमहाराज हे याच पंक्तीतील एक मोठे नाव. संत गाडगेबाबांनी आयुष्यभर जनांना चुकीच्या मार्गापासून दूर करण्याचे काम केले. म्हणूनच जयंती साजरी करताना त्यांच्या बहुमोल शिकवणीचे आणि कामाचे अवलोकन करायला हवे.

संत गाडगेबाबा यांचे कार्य समाज सुधारणा, शिक्षण आणि आचारधर्म यामध्ये फार मोठे होते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी सर्वसमावेशक आणि समतेच्या आधारे समाजातील चुकीच्या परंपरांचा आणि अंधश्रद्धांचा सातत्याने विरोध केला. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने समाजाला एक नवी दिशा दिली. म्हणूनच गाडगेबाबांचे जीवन आणि कार्य आजही प्रगल्भतेची प्रेरणा देणारे आहे असे म्हणावे लागेल. गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेडगाव येथे झाला. गाडगेबाबांचे खरं नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. पण ते गाडगेबाबा म्हणूनच ओळखले जायचे. अतिशय साधे जीवन जगणाऱ्या गाडगेबाबांना आधीपासूनच दीन-दुबळ्यांची, अनाथांची आणि गरिबांची काळजी घेणे आवडत असे.

आपल्या जीविताकार्यामध्ये त्यांनी केलेल्या अंधश्रध्देविरुद्ध संघर्षाचे महत्त्व वादातीत आहे. गाडगेबाबांनी अंधश्रद्धा आणि धार्मिक पाखंडाचा तीव्र विरोध केला. पाखंडी लोकांवर कठोर प्रहार केले. त्यांचे पितळ उघडे पाडले. अशा प्रथांचा विरोध करणे हेच गाडगेबाबा यांचे ध्येय होते. लोकांमध्ये अंधश्रद्धा निर्माण करणाऱ्या वृत्ती आणि प्रवृत्तींवर त्यांनी कठोर टीका केली. सर्वसामान्यांना त्याप्रती सजग केले. ते आपल्या प्रवचनांमध्ये योग्य विचारांवर जोर देत असत. समाजसुधारणेमधील त्यांचे हे योगदान फार मोठे होते. ते एक सर्वसमावेशक समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत होते. जातीपातीचे वर्चस्व आणि समाजात अस्पृश्यता टिकवून ठेवण्याच्या परंपरेला त्यांचा तीव्र विरोध होता. ते सर्वधर्मसमभावावर विश्वास ठेवणारे संतपुरुष होते. त्यांनी शिक्षणाचे महत्त्वही नेमके ओळखले होते. म्हणूनच त्यांनी सर्वांना शिक्षण देण्याचा विचार मांडला आणि त्या दृष्टीने कार्यही केले.

गाडगेबाबांनी स्वच्छतेला अत्यंत महत्त्व दिले. त्यांनी आपल्या उपदेशात त्यावर विशेष प्रकाश टाकलेला दिसतो. त्यांच्या मते, स्वच्छता हा व्यक्तीच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता. स्वच्छतेची आवश्यकता केवळ शारीरिक आरोग्याकरिता नव्हे तर मानसिक आणि आत्मिक शुद्धतेसाठीही असते, असे ते सांगायचे. त्यांनी लोकांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितलेच, पण त्याआधी स्वत: झाडू हाती घेत आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्यात पुढाकारही घेतला. लोकांसमोर बोलायला उभे राहण्यापूव आधी ते स्वत:च्या हाताने सगळा परिसर स्वच्छ करत असत. या कृतीतूनही स्वच्छतेच्या बाबतीत लोकांना जागरूक करण्याचे मोठे काम त्यांच्या हातून घडले. खेरीज गाडगेबाबांनी धर्माची खरी भावना लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी धर्माच्या नावावर होणाऱ्या अन्यायाचा तीव्र विरोध केला. त्यांच्या उपदेशात प्रत्येक व्यक्तीला न्याय देण्याचे आणि शुद्धतेच्या पथावर चालण्याचे निर्देश दिले.

संत गाडगेबाबांचा विचार आणि कार्य आजच्या काळातही अत्यंत महत्त्वाचे ठरते. आजही समाजाला जातीपाती, अंधश्रद्धा, महिलांची दुर्दशा, अन्याय आदी समस्या भेडसावताना दिसतात. आजही लोक अंधश्रद्धेच्या आहारी जात अघोरी कृत्ये करताना दिसतात. अशांना शहाणे करण्यासाठी गाडगेबाबांच्या विचारांची साथ घेणे गरजेचे ठरते.


स्मरण
उर्मिला राजोपाध्ये
राष्ट्रसंचार

गाडगेबाबा यांचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते, तर संपूर्ण भारतभर सुधारणा घडवण्याचे उद्दिष्ट ठेवून केलेले होते. खरे पाहता गरीब कुटुंबात जन्मलेल्या या व्यक्तीने लहानपणीच अनेक प्रकारचे दुःख पचवले होते. त्यांना विपरित परिस्थितीचा सामना करावा लागला होता. मात्र त्यापुढे हात न टेकता गाडगेबाबांनी वैयक्तिक आयुष्यातील समस्यांच्या बरोबरीने समाजाच्या समस्यांचाही खंबीरपणे सामना केला. ते कधीही मोह, माया किंवा ऐश्वर्याच्या मागे धावले नाहीत. आजच्या पिढीने या गुणांचेही महत्त्व जाणून घ्यायला हवे. त्या काळात अनेक धार्मिक, सामाजिक आणि पारंपरिक रुढींचे वर्चस्व होते. या चुकीच्या गोष्टींना समाजमान्यता होती. त्याची भीती होती, दडपण होते. मात्र यात अडकलेल्यांना बाहेर काढत, त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम संत गाडगेबाबांनी केले. प्रत्येक व्यक्तीला न्याय आणि संधी मिळायला हवी, असे म्हणत त्यांनी आपले काळापुढे नेणारे विचार खंबीरपणे मांडण्याचे काम आयुष्यभर केले.

अंधश्रद्धेबरोबरच त्यांनी असत्य परंपरांवरही प्रहार केला. त्यांनी त्याग, तप, योग इत्यादी गोष्टींवर अधिक लक्ष दिले. त्यात बुद्धीचे आणि समजुतीचे अधिष्ठान होते. थोडक्यात, त्यांनी आपल्या आचारधर्माची कल्पना दाखवून दिली. एक साधे जीवन जगण्यामध्येच खरी समृद्धी असल्याचे सोदाहरण स्पष्ट केले. ते लोकांना भेटत असत. उपदेश करत गावोगाव फिरत असत. आजही गाडगेबाबा संप्रदाय या माध्यमातून त्यांनी दिलेला उपदेश आणि केलेली लोकसेवा स्मरताना आणि त्याचा अनुनय करताना दिसतो. गाडगेबाबांचे कार्य आणि विचार नेहमीच प्रेरणादायक राहतील. त्यांनी जीवनातील अडचणींचा सामना करत एक साधेपणाचे आणि समाजसुधारक व्यक्तिमत्व निर्माण केले. ते विचार आणि कार्य काळाच्या पुढे ठेवणारे संत होते. आजही गाडगेबाबांच्या जीवन आणि कार्याचा प्रभाव समाजावर आहे.


## स्वच्छतेची जनजागृती

**संत गाडगेबाबा यांनी समजातील अंधश्रद्धा, जातीपाती, अस्पृश्यता आणि कुपोषणाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर काम केले. त्यांच्या शिकवणीमुळे लाखो लोक जागरूक झाले आणि त्यांनी जीवनातील चुकीच्या परंपरा सोडून दिल्या. गाडगेबाबांनी समाजाला स्वच्छता पाळण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश दिला. त्यांनी स्वत: इतरांच्या भल्यासाठी काम केले आणि तेच करण्याचा सल्ला इतरांनाही दिला. त्यांचे समाजसुधारक कार्य प्रामुख्याने काही प्रमुख बाबींवर आधारित होते. त्यांनी नेहमीच मानवतेचे आणि शुद्धतेचे, स्वच्छतेचे महत्त्व मांडले. समाजासमोरील अनेक समस्या आणि अडचणींचे निराकरण करण्याची क्षमता आणि इच्छा असल्यामुळेच त्यांना सर्वसामान्य जनतेमध्ये मोठा आदर प्राप्त झाला होता. आजही त्यांच्या नावाचा उल्लेख करताना या बहुमोल कामाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते.**



# दिल चाहता है तुम्हे; अक्षय...

"हिमालय पुत्र" बनून त्याने "ताल" धरत. "हलचल" करत त्याने "हंगामा" केला. मात्र "दिल चाहता है" म्हणत ऐतराज करत त्याने अभियाची "बॉर्डर" ओलांडली. "गांधी इस माय फादर" तो कधी म्हणाला मात्र दृश्यम च्या दूरदृष्टीने त्याने "हमराज" म्हणत तो बोलला आ अब लोट चले, "दीवार" बनून त्याने "नकाब" हटवत तो म्हणाला "मेरे बाप पेहले आप" मात्र "रेस" व शॉर्ट कट न काढता त्याने "नो प्रॉब्लेम" म्हणत. "गली गली चोर है" नारा दिला. वडिलांचा आणि "मॉम" आशीर्वाद घेत कितीही "तीस मार खान" लोक असले तरी असले तरी त्याने "सब कुशल मंगल म्हणत" अभिनयाचा अविरत प्रवास सुरू ठेवला. "डोली सजा के रखना" म्हणाला मात्र लग्नाच्या बंधनात तो अडकला नाही. त्यामुळेच तो एकटा राहुल "छावा" बनून चित्रपटसृष्टीत गर्जत राहिला. तो म्हणजे अक्षय खन्ना म्हणून म्हणावेसे वाटत दिलं चाहता है तुम्हे अक्षय...



व्यक्तिविशेष
रामकुमार शेडगे
राष्ट्रसंचार

गेल्या तीन दशकांपासून अक्षय खन्ना नावाचं वादळ चित्रपटसृष्टीमध्ये घोंगावत असून या वादळाने अनेक चित्रपटांना त्याच्या आवाक्यात घेतले आहे. मुळात

अक्षय नावाचा अर्थच अविनाशी, शाश्वत, अमर असा होतो. नावाप्रमाणेच तो आहे. अक्षय खन्ना हा ज्येष्ठ अभिनेते विनोद खन्ना यांचा मुलगा असून अफाट प्रतिभा आणि एक प्रसिद्ध स्टारकिड असूनही, या अभिनेत्याला इंडस्ट्रीत हवं तसं यश मिळू शकलं नाही ? वयाच्या ४९ वर्षांचा असलेल्या अक्षय खन्नाची एकूण संपत्ती १४८ कोटी इतकी आहे. अक्षय खन्ना श्रीमंत अभिनेत्यापैकी एक असून कोणत्याही वादाच्या भोवऱ्यात न अडकलेला हा गुणी अभिनेता नुकताच प्रसिद्ध झालेल्या छावा चित्रपटाच्या निमित्ताने तो सध्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

अक्षय खन्नाने १९९७ मध्ये 'हिमालय पुत्र' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या चित्रपटाची निर्मिती अभिनेत्याचे वडील आणि ज्येष्ठ अभिनेते विनोद खन्ना यांनी केली होती. जरी 'हिमालय पुत्र' बॉक्स ऑफिसवर काही विशेष कामगिरी दाखवू शकला नसला तरी या चित्रपटाने इंडस्ट्रीचे दरवाजे अक्षयसाठी खुले केले होते. अक्षय खन्नाला इंडस्ट्रीत खरी ओळख 'बॉर्डर' या चित्रपटातून मिळाली. विशेष म्हणजे मल्टिस्टारर चित्रपट असूनही अक्षय खन्नाने आपल्या अभिनयाने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. या चित्रपटासाठी अक्षय खन्नाला

बॉर्डरसाठी सर्वोत्कृष्ट पदार्पण अभिनेता म्हणून फिल्मफेअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

त्याचं बरोबर दिल चाहता है या चित्रपटाध्ये सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून त्याला फिल्मफेअर मिळाले होते. शिवाय 'हमराज' चित्रपटात अक्षय खन्ना नकारात्मक भूमिकेत दिसला होता. या चित्रपटातही अभिनेत्याने आपल्या अभिनयासाठी बरीच प्रशंसा मिळवली होती. मुख्य भूमिकेत दिसलेल्या बॉबी देओलच्या व्यक्तिरेखेपेक्षाही अक्षय खन्नाचं पात्र अधिकभाव खाऊन गेलं होतं. अक्षय खन्नाने आजपर्यंत लग्न केलेलं नाही. एके काळची प्रसिद्ध अभिनेत्री करिश्मा कपूर सोबत त्याचे लग्न ठरले होते. मात्र काही कारणास्तव तो विवाहबंधनात अडकला नाही.

विनोदी, गंभीर किंवा ॲक्शन भूमिका कोणतीही असो ती भूमिका अक्षय खन्ना जगला व त्याने रुपेरी पडद्यावर त्या भूमिका मोठ्या ताकतीने त्यांने लीलया पार पाडल्या.

तीस मार खान, हंगामा चित्रपट त्यांने साकारलेल्या विनोदी भूमिकांनी रसिक प्रेक्षकांना खळखळून हसवले. तर ताल, आ अब लोट चले, हलचल चित्रपटातील त्यांच्या प्रियकराच्या भूमिकांनी कित्येक तरुणांना खऱ्या प्रेमाची परिभाषा त्याने सांगितली. त्याचा २००१ मध्ये आलेला दिल चाहता है हा चित्रपट खऱ्या अर्थाने मास्टरपीस होता. शारीरिक प्रेमापेक्षा व्यक्तीप्रेम, त्या व्यक्तीच्या कलागुणांवर निखळ प्रेम कसं करायचं यात तो सांगून गेला.

बार्डरमधील निरागस, जगाशी अनभिज्ञ आणि देशावर अतुट प्रेम करणाऱ्या सच्चा सैनिकाची त्याने साकारलेली भूमिका प्रत्येक देशप्रेमी व्यक्तीच्या डोळ्यात अंजन घालणारी होती. अशा त्याने अनेक चित्रपटात साकारलेल्या भूमिका त्यांनी अजरामर केल्या. नुकताच प्रदर्शित झालेल्या छावा चित्रपटात त्याने साकारलेला क्रूरकर्मा औरंगजेब अंगावर काटे आणतो. अतिशय कमी संवाद, मितभाषी आणि मोजकेच बोलणारे औरंगजेबाचे पात्र त्याने मोठ्या ताकतीने साकारले आहे. खराखुरा औरंगजेब त्याने साकारलेल्याने हे त्याचे पात्र जिवंत झाले असून एवढ्या मोठ्या ताकदीचा अभिनेता पुन्हा एकदा छावा चित्रपटाच्या निमित्ताने रसिकांच्या मनावर अधिराज्य करायला लागला आहे.

मोजकेच चित्रपट करणारा, प्रसिद्धी, चित्रपटांची झगमगती दुनियेपासून लांब व एकांतात जीवन जगणारा हा अभिनेता सध्या अलिबागमध्ये कित्येक वर्षांपासून वास्तव करतोय. या बहुगुणी अभिनेत्याचे उत्तरोत्तर दर्जेदार चित्रपट मायबाप रसिक प्रेक्षकांना पाहायला मिळतील हीच अपेक्षा मी करेन. राहून राहून का कुणास ठाउक मला नेहमी वाटत. झाले बहु होतिल बहु परी तू तुझ्या सारखा.. अक्षय खन्ना या अभिनेत्याने भविष्य काळात उत्तमोत्तम चित्रपट करावेत. अक्षयला भेटलेल्या या अभिनयाच्या कलेच्या वर्धानाला त्याने अमर करावं.

## पतीला कुटुंबापासून वेगळे करणे पत्नीला महागात..!



एकत्रित कुटुंब पद्धती हळूहळू संपायला लागली आहे. पती पत्नी आणि मुले एवढ्याच माणसांचा संसार अशी एक नवी पद्धत रूढ होत आहे. एकत्रित कुटुंब पद्धतीचे आणि विभक्त कुटुंब पद्धतीचे फायदे तोटे असेल तरी पतीला त्याच्या कुटुंबापासून तोडणे किंवा वेगळे करणे महागात पडू शकते, असाच एक निकाल छत्तीसगड उच्च न्यायालयाने दिला आहे. - ॲड. गायत्री कांबळे



कायदा
ॲड. गायत्री कांबळे
राष्ट्रसंचार

महिलांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे हे स्त्रीवादी सामाजिक संघटना, राष्ट्रीय महिला आयोग आणि महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या शिफारशींवरून तयार केले जातात. आजकाल आपण बघितले तर कौटुंबिक वादातून न्यायालयात दाखल होणाऱ्या प्रकरणांचे प्रमाण साधारण ४८ टक्के इतके आहे. अनेकदा पती पत्नीच्या वादात एकतर्फी, पक्षपाती आणि कौटुंबिक जीवनासाठी हानिकारक अशा घटना घडतात आणि प्रकरण न्यायालयात पोहोचले. एकदा कौटुंबिक प्रकरण पोलिस स्टेशन आणि न्यायालयात गेले की तडजोडीपेक्षा बदला घेण्याची भावना निर्माण होते. मात्र, हीच भावना कुटुंबे दुरवण्याचे कारण बनतात. अशाच एका प्रकरणात छत्तीसगड उच्च न्यायालयाने महत्वपूर्ण निकाल दिला आहे.

या प्रकरणातील पत्नीने ग्रामीण भागात राहण्यास नकार आणि करिअर करण्याची इच्छा असल्याचे कारण देत पतीला त्याच्या कुटुंबापासून वेगळे राहण्याचा आग्रह धरला होता. त्या प्रकरणात पतीने आई वडिलांपासून वेगळे राहण्याचा आग्रह धरणाऱ्या महिलेविरोधात मोठा निर्णय देत न्यायालयाने पतीचा घटस्फोटाचा अर्ज मंजूर केला आहे. यावेळी न्यायालयाने मुलांचे पालकांप्रती असलेल्या जबाबदारीचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत, असे म्हटले आहे की, भारतात मुलांनी पत्नीच्या सांगण्यावरून पालकांना सोडून देण्याची प्रथा नाही. मुलांनी पालकांचा सांभाळ केला पाहिजे.

या प्रकरणातील पती आणि पत्नीचे २०१७ मध्ये लग्न झाले होते. लग्नानंतर काही काळातच, पत्नीने ग्रामीण भागात राहण्यास नकार आणि करिअर करण्याची इच्छा असल्याचे कारण देत पतीला त्याच्या कुटुंबापासून वेगळे राहण्याचा आग्रह धरला होता. यानंतर पतीने यावर मार्ग काढत शहरात भाड्याने घर घेतले होते. तरीही पत्नीचे वर्तन बदलले नाही. त्यामुळे पतीने क्रूरतेच्या आधारावर सत्र न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. सत्र न्यायालयाने पतीचा अर्ज फेटाळला होता. त्याला पत्नीच्या मानसिक क्रूरतेविरोधात समाधानकारक पुरावे सादर करता आले नव्हते. त्यानंतर पतीने या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील केले होते. तिथे सबळ पुरावे सादर करून पत्नी त्याच्या कुटुंबासोबत राहण्यास सतत नकार देते आणि अनादरपूर्ण वर्तन करते ही मानसिक क्रूरता आहे, असा युक्तिवाद केला. त्यामुळे उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द करत, असे निरीक्षण नोंदवले की, या प्रकरणात पत्नीचे वर्तन हे मानसिक क्रूरताच आहे. पालकांच्या वृद्धापकाळात, विशेषतः जेव्हा त्यांचे उत्पन्न मर्यादित असते तेव्हा त्यांची काळजी घेणे मुलाचे नैतिक आणि कायदेशीर कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाने विशेषतः पत्नीच्या पतीच्या कुटुंबापासून वेगळे राहण्याच्या आग्रहाच्या मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले. 'कोणत्याही उचित कारणाशिवाय पतीला त्याच्या कुटुंबापासून वेगळे राहण्यास भाग पाडणे हे क्रूरतेचे कृत्य आहे,'

उच्च न्यायालयाने घटस्फोट मंजूर करत, पत्नीचे शिक्षण आणि दोन्ही पक्षांची सामाजिक-आर्थिक स्थिती लक्षात घेऊन पतीला दोन महिन्याच्या आत पत्नीला कायमस्वरूपी पोटगी म्हणून ५ लाख रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत.

# परमिसिव्ह पॅरेंटिंग

**भुणभुण नको म्हणून तुम्हीही मुलांच्या सगळ्या गोष्टींना 'हो' म्हणता? तज्ज्ञ सांगतात, मुलांनी नकारच ऐकला नसेल तर..... हल्लीच्या काळात कुठे ३, ४ मुलं असतात. आमचं एकुलतं एक मूल आहे. त्याचे लाड नाही करणार तर कोणाचे करणार?" "एवढं कमवतो कोणासाठी?" "अहो, तो किंवा ती इतका हट्टीपणा करतात, की शेवटी नाईलाज होतो आणि ते म्हणतील तसं करुन टाकतो, सततची भुणभुण कोण ऐकत राहणार." अशी अनेक वाक्य आपल्या कानावर पडत असतात. काही ना काही कारणांनी तुम्हीही मुलांचे सगळे हट्ट पुरवत असाल आणि त्यांनी काही मागितल्यावर लगेचच ती गोष्ट पुरवत असाल तर याबाबत तज्ज्ञ काय म्हणतात समजून घ्यायलाच हवं.**

सामाजिक
सुनिल इनामदार
राष्ट्रसंचार

प्रसिद्ध पालकत्व समुपदेशक श्वेता गांधी यांनी यासंदर्भात काही सोप्या टिप्स दिल्या आहेत. अशाप्रकारचे परमिसिव्ह पॅरेंटींग मुलांसाठी आणि पालकांसाठीही कसे चांगले नसते याबाबत त्यांनी काही गोष्टी नेमकेपणाने सांगितल्या आहेत, त्या कोणत्या पाहूया..

**• परमिसिव्ह पॅरेंटिंग म्हणजे काय...?**

मुलांच्या सर्व मागण्या पूर्ण करणे, त्यांना नकाराची सवय न लावणे, ते मागत असलेल्या गोष्टीच्या आवश्यकतेचा विचार न करता मुलांना वस्तू पुरवणे अशाप्रकारच्या पालकत्वाला परमिसिव्ह पॅरेंटिंग म्हणतात. अशाप्रकारच्या पालकत्वामुळे मुले अधिकाधिक हट्टी होत जातात. त्यांना प्रत्येक गोष्ट त्यांच्या पद्धतीने होणे अपेक्षित असते. जर तसे नाही झाले तर ते आक्रस्ताळेपणा करतात. अशा मुलांना नियम, सीमा कळत नाहीत. विशेष म्हणजे जे पालक अशाप्रकारे मुलांच्या सर्व मागण्या पूर्ण करतात त्यांना स्वयंशिस्त व भावनिक नियमन करण्यात अडचणी येतात. या मुलांना समाजात वावरणेही अवघड जाते. असे होऊ नये म्हणून प्रेम आणि लाड करतानाच मुलांना शिस्त आणि नियम यांचीही ओळख वेळीच करुन द्यायला हवी.

आता हे करायचे म्हणजे नेमके काय करायचे पाहूया...

मुलांना शिस्त कशी लावावी...?

१. स्पष्ट सीमारेषा असाव्या...

मुलांसाठी काही साधे व सोपे नियम आखावेत. त्या नियमांशी पालकांनी घट्ट असावे. त्यामुळे मुलांना नियम, सीमा कळतात आणि त्यानुसार ते स्वतःला बदलतात.



२. संतुलित शिस्त शिकवा...

शिस्तीच्या बाबतीत कठोर नाही पण प्रेमळ तरीही दृढ राहत नियमांचे पालन करत त्यामागचे उद्देश स्पष्टपणे समजावून सांगावेत. त्याचा मुलांच्या विकासासाठी नक्कीच फायदा होतो.

३. आत्मनिर्भर होण्यावर भर द्या...

मुलांना त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडू द्या. त्याचे परिणाम काय होतात ते त्यांना शिकू द्या.

४. भावनांवर नियंत्रण शिकवा...

मुलांना त्यांच्या भावना ओळखण्यास आणि त्यांचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन करण्यास मदत करायला हवी, यामुळे मुलांमध्ये नकळत शांत राहण्याची वृत्ती निर्माण होईल.

५. समस्या सोडवण्यास प्रोत्साहन द्या...

मुलांना त्यांच्यासमोर येणाऱ्या आव्हानांवर उपाय शोधण्यासाठी, जबाबदारी घेण्यासाठी प्रोत्साहित करा.

६. स्क्रीन टाइम कमी करा...

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मुलांना खेळ, वाचन अशा गोष्टींमध्ये रमवा, जेणेकरुन त्यांचा स्क्रीन टाइम कमी होईल. स्क्रीन टाइमबाबतची सीमारेषा स्पष्ट असायला हवी म्हणजे त्याचा त्रास होणार नाही.



# महान स्वातंत्र्य सेनानी राणी चेन्नमा





स्मरण
श्याम ठाणेदार
राष्ट्रसंचार

इंग्रजांनी आपल्या देशावर सुमारे पावणे दोनशे वर्ष राज्य केले. या पावणे दोनशे वर्षांत त्यांनी आपल्यावर अनेक अन्याय अत्याचार केले. इंग्रजांच्या याच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लाखो ज्ञात अज्ञात देशभक्त बांधवांनी लढा दिला त्यात काही महिलाही होत्या हे मात्र अतिशय कमी लोकांना माहीत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महिलांची यादी जर काढली तर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या महिलांची नावे आपल्याला आठवतील कारण बऱ्याच महिला स्वातंत्र्य सैनिकांची म्हणा किंवा देशासाठी त्याग करणाऱ्या देशभक्त महिलांची म्हणा आपल्या इतिहासकारांनी नोंदच घेतली नाही त्यामुळे त्यांचा इतिहास नवीन पिढीच्या समोर आलाच नाही. अशाच एका देशभक्त महिला स्वातंत्र्य सेनानीच्या शौर्याची माहिती आज आपण या लेखातून घेऊ कारण आज त्या महान महिला स्वातंत्र्य सेनानीची काल म्हणजे २१ फेब्रुवारी रोजी पुण्यतिथी होती. त्या महान स्वातंत्र्य सेनानीचे नाव आहे कित्तुरची राणी चेनम्मा.

२३ ऑक्टोबर १७७८ रोजी बेळगाव येथील काकटी या छोट्या गावात राणी चेन्नमा यांचा जन्म झाला. लहानणापासूनच धाडसी असलेल्या राणी चेन्नमा यांना त्यांचे वडील धुळाप्पा देसाई गौड्रारू यांनी घोडेस्वारी करणे, तलवार चालवणे, भाला फेकणे याचे शिक्षण दिले. वयाच्या पंधराव्या वर्षी राणी चेन्नमा यांचा विवाह देसाई कुटुंबातील राजा मल्लसराज यांच्याशी झाला. मात्र १८२४ हे वर्ष त्यांच्यासाठी दुर्भग्याचे वर्ष ठरले कारण याच वर्षी त्यांच्या पतीचे आणि मुलाचेही निधन झाले. एकाच वर्षी पती आणि मुलगा सोडून गेल्याने त्यांच्यावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला. राजा मल्लसराज यांच्या निधनाने त्यांच्या राज्यात अस्थैर्य माजले याचा लाभ घेण्यासाठी इंग्रजांनी त्यांच्या राज्यावर आक्रमण करण्याचे ठरवले. इंग्रजांकडून राज्य वाचवण्याची फार मोठी जबादारी राणी चेन्नमा यांच्यावर येऊन पडली मात्र त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी तात्काळ आपली राजधानी डोंगर भागात हलवली.

राजगादीला वारस असावा म्हणून त्यांनी शिवलिंगप्पा नावाचा पुत्र दत्तक घेतला व त्याला राज्याचा उत्तराधिकारी बनवले मात्र तत्कालीन ब्रिटिश अधिकारी लॉर्ड डलहौसी याने दत्तक विधान नाकारत शिवलिंगप्पा याची राज्याचा वारसदार म्हणून हाकलपट्टी करण्याचा आदेश दिला. जर एखाद्या राज्याचा राजा निधन पावला आणि त्याला वारस नसेल तर दत्तक असलेला पुत्र राज्याचा वारस होऊ शकत नाही त्यामुळे ते राज्य खालसा करून तिथे ब्रिटिश अंमल सुरू करण्याचा निर्णय इंग्रजांनी घेतला होता त्यामुळे कोणत्याही परीस्थितीत आपले राज्य इंग्रजांच्या ताब्यात जाऊ द्यायचे नाही असा निर्धारच राणी चेन्नमा यांनी केला होता.

कित्तुरचे राज्य हे धारवाड जिल्ह्यात येत होते. सेंट जॉन थाच्रेय हा त्यावेळी धारवाडचा गव्हर्नर होता तर चॅप्लिन हा कमिशनर होता. या दोघांनीही राणी चेन्नमा यांना राज्य खालसा करण्याची सूचना केली आणि तसे न केल्यास युद्धास तयार राहण्यास सांगितले. राणी चेन्नमा यांनी शेवटचा पर्याय म्हणून बॉम्बे प्रेसिडेंटचे लेफ्टनंट गव्हर्नर एल्फिन्स्टन यांना राज्य खालसा न करण्याबाबत विनंती अर्ज केला मात्र त्यांनी तो धुडकावून लावत कितुरवर हल्ला चढवला. इंग्रजांनी कित्तुरवर हल्ला चढवला आणि कित्तुरचा खजिना लुटण्याचा प्रयत्न केला. कित्तुरच्या खजिन्यात त्यावेळी मौल्यवान दागदागिने आणि दीड कोट रुपये इतका खजिना होता. इंग्रजांच्या मद्रास नेटीव्ह हॉर्स अर्टेलरीच्या तिसऱ्या तुकडीत २० हजारांपेक्षा अधिक सैनिक होते त्यात सुमारे ४०० पेक्षा अधिक सैनिक हे बंदूकधारी होते मात्र राणी चेन्नमा यांचे सैन्यही कमी नव्हते त्यांनी इंग्रज सैन्या विरुद्ध निकराचा लढा दिला आणि इंग्रज सैन्याचा धुव्वा उडवला. राणी चेन्नमा यांचे सैन्य आपल्याशी अशाप्रकारे धैर्याने मुकाबला करतील अशी अपेक्षा इंग्रजांना नव्हती त्यांनी राणी चेन्नमाच्या सैन्याला हलक्यात घेतले. राणी चेन्नमाचे सैन्याचे बळ इंग्रजांच्या तुलनेत अल्प होते मात्र राणी चेन्नमा यांनी आपल्या सैनिकांमध्ये स्फूर्ती निर्माण केली. आपली राणी महिला असूनही इंग्रजांशी निकराने लढते हे पाहून त्यांनाही स्फुरण चढले आणि त्यांनी इंग्रज सैन्याचा पराभव केला. या युद्धात सेंट जॉन हा गव्हर्नर मारला गेला. इंग्रजांच्या काही अधिकाऱ्यांना राणी चेन्नमा यांच्या सैनिकांनी बंदी बनवले. युद्ध बंदी करण्याच्या अटीवरच या अधियाऱ्यांची सुटका करण्यात आली. युद्ध बंदीचा करार करूनही इंग्रज अधिकाऱ्यांनी तो पाळला नाही. कमिशनर चॅप्लिन याने मोठ्या ताकदीनिशी कुत्तुरवर पुन्हा हल्ला केला. यावेळीही राणी चेन्नमाच्या सैन्याने निकराने लढा दिला मात्र बैलहोगल किल्ल्यात राणी चेन्नमा पकडल्या गेल्या आणि त्यांना कैदेत टाकण्यात आले. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी इंग्रजांच्या कैदेतच राणी चेन्नमा यांचे निधन झाले. राणी चेन्नमा यांच्या निधनानंतरही राणीचे सैन्य इंग्रजांशी लढत राहिले मात्र तो लढा अपयशी ठरला. मात्र राणी चेन्नमा यांचे शौर्य पाहून इंग्रज अधिकाऱ्यांनी त्यांना सलाम केला. राणी चेन्नमा यांचे शौर्य इतिहासाच्या पानावरील एक स्फूर्तिदायक अध्याय आहे मात्र आजही हा इतिहास तरुण पिढीपासून दूर आहे म्हणूनच हा लेख प्रपंच. भारतीय इतिहासातील एक सुवर्ण अध्याय म्हणून राणी चेन्नमा यांच्या लढ्याकडे पाहायला हवे. पुण्यतिथीनिमित्त राणी चेन्नमा यांना विनम्र अभिवादन!

# IPL ला टक्कर देणारी WPL



क्रिकेट
गायत्री चंदावरकर
राष्ट्रसंचार

भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकी असला तरी क्रिकेट हाच अघोषित सर्वात लोकप्रिय राष्ट्रीय खेळ आहे. काही क्रिकेट प्रेमी तर क्रिकेट हाच भारताचा धर्म आणि श्वास आहे असेही मानतात. हा अतिरेकी विचार मानला नाही तरीही क्रिकेट हाच खेळ आसेतुहिमाचल अत्यंत लोकप्रिय खेळ आहे हे मान्य करावेच लागते.

इंग्रजांनी अठराव्या शतकात क्रिकेट खेळ भारतात आणला तरी एकोणिसाव्या शतकात साधारणपणे १९३० सालानंतर पुरुषांची भारतीय क्रिकेट टीम आंतराष्ट्रीय क्रिकेट खेळू लागली. तो इतिहास बघता ५०० हुन अधिक टेस्ट मॅचेस, १००० हुन अधिक ODI आणि २०० हुन अधिक T२० मॅचेस भारतीय क्रिकेटपटूंनी खेळल्या असून अनेक विश्वविक्रम त्यांच्या नावावर आहेत. तेव्हा पासून अर्थातच अनेक प्रसिद्ध, सुप्रसिद्ध आणि जगप्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू झाले. त्यातही फलदांज, गोलंदाज यांची यादी मोठी आहे. सुनील गावस्कर यांनी जागतिक कीर्ती प्राप्त केली. त्यानंतर सचिन तेंडुलकर याने तर गॉड ऑफ क्रिकेट अशी उपाधी मिळवली. पहिला विश्व चषक जिंकणारा कॅप्टन म्हणून कपिल देव निखंज याने जागतिक क्रिकेट विश्वावर पताका फडकवली. पुढे महेंद्र सिंग धोनी आणि नुकतीच रोहित शर्मा याने आपल्या नावाची मोहोर उमटवली.

## भारतीय महिला क्रिकेटची सुरुवात

- भारतीय महिला क्रिकेटची सुरुवात फार उशिरा म्हणजे १९७३ साली सुरु झाली. तेव्हा पासून आजतागायत ४१ टेस्ट मॅचेस खेळलय त्यात ८ जिंकल्या, ३२२ ODI मॅचेस मध्ये १७६ जिंकल्या तर १९९ T२० मॅचेस खेळून १०८ मॅचेस जिंकूनही, भारतीय महिला क्रिकेट खेळाडूंचे म्हणावे तसे कौतुक झाले नाही. त्यातील मोजक्याच खेळाडू लोकप्रिय झाल्या. त्यांची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे दोनदा भारतीय महिला क्रिकेट टीमने वर्ल्ड कप मध्ये अंतिम फेरीत धडक मारली मात्र अपयशी ठरली. मात्र ODI आशिया कप त्यांनी तब्बल ४ वेळा जिंकला आहे.
- सगळ्यात नामांकित क्रिकेट खेळाडूचा मान मिताली राजचा आहे. तिचा चित्रपट पाहिल्यावर महिला क्रिकेटपटूंनी किती कष्ट करत, घरच्यांचा, समाजाचा व व्यवस्थेच्या प्रखर विरोधाचा सामना करत, निराश न होता, कडवी झुंज देत गेली तीन-चार दशके महि ला क्रिकेटपटूंना उत्तम संधी आणि थोड्याफार मानाचे स्थान मिळवून दिले आहे.

## २०२३ पासून सुरु झालेल्या WPL टूर्नामेंटचा धडाका

- आता मात्र भारतीय महिला क्रिकेट टीमने तसेच BCCIने देखील कात टाकलेली दिसते आहे. याचे कारण म्हणजे २०२२-२३ पासून मात्र भारतीय महिला क्रिकेटचे दिवस पालटू लागले. टीव्ही वरील अनेक स्पोर्ट्स चॅनेल्स त्यांच्या मॅचेस दाखवू लागले. त्यासाठी जाहिरात करू लागले. आता तर महिला क्रिकेट स्टार्स तयार होतांना दिसतात आहेत. २०१७ सालच्या वर्ल्डकप मध्ये नाबाद १७१ रन्स काढणाऱ्या हरमनप्रीत कौरने तर असंख्य मुलींना क्रिकेटपटू बनण्याची प्रेरणा दिली आहे. आजची आघाडीची क्रिकेटपटू स्मृती मंधाना आता क्रिकेटची युवराज्ञी म्हणून ओळखली जाऊ लागली आहे, ही फारच आश्वासक गोष्ट आहे.
- २०२३ पासून सुरु झालेली WPL (Women's Premier Leage) टूर्नामेंट, आता २०२५ साली मोठ्या धडाक्यात सुरु आहे. जगप्रसिद्ध टाटा ग्रुप हा या स्पर्धांचा मुख्य प्रायोजक असून दस्तुरखुद्द मुकेश अंबानी यांनी जियो-हॉटस्टार वर या मॅचेसना जबरदस्त लोकप्रियता मिळावी म्हणून सगळी स्टार पॉवर म्हणजेच माधुरी दीक्षित पासून अनेक बॉलीवूड स्टार्स आणि लोकप्रिय क्रिकेटपटूंची जाहिरातीत वर्णी लावल्याने WPL लोकप्रियता प्रचंड प्रमाणावर वाढू लागली आहे.
- उल्लेखनीय बाब म्हणजे WPL मधील प्रत्येक भारतीय महिला खेळाडू आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट खेळतात आहेत. इतर पाश्चात्य महिला खेळाडूंसारखा त्यांचा फिटनेस, खेळावरील पकड आणि हुकूमत दिसते आहे. थोडक्यात, त्यांना आंतराष्ट्रीय दर्जाचे ट्रेनिंग मिळाले असून बॅटिंग, बॉलिंग, फिल्डिंग तसेच कीपिंग मधील त्यांचे प्राविण्य उठून दिसते आहे. एकंदरीत त्या तरबेज क्रिकेटपटू म्हणून अगदी पुरुष क्रिकेट खेळाडूंच्या तोडीसतोड क्रिकेट खेळतात आहेत हे बघून अभिमान वाटतो आहे.

- २०२३ सालच्या पहिल्या WPLची विजेती टीम होती मुंबई इंडियन्सची! २०२४ साली रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू ही टीम विजेती ठरली. यावेळीही, गुजरात जायन्ट्स, दिल्ली कॅपिटल्स, मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरू आणि UP वॉरिर्झ हे पाच संघ जबरदस्त आणि दमदार क्रिकेट खेळून एकमेकांना हरवण्याची मोठ्या निकराने खेळतात आहेत. स्मृती मंधाना बरोबरच रिचा घोष, शेफाली वर्मा सारख्या बॅटर्स तसेच शब्निम इब्राहिम, संस्कृती गुप्ता, शिखा पांडे, अमानज्योत कौर यांच्या सारखया कसलेल्या बॉलर्स आहेत. प्रत्येक मॅचमध्ये तरबेज बॅटर्स, बोलर्स आणि फिल्डर्स बघून प्रेक्षकांना आंतराष्ट्रीय दर्जाचा खेळ बघतोय याचा थरार आणि समाधान आहे हे फार मोलाचे आहे. दिवसेंदिवस कोण जिंकणार याची उत्सुकता वाढते आहे.
- कजारिया टाईल्सने अतिशय वेधक जाहिरात केली आहे. त्यात अगदी साडी नेसलेल्या किंवा घागरा घातलेल्या बायका क्रिकेट खेळताना दाखवल्या आहेत. SBI बँकेने देखील महिला सबलीकरणाची उत्तम जाहिरात करत क्रिकेटची युवराज्ञी स्मृती मंधानाला त्यांची ब्रँड ॲम्बॅसेडर केली आहे. WPL आता बऱ्याच जाहिराती मिळू लागल्या आहेत. त्यामुळे पुढे जाऊन IPL ला सगळ्या अर्थाने म्हणजेच खेळाचा दर्जा, प्राविण्य आणि लोकप्रियता यांना आव्हान देणारी WPL स्पर्धा आहे यात शंका नाही.

## WPL बदलतं आहे भावी आणि नवोदित खेळाडूंचे वास्तव

- WPL मध्ये महिला क्रिकेट पटूंना कोट्यवधींची पॅकेजेस मिळतात आहेत हे जसे भावी खेळाडूंना प्रेरणादायी वाटते त्यापेक्षाही देशासाठी खेळणे आणि देशाला वर्ल्डकप मिळवून देणे हे अनेक भावी महिला क्रिकेट खेळाडूंना अधिक स्फुर्तीदायी वाटते.
- गेल्या काही वर्षांपासून WPL तसेच महिला क्रिकेट मध्ये उत्तम करिअर करता येईल असे आता पालकांना आणि त्यांच्या पाल्यांना वाटू लागले आहे हे अतिशय मोलाचे आहे. उदाहरण घ्यायचे झाले तर भारताची सिलिकॉन व्हॅली म्हणून प्रसिद्ध असणारे बंगलोर शहर. आता इथे अनेक महिला क्रिकेट अकादमी आहेत. त्यातही NICE - New Innings Cricket Enterprise अकादमी अतिशय लोकप्रिय आहे. तिथे १३ ते १६ वयातील जवळजवळ ७० मुली प्रशिक्षण घेतात आहेत. यातील अनेक मुली गावातील आहेत, हे विशेष. यातील मुली U-१८ स्पर्धांमध्ये चमकल्या आहेत. त्यामुळे आता त्यांचे पालक त्यांना घरीच शिकवतात (home schooling) आणि जास्तीत जास्त वेळ त्यांना प्रशिक्षणा साठी कसा मिळेल यांच्याकडे जातीने लक्ष देतात. पुण्यात दिलीप वेंगसरकर त्यांची अकादमी आहे. त्यात २०० मुली प्रशिक्षण घेतात आहेत.
- सगळ्या प्रशिक्षण अकादमींमध्ये उत्तम कोचेस आहेत. त्या नवोदित खेळाडूंना कणखर होण्यासाठी तसेच त्यांची विजिगीषू मनोवृत्ती तयार करण्यासाठी विशेष प्रयत्न करतात. ४ आऊट ८० हा स्कोअर ० आऊट ५५ धावा पेक्षा कसा चांगला आहे हेदेखी त्यांच्या मनावर बिंबवतात. सातत्य, चिकाटी, स्टॅमिना साठी त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे खेळ आणि ट्रेनिंग दिले जाते.

# फॅशनमध्ये ड्रेसिंगचा महत्त्वपूर्ण रोल

फॅशन ही केवळ ट्रेंड फॉलो करण्यासाठी नसून, तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे. योग्य ड्रेसिंगमुळे तुम्हाला आत्मविश्वास आणि स्टाईल यांचा योग्य मेळ साधता येतो. मग आजच स्वतःसाठी योग्य कपडे निवडा आणि तुमचा खास लूक साकार करा!



## तुमच्या ड्रेसिंगमध्ये 'हे' घटक असायलाच हवेत!

- कम्फर्ट: कोणताही ट्रेंड फॉलो करताना तुमचा कम्फर्ट सर्वात महत्त्वाचा आहे. तुम्हाला जर एखादा स्टायलिश ड्रेस घालूनही अस्वस्थ वाटत असेल, तर तो तुमच्यासाठी योग्य नाही.
- फिटिंग: तुमच्या शरीरयष्टीला साजेशी परफेक्ट फिटिंग असलेली स्टाइल निवडा. खूप टाइट किंवा खूप लूज कपडे तुमच्या लुकला बाधा आणू शकतात.
- कलर कॉम्बिनेशन: स्किन टोन आणि प्रसंगानुसार रंगसंगती निवडल्यास तुमचा लूक अधिक आकर्षक दिसतो.
- ॲक्सेसरीज: योग्य बॅग, दागिने, बेल्ट किंवा स्कार्फचा वापर तुमच्या साध्या ड्रेसिंगलाही हटके लुक देऊ शकतो.
- शूज आणि फुटवेअर: योग्य आउटफिटसाठी योग्य फुटवेअर महत्त्वाचे असते. कॅज्युअलवेअरला स्नीकर्स, एथनिकला ट्रॅडिशनल फुटवेअर आणि फॉर्मल लुकसाठी हिल्स किंवा लोफर्स उत्तम पर्याय आहेत.

## फॅशन आणि ड्रेसिंग प्रकार : कोणता लूक कोणत्या प्रसंगासाठी?


- 1. कॅज्युअलवेअर – रोजच्या वापरासाठी सहजसोपी स्टाईल : कॉलेज, मित्रांसोबत आउटिंग किंवा वीकेंडसाठी कॅज्युअलवेअर परफेक्ट पर्याय आहे. जीन्स आणि टी-शर्ट, समर ड्रेसेस, कुर्ती-लेगिंग्स किंवा जॉगर्ससह स्वेटशर्ट हा कॅज्युअल लुक सहज घालता येतो.
- 2. ऑफिसवेअर – प्रोफेशनल आणि एलिगंट ड्रेसिंग
- ऑफिससाठी साधे आणि सोबर कपडे निवडावेत. पॅन्टसूट, फॉर्मल कुर्ता आणि प्लाझो, सॉलिड कलर शर्ट आणि स्कर्ट हे ऑफिससाठी योग्य पर्याय आहेत. ब्लेझरचा उपयोग केल्यास अधिक प्रोफेशनल लुक मिळतो.
- 3. फेस्टिव्हवेअर – पारंपरिक लुकसाठी बेस्ट आयडियाज : भारतीय सणांसाठी पारंपरिक वेशभूषा सर्वोत्तम पर्याय आहे. सिल्क साड्या, लेहेंगा-चोली, अनारकली ड्रेसेस किंवा ट्रेडिशनल सलवार-सूट हा लुक प्रत्येक फेस्टिव्हलमध्ये खुलतो.
- 4. पार्टीवेअर – ग्लॅमरस आणि अट्रॅक्टिव्ह लुक
- पार्टीसाठी तुम्ही गाऊन, बॉडीकॉन ड्रेस, शॉर्ट ड्रेसेस किंवा इंडो-वेस्टर्न स्टाइल ट्राय करू शकता. चमकदार रंग, मेटॅलिक टच आणि ॲक्सेसरीज तुमच्या लुकला स्टायलिश बनवतात.
- 5. ॲथलीजरवेअर – फिटनेस आणि फॅशन यांचा परिपूर्ण मेळ
- आजच्या ट्रेंडमध्ये जिमवेअर आणि ॲथलीजर मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय आहे.स्पोर्ट्स ब्रा, टॉप्स,ट्रॅक पॅंट्स आणि स्नीकर्सचा योग्य वापर केल्यास तुम्ही स्टायलिश दिसू शकता.

## व्यक्तिमत्त्व खुलवणाऱ्या खास स्टायलिंग टिप्स

- फॅशन ही केवळ कपडे परिधान करण्याचा एक भाग नाही, तर ती व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास आणि अभिव्यक्ती यांचा परिपूर्ण संगम आहे. आजच्या आधुनिक तरुणींना फॅशनमध्ये वेगवेगळे प्रयोग करण्याची आणि स्वतःचा वेगळा लूक साकारण्याची आवड असते. त्यामुळे योग्य ड्रेसिंग स्टाईल निवडणे हे केवळ सौंदर्यासाठीच नाही, तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवण्यासाठीही महत्त्वाचे ठरते.

## ड्रेसिंग म्हणजे काय? फक्त कपडे की व्यक्तिमत्त्वाचा आरसा?

- ड्रेसिंग म्हणजे केवळ ट्रेंड फॉलो करणे नाही, तर तुमच्या जीवनशैलीला साजेशी फॅशन निवडणे होय. काहींना क्लासिक लुक आवडतो, काहींना कॅज्युअल, तर काहींना बोल्ड आणि इनोव्हेटिव्ह फॅशन. प्रत्येकाने आपल्या शरीरयष्टी, वय, प्रसंग आणि सोईनुसार ड्रेसिंग निवडावे.



फॅशन
ज्योती हांडगे,
फॅशन डिझायनर पुणे
राष्ट्रसंचार



## शरीरयष्टी आणि ड्रेसिंग – योग्य निवड कशी करावी?

- 1. उंच मुलींसाठी: फ्लोवी ड्रेसेस, मॅक्सी स्कर्ट आणि बेल्ट असलेले ड्रेस चांगले दिसतात.
- अनारकली किंवा ए-लाइन कुर्ता हा प्रकार आकर्षक दिसतो.
- 2. लहान हाइटच्या मुलींसाठी: हाय-वेस्ट जीन्स, शॉर्ट ड्रेसेस आणि मॉनोक्लोर आउटफिट तुमच्यासाठी बेस्ट ऑप्शन आहेत.
- व्हर्टिकल पट्टे आणि टाइट फिटिंगचे कपडे तुम्हाला उंच दिसण्यास मदत करतात.
- 3. प्लस-साईज तरुणींसाठी: डार्क कलर्स आणि ए-लाइन ड्रेसेस तुमच्या शरीरयष्टीला परिपूर्ण टच देतात.
- व्ही-नेकलाइन आणि लांब कुर्ते तुमच्या लुकला बॅलन्स करतात.
- ॲक्सेसरीजचा योग्य वापर – लूकला परिपूर्ण बनवणारा घटक
- ड्रेसिंग पूर्ण करण्यासाठी योग्य ॲक्सेसरीजचा वापर करणे गरजेचे आहे. काही महत्त्वाचे घटक –
- हॅंडबॅग्स: ऑफिससाठी टोट बॅग, पार्टीसाठी क्लच आणि कॅज्युअलवेअरला स्लिंग बॅग परफेक्ट मॅच होते.
- ज्वेलरी: डे-टू-डे लूकसाठी मिनिमल ज्वेलरी, पारंपरिक वेशभूषेसाठी ऑक्सिडाइज्ड किंवा गोल्ड ज्वेलरी आणि पार्टीवेअरला स्टेटमेंट पीस उत्तम दिसते.
- घड्याळे आणि सनग्लासेस: स्टायलिश घड्याळ आणि ट्रेंडी गॉगल तुमच्या लूकला उठावदार बनवतात.
- ट्रेंड फॉलो करताना तुमची स्टाईल राखा
- फॅशन ट्रेंड सतत बदलत असले तरी प्रत्येकाने स्वतःची वेगळी स्टाईल ठेवावी. तुमच्यावर चांगले दिसणारे कपडे आणि स्टाइल निवडून तुम्ही नेहमीच आत्मविश्वासाने वावरू शकता.

# आहारात साखरेला गुळाचा पर्याय...

उसाचा रस आटवून गुळ तयार केला जातो. गूळ तयार करताना उसामध्ये असणारी विविध पोषकतत्वे, खनिजे, क्षार व व्हिटॅमिन्स गुळामध्ये टिकून राहतात. गुळामध्ये लोह, मॅग्रेशियम, पोटॅशियम, मॅंगनीज ही पोषकघटक मुबलक असून यात व्हिटॅमिन- B, कॅल्शिअम, जस्त, फॉस्फरस व तांबे यासारखी महत्वाचे घटकही असतात. याठिकाणी गुळ खाण्याचे फायदे जाणून घेऊ या...

## गुळ खाण्याचे फायदे ...

- हिमोग्लोबिन वाढवते... ॲनिमिया दूर करण्यासाठी गुळ खाणे फायदेशीर असते. 100 ग्रॅम गुळामध्ये 11 mg लोहाचे प्रमाण असते. रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी झाल्याने ॲनिमिया किंवा पांडुरोग होत असतो. अशावेळी हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढण्यास गूळ फार उपयुक्त असते. रक्तदाब नियंत्रित ठेवतो... गूळ खाण्यामुळे ब्लडप्रेशर योग्य ठेवण्यास मदत होते. कारण गुळात मुबलक प्रमाणात पोटॅशिअम असल्याने रक्तदाब नियंत्रित राहतो.
- पचनशक्ती सुधारते... गुळामुळे पचनशक्ती सुधारण्यास मदत होते. तसेच गूळ खाण्यामुळे नियमित पोट साफ होऊन बद्धकोष्ठता दूर होण्यास मदत होते. स्त्रियांसाठी उपयुक्त... सर्वच वयोगटातील स्त्रियांसाठी गुळ खाणे उपयुक्त असते. कारण मासिक पाळी, अयोग्य आहार यांमुळे स्त्रियांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण खूपच कमी आढळते. यासाठी वयात येणाऱ्या मुली, मासिक पाळी असणाऱ्या स्त्रियांनी गुळाचा आहारात जरूर समावेश करावा. गरोदरपणातही लोहाचे खूप महत्त्व असते. यासाठी गरोदर स्त्रियांना प्रेग्नन्सीमध्ये आणि डिलिव्हरीनंतरही गूळ हितकारी असतो.



## आयुर्वेदानुसार गुळाचे महत्व आणि गुळाचे आहेत...

- आयुर्वेदात गुळाचे खूप महत्व आहे. त्यामुळे अनेक आयुर्वेदिक औषधेही गुळाबरोबर दिली जातात. आयुर्वेदातही गुळ खाण्याचे फायदे अनेक सांगितले आहेत. गुळ हे वातनाशक असून गुळ सुंठीबरोबर खाल्ल्यास वाताचे शमन होऊन मज्जावह संस्थेला म्हणजे नर्व्हस सिस्टीमला बल देते. जुना गुळ खाल्यास कफनाशनाचे कार्य होते. गुळामुळे दमा, खोकला यासारखे कफाचे विकार कमी होण्यास मदत होते. शरीरातील थकवा दूर करण्यासही गुळ उपयोगी ठरते.



## गुळ खाण्यामुळे होणारे नुकसान...

- अधिक प्रमाणात गुळ खाण्यामुळे वजन वाढू शकते. वजन अधिक वाढण्यामुळे डायबेटीस, हृद्यविकार होण्याचा धोकाही वाढू शकतो.
- गूळ अधिक खाण्यामुळे पोटात जंत होण्याचा त्रास होऊ शकतो. आमवात किंवा rheumatoid arthritis चा त्रास असल्यास गुळ खाणे टाळावे. कारण यात sucrose चे प्रमाण अधिक असल्याने या त्रासात सांध्यातील सूज अधिक वाढू शकते.
- गुळ अधिक खाण्यामुळे रक्तातील साखर (ब्लड शुगर) वाढू शकते. त्यामुळे डायबेटीस रुग्णांनी गूळ अधिक खाणे टाळावे. मधुमेह असणाऱ्यानी आपल्या डॉक्टरांच्या सल्ल्याने गुळाचा समावेश करावा.

## साखर खाणे चांगले की गुळ खाणे चांगले...?

- साखरेच्या तुलनेत गुळ पौष्टिक असतो. आयुर्वेदानेही साखरेपेक्षा गूळ हा श्रेष्ठ मानला आहे. साखरेत केवळ कॅलरीज असतात आणि याशिवाय कोणतेही उपयुक्त पोषकतत्वे साखरेत नसतात. त्यामुळे साखरेचे पदार्थ अति खाण्यामुळे शरीरात अतिरिक्त कॅलरीज वाढून वजन व चरबी वाढत असते. त्यामुळे हृदयविकार व डायबेटीसचा धोकाही वाढत असतो. तर गुळामध्ये लोह (आयर्न), मॅग्नेशियम, कॅल्शिअम, व्हिटॅमिन- B अशी अनेक आवश्यक पोषकतत्वे असतात. तसेच शरीरात गुळाचे शोषण धिम्यागतीने होते. त्यामुळे रक्तातील साखर लगेच वाढत नाही. त्यामुळे साखर आणि गुळाची तुलना करता, आरोग्यासाठी गुळचं खाणे हितकारक असते.

# सांस्कृतिक राष्ट्रवादाची समाजाला गरज

प्रसंगिक
प्रितीश पंडीत
राष्ट्रसंचार

आपल्या देशावरील परकीय आक्रमणांची सुरुवात इस्लामच्या जन्मानंतर म्हणजे प्रेषितांच्या काळातच पर्शिया,पश्चिम मध्यआशियात सत्तेवर असणाऱ्या खलिफा द्वारे झाली होती, परंतु मोहम्मद बिन कासिम याच्या नेतृत्वाखाली झालेले, आठव्या शतकातील अरबी आक्रमण मोठ्या प्रमाणावर आपल्या देशासाठी दुष्परिणाम कारक ठरले. तरीही देशाची साधन संपत्ती, संस्कृती टिकून होती. अकराव्या शतकात झालेले गजनीच्या मेहमुदाचे तुर्की आक्रमण मात्र खऱ्या अर्थाने झालेले पहिले परकीय आक्रमण ठरले. कारण त्यानंतर आपल्यावर सतत परकीय सत्तांची आक्रमण होत होती. त्याने एक प्रकारे आपली अर्थव्यवस्था आणि समाज व्यवस्था कोलमडून पडत होती. गजनीच्या मेहमुदानेच सतरा वेळा हल्ला करून आपल्या सोमनाथच्या मंदिराची विटंबना केली. त्यानंतर मेहमूद घोरी या तुर्की आक्रमकाने ११७५ मध्ये आपल्यावर आक्रमण करून लूट मार केली. चेंगीज खान च्या नेतृत्वाखाली झालेल्या मंगोलियन आक्रमणानंतर मात्र १२०६ ते १३६८ पर्यंत देश मंगोलियन राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखाली होता. त्यांचा शेवटचा राज्यकर्ता परागंदा झाल्यानंतर, देशात सर्वत्र अराजक माजले होते, दुष्काळ आणि प्लेग सारख्या समस्या सर्व दूर भेडसावत होत्या. त्यानंतर दिल्ली या राजधानीला उभे राहायला तब्बल पन्नास वर्षे लागली. हजारो लोकांच्या कत्तली झाल्या, सर्वत्र दगड मातीचे ढिगारे उभे राहिलेत. एवढे प्रचंड नुकसान या मंगोलियन आक्रमकांनी केले.




त्याच काळात दक्षिणेला विजय नगरचे साम्राज्य १४ व्या शतकातील १३३६ पासून १७ व्या शतकापर्यंत भरभराटीचे आणि सुखसंपन्न होते.त्यांची राजधानी हम्पी (विजयनगर) ही तर जगातील एक संपन्न आणि श्रीमंत अशी राजधानी होती. मंगोलियन राज्यकर्त्यां नंतर दिल्लीवर लोधी शासक होते. पानिपतचे प्रथम युद्ध १५२५ मध्ये झाले,त्यामध्ये इब्राहिम लोधी चा पराभव करून पहिल्यांदा मुगल राज्यकर्ता बाबर हा दिल्लीच्या तख्तावर विराजमान झाला. त्यानंतर सुमारे अडीचशे वर्षे दिल्लीवर आणि पर्यायाने भारताच्या मोठ्या भूभागावर मुघलांची सत्ता होती. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ही सत्ता क्षीण झाली, त्यानंतर पर्शियातून झालेल्या नादिर शाहने १७३८ मध्ये भारतावर आक्रमण केले.

नादिर शाह नेच भारतातून भर- भक्कम संपत्तीची लूट केली. शहाजहान या मुघल बादशहाने बनवलेले 'मयूर सिंहासन' आणि कोहिनूर हिरा यासारख्या गोष्टी तेव्हाच भारतातून गेल्यात. त्यानंतर दिल्लीची प्रचंड प्रमाणात लूट झाली. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धामध्ये अहमदशहा अब्दाली आणि मराठ्यांचा सामना होऊन, मराठ्यांना पराजय पत्करावा लागला. यावेळी अहमदशहा अब्दालीने प्रचंड प्रमाणात कत्तल केली आणि भारतीय संपत्तीची लूट केली. अशा प्रकारे गजनीच्या मेहमुदापासून ते अहमदशहा अब्दालीपर्यंत जवळजवळ ७०० वर्षे भारत इस्लामी राजकर्त्यांच्या अधिपत्याखाली होता.

इसवी सन १४९८ मध्ये वास्को-द-गामा हा पोर्तुगीज पहिल्यांदा भारतीय भूभागावर आला. त्यानंतर युरोपियन व्यापारी भारतात येऊ लागले. भारतातील मुघल राज्यसत्ता क्षीण झाल्यानंतर मात्र इंग्रजांनी भारतातील आपले स्थान आणखीनच बळकट केले . १८१८ मध्ये झालेल्या दुसऱ्या बाजीराव पेशव्यां बरोबरच्या वसई तहानंतर मात्र इंग्रजांनी भारतावर आपली पकड आणखीनच मजबूत केली. पुढचा सर्वच इतिहास आपल्या डोळ्यासमोर आहे. अशा प्रकारे साधारण इस्लामी राज्यकर्त्यांची ७०० वर्ष आणि इंग्रजांची साधारण दीडशे ते पावणे दोनशे वर्ष, आपण परकीयांच्या जुलमी राजवटीखाली काढली. यादरम्यान आपल्या संपत्तीची,साधन समुग्रीची प्रचंड लूट झाली. तसेच आपल्या धार्मिक बाबींचा, चालीरीतींचा सन्मान होत नव्हता आणि आपले वेळोवेळी आर्थिक आणि नैतिक शोषण होत होते. मोठया प्रमाणात धर्मांतरण होत होते,या गोष्टींची कुठलीही मोजदाद च नव्हती. साधारणपणे दहाव्या शतकापर्यंत, भारत हा संपूर्ण जगात, एक श्रीमंत, संपन्न आणि शैक्षणिक दृष्ट्या अतिशय प्रगत देश होता. जगातला बराचसा व्यापार हा तेव्हाच्या भारतातून होत होता. जागतिक जीडीपी चा बराचसा भाग हा आपला होता. मौर्य, गुप्त वंशांच्या राजसत्ता खाली आपला उत्तरेकडील बराचसा भूभाग अखंड होता. दक्षिणेकडील चोला राजे आणि त्यांची सत्ता आग्नेय आशिया पर्यंत होती. अशा प्रकारे भारतीय संस्कृती ही प्रगत होती, प्रगल्भ पणे सर्वत्र जोपासली जात होती आणि दाही दिशांनी त्याची कीर्ती पसरली होती. पण परकीय आक्रमणाच्या जोखडाखाली आणि परकीय राज्यकर्ते असताना आपली संस्कृती लयाला गेली आणि आपला देश संपन्नते कडून गरिबीकडे लोटला गेला. याच सर्व बाबींचा आढावा घेण्यासाठी आणि परत भारतीय संस्कृतीची पताका सर्वदूर फडकण्यासाठी पुण्यात गेल्या ८ फेब्रुवारीला 'जयपूर डायलॉग' च्या 'डेक्कन समित' हे चर्चासत्र झाले. त्यात सर्व विषयांचा उहापोह झाला .

सांस्कृतिक राष्ट्रवाद याच विषयावरील पहिले चर्चासत्र महत्त्वाचे होते. एकात्म समाजाच्या उभारणीसाठी 'बटेंगे तो कटेंगे' या विषयावर एक विचार सत्र होते. विविध सामाजिक आणि राजकीय विषयांचा समावेश या चर्चा सत्रामध्ये करण्यात आला. आपले भूराजकीय महत्त्व आणि नवीन जागतिक रचना यावर आधारलेले विषय सुद्धा याचर्चासत्रामध्ये हि ते, त्या व र जोरदार चर्चा झाली. यामध्ये कर्नल अजय रैना अभिजीत अय्यर मित्रा आणि अभिजीत चावडा हे ज्येष्ठ भूराजकीय विश्लेषक लेखक यांच्याबरोबर मेजर जनरल राजीवनारायण आणि कर्नल आर एस एच सिंग हे लष्करी विशेषज्ञ सहभागी झाले होते. मागील वर्षी जगातील साधारण पन्नास लहान मोठ्या देशांमध्ये निवडणुका होऊन नवीन सरकारे सत्तारूढ झाली होती. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प आणि भारतात नरेंद्र मोदी परत एकदा सत्तेवर आलेत. या सर्व पार्श्वभूमीवर ही चर्चासत्रे अत्यंत महत्त्वाची ठरली. यापुढील चर्चासत्र हे भारतीय इतिहासाच्या विद्रूपीकरणावर होते. शेवटचे चर्चासत्र हे 'धार्मिक स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्ष राज्य' या संकल्पनेवर आधारित होते.

या सर्व विचार,चर्चा सत्र यामध्ये महाराष्ट्रतील जेष्ठ पत्रकार राजकीय विश्लेषक भाऊ तोरसेकर, अविनाश धर्माधिकारी आणि जयपूर डायलॉग चे प्रणेते संजय दीक्षित यांची उपस्थिती आणि मार्गदर्शन मोलाचे होते. या सर्वांतून परत एकदा सुवर्ण युगाकडे भारताची होत असलेली वाटचाल अधोरेखित झाली.



# मॉडर्न पालकत्व

## डिजिटल युगात मुलांचे संगोपन कसे करावे?

**आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात पालकत्व ही केवळ प्रेम आणि शिस्त यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तंत्रज्ञान, मानसिक आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक मूल्ये यांच्या संतुलित संगोपनाची गरज निर्माण झाली आहे. - प्रा. योगेश हांडगे,**

**डिजिटल युगातील पालकत्व हे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे. मात्र, योग्य समतोल राखला तर तंत्रज्ञान, भावनिक समज, शिक्षण आणि कुटुंब यांचा समृद्ध संगम साधता येईल. मूल केवळ यशस्वीच नव्हे, तर सशक्त, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडवण्यासाठी पालकांनी नव्या युगाच्या संधी आणि जबाबदाऱ्या समजून घेतल्या पाहिजेत.**

मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या स्फोटामुळे मुलांचे बालपण आणि किशोरावस्था मोठ्या प्रमाणात प्रभावित होत आहेत. त्यामुळे आधुनिक पालकत्वात पारंपरिक आणि नव्या पद्धतींचे योग्य मिश्रण असणे महत्त्वाचे ठरते.

### डिजिटल युगातील मोठ्या आव्हानांवर पालकांनी कशी मात करावी?

लक्षवेधी
प्रा. योगेश हांडगे-पाटील
राष्ट्रसंचार



**1. स्क्रीनटाइम आणि टेक्नोलॉजीचे संतुलन:**

आजच्या काळात मुलांचा मोबाईल, टॅबलेट किंवा टीव्ही यांसोबत वाढता वेळ हा पालकांसाठी मोठी चिंता आहे. शिक्षणासाठी आणि करमणुकीसाठी टेक्नोलॉजी आवश्यक असली तरी त्याचा अतिरेक हा शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो.

उपाय:

- समतोल वेळेचे नियोजन: स्क्रीनटाइमसाठी मर्यादा ठेवा आणि त्यानुसार एक ठराविक वेळ ठरवा.

- गुणवत्तापूर्ण कंटेंट: फक्त करमणुकीसाठी नव्हे तर शिक्षणात्मक ॲप्स, पुस्तके आणि माहितीपर कार्यक्रम यांचा समावेश करा.

- नवीन खेळ आणि उपक्रम: मैदानी खेळ, हस्तकला आणि सामाजिक संवाद यांसाठी मुलांना प्रवृत्त करा.

**2. सोशल मीडियाचा प्रभाव आणि सुरक्षितता:**

मुलं लहान वयातच सोशल मीडियावर सक्रिय होत आहेत. इंस्टाग्राम, फेसबुक, स्नॅपचॅट यांसारख्या प्लॅटफॉर्म्समुळे त्यांच्यावर मानसिक तणाव वाढू शकतो, तसेच साइबर बुलींग आणि खोटी माहिती पसरवण्याचा धोका निर्माण होतो.



**उपाय:**

- संवादाची सवय लावा: मुलांसोबत खुलेपणाने चर्चा करा, त्यांचे अनुभव समजून घ्या आणि त्यांना सोशल मीडियावर जबाबदारीने वागण्यास शिकवा.

- प्रायव्हसी सेटिंग्स आणि सुरक्षितता: सोशल मीडियावरील सेटिंग्ज तपासा आणि कोणाशी संवाद साधावा हे समजावून सांगा.

- वास्तविकता आणि आभासी जग यातील फरक समजावून द्या: सोशल मीडियावरील लाईक्स, शेअर्स आणि फॉलोअर्स यांच्या मागे न लागता खऱ्या आयुष्यातील संबंध महत्त्वाचे आहेत हे पटवून द्या.

**3. शिक्षण आणि कौशल्यविकास:**

डिजिटल शिक्षण हा काळाची गरज आहे. मात्र, ऑनलाईन शिक्षणामुळे मुलांमध्ये आत्मनिर्भरता आणि सोशल कौशल्यांचा अभाव दिसून येतो.

**उपाय:**

- क्रिएटिव्ह लर्निंग: ऑनलाईन अभ्यासासोबतच हस्तकला, संगीत, कथा लेखन आणि डिझाइन यांसारख्या कौशल्यांना चालना द्या.

स्वतंत्र विचारसरणी विकसित करा: मुलांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांना समस्या सोडवण्याची, विश्लेषण करण्याची आणि नवकल्पना सुचवण्याची प्रेरणा द्या.

- ऑफलाईन अभ्यास: ऑनलाईन शिक्षणाचा समतोल राखण्यासाठी काही विशिष्ट वेळ फक्त पुस्तके वाचण्यासाठी आणि हस्तलिखित नोट्स करण्यासाठी द्या.

**4. मानसिक आरोग्य आणि भावनिक स्थिरता:**

डिजिटल तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे मुलांमध्ये चिंता, तणाव, आत्मसंदेह आणि एकलकोंडेपणा वाढत आहे.

**उपाय:**

- खुला संवाद: पालकांनी मुलांसोबत नियमित संवाद साधावा आणि त्यांच्या भावना समजून घ्याव्यात.

- योग व ध्यान: मानसिक स्थिरतेसाठी मुलांना ध्यान, श्वासावरील नियंत्रण आणि सकारात्मक विचार करण्यास प्रवृत्त करा.

- सकारात्मक दृष्टिकोन: यशाच्या संकल्पनांबाबत वास्तववादी दृष्टिकोन ठेवा आणि अपयश स्वीकारण्याची तयारी ठेवा.

**5. कुटुंबासोबत वेळ घालवणे:**

आजकाल व्यस्त जीवनशैलीमुळे पालक-मुलांमधील संवाद कमी होत चालला आहे, यामुळे नात्यात दुरावा निर्माण होऊ शकतो.

**उपाय:**

- डिजिटल डिटॉक्स वेळ: आठवड्यातून एक दिवस पूर्णतः डिजिटल उपकरणांपासून दूर राहून कुटुंबासोबत वेळ घालवा.

- सामायिक उपक्रम: एकत्र स्वयंपाक करणे, खेळ खेळणे, सहलींना जाणे अशा क्रियाकलापांमध्ये सहभागी व्हा.

- रोजच्या गप्पांची सवय लावा: रात्रीच्या जेवणाच्या वेळी मोबाईल न वापरता दिवसाच्या अनुभवांवर चर्चा करा.

नव्या युगातील पालकत्वाची सूत्रे:

- लवचिकता आणि समजूतदारपणा: जुन्या पद्धतींना धरून राहण्याऐवजी बदलत्या गरजांनुसार पध्दती स्वीकारा.

- टेक्नोस्मार्ट पालक बना: टेक्नोलॉजीचा योग्य उपयोग करून मुलांना त्याची जबाबदारी शिकवा.

- मुलांच्या भावनिक गरजा ओळखा: त्यांचे विचार, समस्या आणि आनंद यांना महत्त्व द्या.

- स्वतः उदाहरण बना: फक्त सल्ले देण्यापेक्षा स्वतः योग्य आचरण ठेवा.

# परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जा

## ही आहे यशाची गुरू किल्ली

- शशिकांत बाळासाहेब जाधव



विद्यार्थी मित्रांनो इयत्ता १० वी ची परीक्षा शुक्रवार दिनांक २१ फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. आता परीक्षेसाठी आपली व आपल्या पालकांची धावपळ सुरू झाली असेल.आपण वर्षभर अभ्यास केल्यामुळे परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाणार आहोत.फक्त थोडेसे नियोजन करूया!

- १.वेळेचे नियोजन करूया.
- २.योग्य आहार व पुरेशी झोपेला प्राधान्य द्यावे.
- ३.योग्य अभ्यासाचे नियोजन करा.
- ४.शांत डोकं ठेवून विचार करा.
- ५.परीक्षा केंद्रावर वेळेत पोहचवण्यासाठी लवकर निघा.
- ६.कोणत्याही प्रकारची भीती मनात बाळगू नका.
- ७.आपण केलेल्या अभ्यासाबाबत स्वतःवर विश्वास ठेवा.
- ८.परीक्षेसाठी आवश्यक हॉल तिकिट,ओळखपत्र व लेखन साहित्य घेतल्याची खात्री करा.
- ९.परीक्षा कक्षात पोहोचल्यावर थोडे क्षण डोळे बंद करून आत्मविश्वास निर्माण करा.
- १०.प्रश्नपत्रिकेवरील सूचना काळजीपूर्वक वाचा.
- ११.नवीन मुख्य प्रश्न नवीन पानावर सुरू करा.
- १२.ज्या प्रश्नाची उत्तरे आपल्याला सोडवण्यास सोपे आहेत ते अगोदर सोडवा.
- १३.जे प्रश्न अवघड वाटतात ते नंतर सोडवा.
- १४.उन्हाळा तीव्र असल्याने पाण्याची बाटली सोबत ठेवा.
- १५.विद्यार्थ्यांचे शंकासमाधान करण्यासाठी केंद्र प्रमुख,पर्यवेक्षक यांची मदत घ्या.
- १६.कुठल्याही प्रकारचे चुकीचे म्हणजे कॉपी किंवा तत्सम प्रकारचे काम करू नका.
- १७.यंदा परीक्षेसाठी बोर्डाने १० मिनिटे अधिक वाढवून दिले आहेत.या वेळेत आपण लिहिलेल्या उत्तरपत्रिकेचे वाचन करून त्रुटी दूर करा.




- १८.पुरेशी विश्रांती घेवून पुढील पेपरच्या अभ्यासाचे नियोजन करा.

# झोपताना केसांची काळजी कशी घ्याल ?



झोपताना केस कसे जागी ठेवावेत हा एक प्रश्न आहे जो अनेकदा आपल्या मनात येतो. काही लोकांना झोपताना केस उघडे ठेवणे आवडते, तर काहींना ते बांधणे आवडते. मग शेवटी बरोबर काय आहे?

### उघड्या केसांचे फायदे:

१) आरामदायी: झोपताना उघडे केस अधिक आरामदायी असतात, कारण ते बांधलेले नसतात.

२) हवेचा प्रवाह: उघड्या केसांना हवेचा प्रवाह मिळतो, ज्यामुळे ते श्वास घेऊ शकतात आणि निरोगी राहतात.

### उघड्या केसांचे तोटे:

१) गुंतागुती: झोपताना केस गुंतागुती होणे सामान्य आहे, विशेषतः लांब केसांसाठी.

२) केस तुटणे: गुंतागुतीचे केस सोडवताना केस तुटू शकतात.

३) चेहऱ्यावरील केस: झोपताना चेहऱ्यावर मोकळे केस येऊ शकतात, ज्यामुळे झोपेत व्यत्यय येऊ शकतो.

### बांधलेले केस ठेवण्याचे फायदे:

१) गुंता टाळणे: बांधलेले केस गुंता टाळतात, ज्यामुळे केस तुटणे कमी होते.

२) चेहऱ्यावर केस पडत नाहीत: बांधलेले केस चेहऱ्यावर पडत नाहीत, ज्यामुळे झोपेचा त्रास होत नाही.

३) स्टायलिंग: बांधलेले केस पोनीटेल, वेणी किंवा बन अशा विविध स्टाईलमध्ये बांधता येतात.

केस बांधण्याचे तोटे:

१) खाज सुटणे: केस बांधल्याने टाळूला खाज येऊ शकते, विशेषतः जर ते खूप घट्ट बांधले असेल तर.

२) केस गळणे: केस खूप घट्ट बांधल्याने केस गळण्याची शक्यता वाढते.

३) केस तुटणे: केस मोकळे केल्याने केस तुटू शकतात, विशेषतः जर ते खूप घट्ट बांधलेले असतील तर.

झोपताना केस उघडे ठेवणे किंवा बांधणे याचे कोणतेही बरोबर किंवा चुकीचे उत्तर नाही. हे वैयक्तिक पसंती आणि केसांच्या प्रकारावर अवलंबून असते. जर तुमचे केस लांब आणि जाड असतील तर झोपताना ते बांधून ठेवणे चांगले. जर तुमचे केस पातळ आणि लहान असतील तर तुम्ही ते उघडे ठेवू शकता.



## शेतकऱ्यांसाठी नवीन सोनालिका चीता ट्रॅक्टर



**पुणे :** भारतातील क्रमांक एकचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर ने 'चीता' श्रेणीतील ट्रॅक्टर सादर केले आहेत. यांचे डिझाईन नवीन लूकसह करण्यात आले असून त्यामध्ये शक्ती, शैली आणि प्रगत तंत्रज्ञानाचा परिपूर्ण मिलाफ आहे.नवीन सोनालिका चीता मालिका शेतीच्या विविध गरजांसाठी शक्तिशाली ट्रॅक्टर पुरवते आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना त्यांची कामे अधिक सहजतेने आणि आरामात करण्यास सक्षम करते. 'चित्त्यासारखी चपळाई आणि वेगा'ची हमी देणाऱ्या या नवीनतम हेवी-ड्युटी ट्रॅक्टर मॉडेल्समध्ये सोनालिका चीता डीआय ३२, सोनालिका चीता डीआय ३० ४डब्ल्यूडी आणि सोनालिका चीता एमएम १८ ट्रॅक्टर यांचा समावेश आहे. शेतीतील विशेष गरज असलेल्या शेतकऱ्यांच्या गरजा ते पूर्ण करतात. या नवीन उत्पादनाद्वारे फळबागा, ऊस, डाळिंब, द्राक्षे आणि सुपारीची शेती करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा खर्च कमी करतानाच त्यांची कार्यक्षमता व कामगिरी सुधारण्याचे उद्दिष्ट सोनालिकाने बाळगले आहे.

## 'इसरो'चे के. सिवन यांना 'एआयटी'तर्फे जीवनगौरव पुरस्कार



**पुणे :** आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एआयटी) या संस्थेचा ३१ व्या स्थापना दिवसानिमित्त दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इसरो) माजी अध्यक्ष डॉ. के. सिवन यांना प्रदान करण्यात येणार आहे. तसेच 'द सक्सेसफुल यंग आंत्रप्रेन्युअर पुरस्कार' २००२ च्या तुकडीचे माजी विद्यार्थी प्रीतपालसिंग यांना दिला जाणार आहे. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, हा समारंभ येत्या सोमवारी (ता. २४) दुपारी ४.४५ वाजता रमण सभागृह, एआयटी दिघी कॅम्पस, पुणे येथे होणार आहे.स्थापना दिनानिमित्त सीओएएस अष्टपैलू विद्यार्थी फिरता करंडक, सर्वोत्कृष्ट नवकल्पनेसाठी देण्यात येणारी राजपूत रेजिमेंट ट्रॉफी, 'जीओसी इन सी' सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी पुरस्कार, सर्वोत्कृष्ट विद्यार्थी क्रीडापटूसाठी राजशेखर ट्रॉफी, सर्वोत्कृष्ट संशोधन, सल्लासेवा, अध्यापन तसेच शिक्षकेतर उत्तम कार्यासाठीही पुरस्कार दिले जाणार आहेत. 'एआयटी' ही निवासी स्वरुपाची संस्था असून, ३० एकरांच्या निसर्गरम्य परिसरात वसली आहे.

## मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांची क्रिकेट स्पर्धा संपन्न



**पुणे :** रोटरी क्लब पर्वती व रूईया मुकबधीर विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एसपी कॉलेज ग्राउंड येथे संपन्न झालेल्या या स्पर्धा प्रोसंगी रोटरी ३१३१ चे प्रांतपाल शितल शहा, रोटरी क्लब पर्वतीच्या अध्यक्ष वृषाली खिरे, क्रिकेटपटू रणजीत खिरीड, श्रीकृष्ण चितळे, संगीता शिंदे, मुकेश सुपनेकर,वैजयंती रिसवडकर आदी उपस्थित होते. आठ संघांनी यात सहभाग घेतला होता. सी आर रंगनाथन टिंगरेनगर यांनी ही स्पर्धा जिंकली, दुसरा क्रमांक धायरी कर्णबधीर विद्यालयाने पटकावला. या प्रसंगी बोलतांना प्रांतपाल शितल शहा यांनी भारतीय हे क्रिकेट प्रेमी आहेत. क्रिकेट मुळे खिलाडू वृत्ती वाढते असे सांगितले. रोटरी क्लब पर्वतीच्या अध्यक्ष वृषाली खिरे यांनी विद्यार्थ्यांनी खेळतांना स्पर्धे बरोबरच मैत्री व हारजीत दोन्ही समान पद्धतीने स्वीकारणे शिकले पाहिजे असे सांगितले.

## ७२व्या वर्षी दुचाकीवरून केली पुणे ते प्रयागराज वारी



**पुणे :** भारतातील कानाकोपऱ्यातून भाविक भक्त प्रयागराज म्हणजे महाकुंभ मेळ्यासाठी जात असतात. विशेष बाब म्हणजे पुणे शहरातील शनिवार पेठेत रहात असलेले ७२ वर्षे वयाचे सुर्यकांत तुकाराम साखरे आणि रजनी सुर्यकांत साखरे या दांपत्याने पुणे ते प्रयागराज असा ३५१० किलोमीटरचा प्रवास सलग २४ दिवसात दुचाकीवरून पूर्ण केला. यावेळी पुणे ते शनिशिंगणापूर, शिर्डी, उज्जैन, चित्रकूट, प्रयागराज, काशी व अयोध्या या मार्गाने धार्मिक स्थळांना भेटी देऊन त्यांनी हा प्रवास सहज पूर्ण केला. भक्ती आणि श्रध्देचे एक उत्तम उदाहरण म्हणून या दांपत्याकडे पाहिले पाहिजे.त्यांनी केलेल्या अद्भूत प्रवासाचा गौरव म्हणून सुर्यकांत तुकाराम साखरे आणि रजनी सुर्यकांत साखरे यांच्या या विलक्षण प्रवासाचा अनुभव मांडणारा आणि त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करणारा गौरव सोहळा सर्व साखरे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि अनिरूध्द येवले यांनी आयोजित केला होता.

## गर्दुल्यांच्या म्होरक्यांची उतरवली नशा...



चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह एकूण तीन जणांना अटक केली आहे.

## ९६ किलो गांजा जप्त; महिलेसह तिघे जेरबंद

**पिंपरी :** चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजा तस्करी करणाऱ्या महिलेसह एकूण तीन जणांना अटक केली आहे. आरोपींकडून ९६ किलो गांजा दोन चार चाकी वाहनासह ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली. संजय पांडुरंग मोहिते, मनसाराम नूरजी धानका यांच्यासह महिलेला अटक केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम गायकवाड हे पोलीस अंमलदार निखिल वर्पे यांच्यासह गस्त घालत होते. दोन चार चाकी वाहनांमधून गांजाची तस्करी केली जात आहे. अशी गुप्त माहिती बातमीदारमार्फत मिळाली. पुणे- नाशिक महामार्गावरील रोहकल फाटा या ठिकाणी नाकाबंदी करून दोन्ही वाहन ताब्यात घेण्यात आली. दोन्ही वाहनातील एकूण तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे विचारपूस करण्यात आली. यात एका महिलेचा देखील समावेश होता. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या समक्ष वाहन तपासल्यानंतर दोन्ही वाहनात एकूण सहा पोत्यांमध्ये ९६ किलो २०४ ग्रॅम गांजा आढळून आला.

## इंडिया एरोसोल एक्स्पो २०२५ चे आयोजन

# भारतातील एरोसोल क्षेत्राला चालना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे २८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२५ या कालावधीत सहावे इंडिया एरोसोल एक्स्पो (आयएई २०२५) हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने भारतीय व जागतिक पातळीवरील एरोसोल उद्योगातील तज्ज्ञ व इनोव्हेटर्स एकत्र येणार आहेत.

या प्रदर्शनात अनेक भारतीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार आहेत. आयएई २०२५ हा एरोसोल (स्प्रे) उद्योगाला समर्पित असलेला भारतातील एकमेव व्यापारी मेळा असून या प्रदर्शनात वैयक्तिक निगा, आरोग्यसेवा, ऑटो केअर, ॲग्री केअर, होम केअर, स्प्रे उत्पादने, पेंट स्प्रे, इंडस्ट्रिअल ल्युब्रिकंट्स, क्लीनर्स व कोटिंग स्प्रे ही उत्पादने प्रदर्शित करण्यात येणार आहेत.




### हे प्रदर्शन महत्त्वाचे व्यासपीठ

**प्रदर्शक आणि या मेळ्यास भेट देणाऱ्या अभ्यागतांना या प्रदर्शनाचा उपयोग व्हावा या उद्दिष्टाने विविध परिसंवाद आणि परिषदांचेही आयोजन करण्यात आले आहे. यात जागतिक आणि भारतीय ट्रेंड्सवर चर्चा होणार असून उत्पादकता वाढवण्यासाठी तांत्रिक चर्चासत्रे आणि भविष्यातील वाढीसाठी उपयुक्त तंत्रज्ञानविषयक माहिती देण्यात येईल. जॉइंट व्हेंचर, मार्केटिंग संदर्भातील भागीदारी, घाऊक करार आणि भारतात कराराधारित उत्पादन भागीदार शोधणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांसाठी ही हे प्रदर्शन महत्त्वाचे व्यासपीठ ठरेल.**

- भारतीय व जागतिक पातळीवरील एरोसोल उद्योगातील तज्ज्ञ व इनोव्हेटर्स ना व्यासपीठ
- जागतिक आणि भारतीय ट्रेंड्सवर चर्चा
- २०२३ मध्ये ६३५ दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या घरात असलेली देशांतर्गत एरोसोल बाजारपेठेची उलाढाल २०३१ पर्यंत एक अब्ज अमेरिकी डॉलरचा आकडा ओलांडण्याचा अंदाज

"नवनवीन संकल्पना, पर्यावरणपूरकता आणि या उद्योगाच्या वाढीवर भर आहे. पॅकेजिंगसाठी नवीन पर्याय शोधणे आणि प्रायव्हेट लेबल एरोसोल उत्पादनांची माहिती घेण्यासाठी ते या प्रदर्शनात येणार आहेत. ग्राहकांच्या सवयींमध्ये वेगाने होणारे बदल, वाढते उत्पन्न आणि पर्यावरणपूरक उत्पादनांवर वाढता भर यामुळे भारतातील एरोसोल उद्योग दरवर्षी सुमारे ८ टक्क्यांनी वाढत आहे. याला मुख्यतः वैयक्तिक निगा, शेती, उद्योग आणि एफएमसीजी क्षेत्रांतील वाढीमुळे चालना मिळत आहे. २०२३ मध्ये ६३५ दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या घरात असलेली देशांतर्गत एरोसोल बाजारपेठेची उलाढाल २०३१ पर्यंत एक अब्ज अमेरिकी डॉलरचा आकडा ओलांडण्याचा अंदाज आहे.

**- हरिश अरोरा**
एपीसी चे मानद सचिव व उपाध्यक्ष

## माजी सैनिकांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध- आ. लांडगे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** दिघी येथील माजी सैनिक विकास संघासाठी भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्याकडून दहा संगणक भेट देण्यात आले आहेत. माजी सैनिक विकास संघातर्फे अभ्यासिका चालवली जाते. या अभ्यासिकेला आमदार लांडगे यांनी भेट दिली होती यावेळी अभ्यासिकेसाठी संगणक देण्यात येतील असे शब्द आमदारांनी दिला होता तो शब्द त्यांनी पूर्ण केला. याशिवाय माजी सैनिकांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध असल्याची भावना यावेळी आमदार लांडगे यांनी व्यक्त केली आहे.

दिघी येथे मोठ्या प्रमाणात माजी सैनिक वास्तव्याला आहेत. या माजी सैनिकांच्या माध्यमातून माजी सैनिक विकास संघ कार्यरत आहे. या विकास संघा तर्फे अभ्यासिका चालवली जाते या अभ्यासिकेचे कामकाज पाहण्यासाठी भाजप नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी अभ्यासिकेची पाहणी केली येथील कामकाजाचा आढावा घेतला यानंतर या संघासाठी संगणकाची गरज आहे हे लक्षात आल्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी या पदाधिकाऱ्यांना संगणक देण्याचे आश्वासन दिले होते त्याप्रमाणे त्यांनी लेनोवो कंपनीचे ऑल-इन-वन (हाय कन्फिगरेशन) 10 संगणक भेट दिले आहेत.

यावेळी माजी नगरसेवक विकास डोळस, कुलदीप परांडे, माजी सैनिक विकास संघाचे अध्यक्ष कॅप्टन नरेंद्र सिंह चव्हाण, उपाध्यक्ष भिसे, भास्कर आंब्रे, तसेच अन्य माजी सैनिक उपस्थित होते. यावेळी माझी सैनिक विकास संघाच्या वतीने आमदार महेश लांडगे यांचा सत्कार करण्यात आला.

"देशाच्या संरक्षणासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या, घरावर तुळशीपत्र ठेवत आपल्या तमाम देशवासियांच्या संरक्षणाची जबाबदारी खांद्यावर घेणारे सैनिक आमच्यासाठी आदर्श आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील दिघी या भागात माजी सैनिकांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. ही खरे तर आपल्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. या माजी सैनिकांना कोणतीही अडचण येऊ नये. यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. त्यांच्या हितासाठी सदैव दक्ष राहणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे.

**महेश लांडगे,** आमदार

# रुग्ण हक्क परिषदेच्यावतीने 'शिव सन्मान' पुरस्कार वितरण

**पुणे :** रयतेचे राजे, कुळवाडी भूषण, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषद या संघटनेतर्फे शिवसन्मान पुरस्कार- 2025 या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. दैनिक राष्ट्र संचारच्या वरिष्ठ उप संपादक सारिका रोजकर आणि विशेष प्रतिनिधी उपसंपादक नानासाहेब साळुंके यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण होते. रुग्ण हक्क परिषदेचे इकबाल शेख, अजय विरकर, राहुल हुलावळे, युनिव्हर्सल हॉस्पिटलचे संचालक डॉ. अनंत बागुल प्रमुख उपस्थित होते.

राजकीय, सामाजिक, विधी व वैद्यकीय, पत्रकारिता, उद्योजकता, कला, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात आपले मौलिक योगदान देणाऱ्या १०१ धूरनिंना शिवसन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.पुरस्काराचे १२ वे वर्ष होते. पुण्यातील ऐतिहासिक वास्तू लाल महल या ठिकाणी पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

एकूण १०१ महत्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांना या शिवसन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार सोहळ्याचे यशस्वी संयोजन रुग्ण हक्क परिषदेच्या शहराध्यक्ष अपर्णा मारणे साठ्ये, रेश्मा जांभळे, प्रभा अवलेलू, कविता डाडर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक मस्के यांनी तर आभार महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस संजय आल्हाट यांनी मानले.



**सन्मान महिलांचा आणि कार्यकतृत्त्वाचा...! :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषद या संघटनेतर्फे शिवसन्मान पुरस्कार-2025 प्रदान करण्यात आले. माजी विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना दैनिक राष्ट्र संचार च्या वरिष्ठ उप संपादक सारिका रोजेकर.

# सुनियोजित व सुंदर शहरांसाठी 'डिझाईन' महत्त्वपूर्ण

## नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे प्रतिपादन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहर वेगाने विकसित होण्यासह सर्वच दिशांनी विस्तारत आहे. त्यामुळे नगरनियोजनासोबत शहरातील बांधकामांचे, सार्वजनिक तसेच खासगी आस्थापनांचे डिझाईन अतिशय महत्त्वाचे आहे. शहर नियोजन आणि डिझाईन या संदर्भातील प्रयत्नांना राज्य सरकार पाठिंबा देईल," असे प्रतिपादन राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले.

आर्किटेक्चर, एन्व्हायर्नमेंट, इंटेरियर डिझाईन, टाऊन प्लॅनिंग व अर्बन डिझाईन क्षेत्रात कार्यरत पुण्यातील व्हीके ग्रुपच्या वतीने ५१ व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित 'व्हीकलेक्टिव्ह-बिल्डिंग द सिटी वि कॉल होम' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन माधुरी मिसाळ यांच्या हस्ते झाले. घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात झालेल्या कार्यक्रमात आमदार सिद्धार्थ शिरोळे, व्हीके ग्रुपचे संस्थापक विश्वास कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक ऋषिकेश कुलकर्णी, अनघा परांजपे-पुरोहित, अपूर्वा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी मगरपट्टा सिटी कॉर्पोरेशनचे प्रतीक मगर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, पीएनजी ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ, सवाई गंधर्व महोत्सवाचे संचालक मुकुंद संगोराम व केपीआयटी कमिन्सचे रवी पंडित यांना 'लीडर्स ऑफ चेंज'ने सन्मानित करण्यात आले. राजा रवी वर्मा आर्ट गॅलरीत व्हीके ग्रुपने गेल्या ५० वर्षांत साकारलेल्या आकर्षक, नाविन्यपूर्ण व वास्तुकलेच्या डिझाईन्स व प्रकल्पाच्या संग्रहाचे प्रदर्शन पाहण्याची संधी पुणेकरांना यानिमित्ताने मिळणार आहे.

"व्हीके ग्रुपच्या माध्यमातून गेली ५० वर्षे सातत्याने पुण्यासह इतरत्रही उत्तम दर्जाच्या इमारती, आरेखन, पर्यावरणपूरक बांधकामे असे कार्य सातत्याने सुरू आहे.
सलग पाच दशके असे योगदान देणे, ही महत्त्वाची बाब असून, त्यासाठी व्हीके ग्रुप अभिनंदनास पात्र आहे. आज इथे सन्मानित विविध क्षेत्रातील मान्यवर पुणेकरांचे 'कलेक्शन' सादर केले आहे. पुण्याच्या सर्वांगीण विकासात त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे," अशा शब्दात माधुरी मिसाळ यांनी कौतुक केले. 'पुणे हे सर्व क्षेत्रांत अतुलनीय भरारी घेणाऱ्या प्रतिभावंतांचे शहर आहे.



## महाशिवरात्रीनिमित्त नागापुरात अखंड हरिनामाला उत्साहात सुरुवात

**रांजणी :** महाशिवरात्रीनिमित्त नागापूर (ता. आंबेगाव)येथील ग्रामदैवत श्री. नागेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाला गुरुवारी (दि.२०) रोजी उत्साहात सुरूवात झाली आहे.नागेश्वर मंदिरावर ग्रामस्थांनी आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. रात्रीच्या वेळी या मंदिराचे प्रतिबिंब शेजारील मीना नदी पात्रात उमटत आहे.

ग्रामदैवत श्री. नागेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षीप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.या अखंड हरिनाम सप्ताहात सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प संतोष महाराज बढेकर, बाबा महाराज खामकर, भरत महाराज थोरात, राजाराम महाराज शिर्के, दत्तात्रय महाराज माशेरे, राजाराम महाराज काटे, महाशिवरात्रीनिमित्त गुरुवार (दि.२७ ) ह. भ . प .भागवत महाराज साळुंखे यांचे सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे कीर्तन होणार आहे.

## न्हावरेत वर्कशॉपमध्ये कामगाराच्या गंभीर दुखापत

कामगाराला सुरक्षिततेची साधने न पुरवल्याने मालकांवर गुन्हा

**शिक्रापूर :** न्हावरे ता. शिरुर येथील व्यंकटेश पॉलीमर वर्कशॉपमध्ये कामगाराला सुरक्षिततेची साधने न पुरवल्याने कामगाराचा हात मशीन मध्ये अडकून गंभीर दुखापत झाल्याची घटना घडल्याने वर्कशॉप मालक स्वाती प्रकाश बोरकर, राहुल कदम व नरेंद्र पठारे यांच्या विरुद्ध शिरुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

न्हावरे ता. शिरुर येथील व्यंकटेश पॉलीमर वर्कशॉपमध्ये मोल्डिंग मशीनवर साहिल गोगावले हा काम करत असताना मशीनचा आवाज येत असल्याने त्याने मशीन नादुरस्त झाल्या बाबतची माहिती कंपनी व्यवस्थापकांना दिली मात्र त्यांनतर देखील तशाच पद्धतीने मशीन चालू ठेवले गेली, दरम्यान कामगारांना सुरक्षिततेची कोणतीही साधने दिली गेली नाही, काम सुरु असताना मशीन बंद होऊन साहिल गोगावलेच्या उजव्या हाताचा पंजा मशिनमध्ये अडकून अपघात होत हाताला गंभीर दुखापत झाली, त्यांनतर साहिलला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

## प्रा. जितेंद्र शिंदे यांना पीएचडी प्रदान

**सासवड :** पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव



उरसळ कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च सेंटर खराडी पुणे येथील फार्मास्युटिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. जितेंद्र शिंदे यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम युनिव्हर्सिटी इंदोर येथून पीएचडी पदवी संपादन केली.

त्यांनी डिझाईन डेव्हलपमेंट अँड कॅरेक्टरायझेशन ऑफ मायक्रोस्पोंज जेल ऑफ सम अँटीफंगल एजंट्स या विषयावर शोधनिबंध सादर केला. गेली सोळा वर्षापासून ते अध्यापन क्षेत्रात कार्यरत असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त पीजी गाईड आहेत. त्यांनी 52 विद्यार्थ्यांना एम फार्मसी करिता मार्गदर्शन केले आहे. त्यांचे विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकांमध्ये 40 रिसर्च पेपर्स प्रसिद्ध झालेले आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अजित पवार, मानद सचिव संदीप कदम उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक भोसले यांनी अभिनंदन केले.

## मॉर्निंग वॉकला आलेल्याला कुकरीच्या धाकाने लुटले

### कोरेगाव भिमात पहाटेच्या सुमारास खळबळजनक घटना

**शिक्रापूर :** वढू बुद्रुक ता. शिरुर येथील कोरेगाव भीमा ता. शिरुर अश्विन टोपनो हे त्यांच्या साथीदारासोबत पहाटेच्या सुमारास कोरेगाव ते वढू बुद्रुक रस्त्याने मॉर्निंग ऑकसाठी आलेले असताना अलआमीन कॉलेजच्या रस्त्याजवळ तिघे युवक तोंडाला मास्क लावून दुचाकीहून आले त्यांनी अश्विन यांना कोरेगाव कोठे आहे असे म्हणत दुचाकीवर पाठीमागे बसलेल्या युवकाने कमरेला लावलेली कुकरी काढून अश्विन यास कुकरीचा धाक दाखवत त्याच्या हाताच्या बोटातील अंगठी काढून घेऊन तिघेजण कोरेगाव भीमा बाजूकडे पळून गेले, याबाबत अश्विन रश्मी टोपनो वय ४५ वर्षे रा. वढू बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी अज्ञात तिघा युवकांवर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे हे करत आहे.

# महापुरुषांचे विचार अंगीकारावे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** दिनांक १९ फेब्रुवारी रोजी, मदनवाडी येथे गिरीराज हॉस्पिटल बारामती व पद्मा क्लिनिक संचलित मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे आयोजन हर्षवर्धन ढवळे मित्रपरिवार यांनी केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन भगवानराव भरणे प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष सौ अनुष्का अनिकेत भरणे यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होत्या







यावेळी ज्येष्ठ नेते प्रकाश बापू ढवळे, हनुमंत बंडगर, तुकाराम बंडगर, नानासाहेब बंडगर, आबासाहेब देवकाते, अण्णासो धवडे,हेमाताई माडगे, सचिन बोगावत, अॅड पांडुरंग जगताप,प्रदीप वाकसे, धनंजय थोरात, दादासाहेब थोरात, रणजीत निकम,नारायण बंडगर, सतिश बंडगर, इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी हनुमंत बंडगर, तुकाराम बंडगर, नानासाहेब बंडगर,राजाभाऊ देवकाते,सचिन बोगावत,सीमाताई काळंगे इत्यादी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना हर्षवर्धन ढवळे यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या उद्घाटक अनुष्का ताई भरणे यांनी शिवजयंतीच्या पवित्र दिवशी कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले भविष्यातील प्रत्येक सामाजिक कार्यात पाठीशी राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शिबिरात विविध प्रकारच्या आरोग्य तपासण्या, वैद्यकीय सल्ला, तसेच औषधांचे वितरण मोफत करण्यात आले.

शिबिरात सहभागी होणाऱ्यांना तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली आणि काही आरोग्य समस्यांसाठी योग्य उपचार आणि सल्ला दिला. रक्तदाब, मधुमेह, कोलेस्ट्रॉल अशा अनेक सामान्य आरोग्य समस्यांसाठी तपासणी करण्यात आली. याशिवाय, सर्दी, ताप, खोकला यासारख्या संसर्गजन्य आजारांच्या वेळी काय काळजी घ्यावी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरात २०० पेक्षा अधिक लोकांनी सहभाग घेतला, विशेषत ग्रामीण भागातील नागरिकांनी याचा लाभ घेतला. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, याप्रमाणे मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन भविष्यातही करत राहण्याचा विचार आहे, जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना आरोग्याच्या सुसंस्कृत सेवा मिळू शकतील.

स्थानिक रहिवाश्यांनी या शिबिराचे कौतुक केले असून, शिबिराच्या आयोजकांचे आणि डॉक्टरांचे आभार मानले. लोकांसाठी अशी सुविधा एक महत्त्वाची पाऊल आहे, ज्यामुळे आरोग्याच्या बाबतीत असलेल्या अडचणींवर मात केली जाऊ शकते. या शिबिरामुळे स्थानिक समाजाच्या आरोग्य विषयक जागरूकतेत वाढ झाली असून, आरोग्यसेवा अधिक सुलभ आणि सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या प्रकारच्या उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन खरेदी विक्री संघाचे संचालक विष्णुपंत देवकाते यांनी केले व आभार प्रमोद कुमार कुदळे गुरुजी यांनी मानले.

कार्यक्रमाचे नियोजन संजय बंडगर, विशाल धुमाळ ,अरविंद देवकाते ,दिनेश भोईटे ,गोपाळ ढवळे ,राहुल ढवळे, अजित शिंदे,हेमंत निकम,गौरव ढवळे ,अविनाश ढवळे इत्यादी सहकाऱ्यांनी केले.

# वाशी ते अवसरी मार्गे जांबुत एसटी सुरू

## आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील प्रवाशांना होणार फायदा !!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील प्रवाशांच्या मागणीचा विचार करून पनवेल आगाराने वाशी ते अवसरी मार्गे पारगाव,पिंपरखेड,जांबुत,मुक्कामी एसटी बस शुक्रवार( दि.२१)पासून सुरु केली आहे.अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, गावडेवाडी, निरगुडसर या मार्गे बस सुरू झाल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त केले असून बसचे चालक,वाहक यांचा अवसरी बुद्रुक,अवसरी खुर्द ग्रामस्थांच्या वतीने शाल,श्रीफळ देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला आहे.नवीन सुरू झालेल्या एसटी बसचा लाभ सर्व प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन पनवेल आगार प्रमुख डॉ.सुहास चौरे यांनी केले आहे.



आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अवसरी खुर्द, गावडेवाडी,अवसरी बुद्रुक,मेंगडेवाडी,निरगुडसर,पारगाव आदी गावातील अनेक कुटुंबीय वाशी,नवी मुंबई,घाटकोपर, पनवेल येथे नोकरी,उद्योग व्यवसायानिमित्त वास्तव्यास आहे. या कुटुंबांची गावाला नेहमी ये-जा चालू असते.त्यामुळे या गावांमधून वाशी पनवेल अवसरी मार्गे जांबुत मुक्कामी एसटी बस सुरू व्हावी अशी मागणी राज्याचे माजी सहकार मंत्री तथा विद्यमान आमदार दिलीप वळसे पाटील व आरोग्य मंत्र्यांचे खाजगी स्विय सहायक मंगेश शिंदे यांच्याकडे अवसरी ग्रामस्थांनी केली होती.त्यांच्या मागणीचा विचार व गरज ओळखून स्वीय सहायक मंगेश शिंदे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे स्वीय सहायक ज्ञानेश्वर वसेकर यांच्याशी संपर्क करून वाशी ते अवसरी मार्गे जांबुत एसटी बस चालू करण्यासाठी सांगितले.त्यानंतर विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे,पनवेल आगार प्रमुख डॉ.सुहास चौरे, दत्तात्रय दिघे यांनी तातडीने शुक्रवारपासून पनवेल आगाराच्या वतीने वाशी ते अवसरी मार्गे जांबुत एसटी बस चालू केली आहे.ही एसटी बस वाशीवरून दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी सुटून तळेगाव,चाकण,मंचर,अवसरी, निरगुडसर,पारगाव,पिंपरखेड मार्गे रात्री ८ वाजून ३० मिनिटांनी जांबुत येथे मुक्कामी असणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजून ३० मिनिटांनी जांबुत वरून निघून अवसरी बुद्रुकला ७ वाजून १५ मिनिटांनी येईल मंचर,चाकण मार्गे दुपारी बारा वाजता वाशीला पोहोचेल.नव्याने सूरू झालेल्या या एसटी बसचा लाभ आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे यांनी केले आहे.

दरम्यान पनवेल आगाराची सुरू झालेली नवीन वाशी ते जांबुत एसटी बस प्रथमच अवसरी मार्गे आली असता अवसरी खुर्द येथे सरपंच वैभव वायाळ,उपसरपंच प्रवीण भोर,संचालक आनंदराव शिंदे,मयूर पतसंस्थेचे चेअरमन हरिदास रामवत,ग्रामविकास अधिकारी शिदोरे यांच्या हस्ते बसचे चालक ए.बी.वरे व वाहक जी.बी.केदारी यांचा सत्कार करण्यात आला.तसेच अवसरी बुद्रुक येथेहि सरपंच सारिका हिंगे,उपसरपंच अनिल हिंगे, ग्रामपंचायत सदस्य प्रशांत वाडेकर, प्रकाश जाधव यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन वाहक व चालक यांचा सत्कार करण्यात आला.

# कोबी - फ्लॉवरच्या बाजारभावात वाढ होईना?

### कोबी फ्लॉवर चा वापर होतोय चाऱ्यासाठी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** गेले दोन-तीन महिन्यांपासून कोबी फ्लॉवरचे बाजारभाव घसरलेलेच आहेत. त्यामुळे कोबी - फ्लॉवर उत्पादक शेतकरी अडचणित सापडले आहेत. सध्याच्या चारा टंचाईच्या काळात कोबी - फ्लॉवर या पिकांचा उपयोग जनावरांच्या चाऱ्यासाठी सर्रास होताना दिसत आहे.आंबेगाव तालुक्यातील रांजणी परिसरात अनेक कोबी - फ्लॉवरच्या शेतांमध्ये मेंढपाळांचे मुक्काम सध्या दिसत आहेत.

कोबी - फ्लॉवरची पिके ही नगदी पैसे मिळवून देणारी असल्याने तालुक्याच्या पूर्व भागातील सर्वच गावांमध्ये कोबी फ्लॉवरचे पीक मोठ्या प्रमाणावर शेतकरी घेतात. परंतू या पिकांना गेल्या दोन महिन्यांपासून बाजारभावाची साथ मिळत नाही. दोन-तीन रुपये किलो असा बाजारभाव सध्या कोबी फ्लॉवर पिकांना मिळत आहे. हा बाजारभाव पिकांसाठी गुंतविलेल्या भांडवलाच्या तुलनेत अतिशय कमी आहे. यातून गुंतविलेले भांडवल देखील वसुल होत नाही. या उलट पिके काढणीची मजुरी व वाहतूक भाडे देखील शेतकऱ्यांना पदरमोड करून भरावे लागते . यामुळे सध्या कोबी फ्लॉवर उत्पादक शेतकरी सध्या अडचणित सापडले आहेत.

उन्हाळ्यामुळे या परिसरात चारा टंचाई निर्माण झाली आहे. अशा चारा टंचाईच्या काळात कोबी - फ्लॉवर पिकांचा उपयोग आता मेंढपाळ शेळ्या - मेंढ्या, जनावरांसाठी चारा म्हणून सर्रास करू लागले आहेत.जनावरे कोबी फ्लॉवर चे गड्डे खातात.परिसरात दाखल झालेले परप्रांतिय मेंढपाळ आता कोबी फ्लॉवरच्याच शेतांमध्ये शेळ्या मेंढ्यांसह मुक्काम करत आहेत .ते कोबी फ्लॉवरचे गड्डे ट्रॅक्टर ट्रॉलीत भरून जनावरांसाठी घेऊन जाताना दिसत आहेत.

# पहाडदरा येथे ओढा खोलीकरण व रुंदी करणास सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पहाडदरा :** (ता. आंबेगाव ) येथे शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंती निमित्त गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजने अंतर्गत पाझर तलाव,ओढा व नाला खोलीकरण व रुंदीकरण कामांची सुरुवात करण्यात आली. जलसंधारण विभाग व टाटा मोटर्स,नाम फाऊंडेशन यांच्या संयुक्तरीत्या पाझर तलाव,ओढा,नाला खोली करण्यास सुरुवात करण्यात आली. यावेळी खेड विभागाचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी दिपक चव्हाण, जलसंधारण अधिकारी जयेश उगिले,श्रुती बेनिचेटगे,नाम फाउंडेशनचे खलाटे,गणेश बांगर तसेच खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष भगवान वाघ, ग्रामपंचायत सदस्य संकेत वायकर, गुलाब वाघ व मोठ्या संख्येने येथील ग्रामस्थ उपस्थित होते. पहाडदरा हे दुष्काळग्रस्त गाव म्हणून ओळखले जाते.हे गाव पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे.त्यामुळे पावसाच्या पाण्यावर येणारी पिके येथे प्रामुख्याने घेतली जातात.या गावाभौवती डोंगराळ भाग असल्याने जर या परिसरात पाझरतलाव,ओढे, नाले यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण केले तर पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचले जाईल व त्याचा फायदा शेतकर्यांना होईल असे सरपंच मच्छिंद्र वाघ यांनी भ्रमणदूरध्वनीच्या माध्यमातून सांगितले.



**पहाडदरा :** (ता.आंबेगाव )येथे ओढा खोलीकरणास व रूंदीकरणास सुरुवात झाली आहे.

# दोन मैत्रिणींचा अभ्यास आणि 'खाकी'ही सोबतच



## निमगाव म्हांळुंगीतील ऋतुजा भोरडे व कोमल बोकले यांचे यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर या ग्रामीण भागातील ऋतुजा भोरडे व कोमल बोकले या दोघी मैत्रिणींनी खाकी वर्दीचे स्वप्न पाहत सोबत जिद्दीने अभ्यास करत यश मिळवून दोघींनी खाकी वर्दी मिळवली आहे.

निमगाव म्हाळुंगी ता. शिरुर येथील ऋतुजा भोरडे हि युवती शालेय शिक्षणानंतर स्पर्धा परीक्षेच्या हेतूने एका शांत ठिकाण असलेल्या अभ्यासिका मध्ये शिक्षणासाठी जात असताना तिची ओळख येथे अभ्यासासाठी येणाऱ्या निमगाव म्हाळुंगीची सून असलेल्या कोमल बोकले हिच्यासोबत झाली, दरम्यान दोघी देखील खाकी वर्दी मिळवायची हा जिद्दीने अभ्यास करु लागल्या त्यांनतर ऋतुजा हिने शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या वनविभागच्या वनरक्षक पदाची परीक्षा देऊन यश मिळवून वनविभागात रुजू झाली आहे, तर कोमल बोकले हिने यापूर्वी आलेल्या अपयशाला खचून न जाता संसारात रमून आपल्या प्रिशा व ईशान या बालकांसह कुटुंबाची काळजी घेत मुबंई शहर पोलीस दलाच्या परीक्षेला सामोरे जाऊन यश मिळवून आपले खाकी वर्दीचे स्वप्न पूर्ण केले आहे, तर कोमल बोकले हिची गावामध्ये मिरवणूक काढण्यात आलेली असताना ग्रामस्थांनी या दोघी मैत्रिणींचा सन्मान करण्यात आला तर आम्ही सोबत अभ्यास करत असताना एकापाठोपाठ खाकी वर्दिचे स्वप्न पूर्ण करत वेगवेगळ्या खात्यात दाखल झाल्याचा आनंद होत असल्याचे ऋतुजा भोरडे व कोमल बोकले यांनी सांगितले.

**विद्यार्थ्यांनी जिद्दीने अभ्यास केल्यास यश नक्कीच मिळते मात्र येणाऱ्या अपयशाला खचून जायचे नसते, यापुढील काळात शालेय मुलांना योग्य मार्गदर्शन करणार असल्याचे देखील वनरक्षक ऋतुजा भोरडे व पोलीस दलात दाखल झालेल्या कोमल बोकले यांनी सांगितले.**



मुंबईत आगीच्या घटनांचे सत्र सुरुच आहे. मुंबईच्या विमानतळाजवळील एका फाईव्ह स्टार हॉटेलला आग लागल्याची घटना शनिवारी घडली. मुंबईच्या सहारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडल्याने वातावरण भयभीत झाले होते. या आगीच्या घटनेनंतर लोकांची एकच धावाधाव झाली. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले आणि आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

## माजी आरबीआय गव्हर्नर शक्तिकांत दास पंतप्रधानांचे प्रधान सचिव

**दिल्ली :** रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास हे काही दिवसांपूर्वीच सेवानिवृत्त झाले. तोच



त्यांच्यासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. माजी आरबीआय गव्हर्नर शक्तिकांता दास यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रधान सचिव-2 म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा कार्यकाळ पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळासोबतच संपेल. शक्तीकांत दास हे १९८० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. ओडिशाची राजधानी भुवनेश्वर येथील राहणारे ६७ वर्षीय शक्तीकांत दास हे १९८० च्या बॅचचे तामिळनाडू कॅडरचे आयएएस अधिकारी आहेत.

## चीनमध्ये आढळला नवा विषाणू


**चीन :** चिनी संशोधकांच्या एका पथकाने HKU5-CoV-2 नावाचा एक नवीन वटवाघळातील कोरोना विषाणू शोधला आहे. जो मानवांमध्ये संक्रमित होण्याचा सर्वाधिक धोकादायक बनला आहे. हा विषाणू SARS-CoV-2 सारख्याच रिसेप्टरशी बांधला जातो. जो COVID-19 सारख्या आजारासारखा धोका निर्माण करू शकतो. बॅटवुमन म्हणून प्रसिद्ध असलेल्या शी झेंगली यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या टीमने हा नवीन व्हायरस शोधल्याचा दावा केला आहे. झेंगली हे ग्वांगझू लॅबोरटरीचे प्रमुख वायरोलॉजिस्ट असून त्यांचा रिसर्च मंगळवारी सेल जर्नलमध्ये पब्लिश झाला आहे.

## नितेश राणे पुन्हा चर्चेत

**दिल्ली :** फडणवीस सरकारमधील मंत्री आणि भाजपचे फायरब्रँड नेते नितेश राणे हे त्यांच्या



वादग्रस्त विधानांसाठी ओळखले जातात. महाराष्ट्रात मंत्री झाल्यानंतरही हिंदुत्वाचा झेंडा उंचावणारे आणि अल्पसंख्याकांवर सतत शाब्दिक हल्ला करणारे नितेश राणे यांनी पुन्हा एकदा असे विधान केले आहे ज्यामुळे ते पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. नितेश राणे यांनी सनातन बोर्डाच्या स्थापनेची मोठी मागणी केली आहे. ते म्हणाले की, हिंदू मोठ्या संकटाचा सामना करत आहेत, त्यांना वाचवण्यासाठी लवकरच सनातन बोर्डाची स्थापना करावी.



## बुलढाण्यात चक्क अफूची शेती

**बुलढाणा :** राज्यात अनेक ठिकाणी गांजाच्या तस्करी अथवा विक्रीवर कारवाई केली जात असताना बुलढाण्यातही अनेक ठिकाणी गांजाच्या शेतीवर कारवाई झाल्याचे समजते. बुलढाण्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात खळबळ उडवून देणारी कारवाई मध्यरात्री बुलढाणा स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने केली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका शेतकऱ्याने चक्क अफूची शेती केल्याचे समोर आले. पोलिसांनी धाड टाकत तब्बल बारा कोटी साठ लाख रुपयांची अफूची झाडे जप्त केल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी संतोष सानप या शेतकऱ्याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर विविध कलम आणि डी पी एस ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे. अफूच्या शेतीवर धाड टाकल्याची राज्यातील ही सर्वात मोठी कारवाई असल्याचे बोलल जात आहे. अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अंढेरा पोलिसांच्या नाकावर टिच्चून अफूची शेती होत असल्याने अंढेरा पोलिसांच्या कार्यक्षमतेवर आता प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# संकल्पना, कौशल्यातून मराठी पाऊल पुढे

## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**दिल्ली :** संकल्पना, मनुष्यबळ, कौशल्य, झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, एकमेकांना सोबत घेऊन जाण्याची निती, योग्य शिक्षण या सगळ्यांची योग्य मोट बांधली तर राज्याची नव्हे तर देशाची अर्थव्यवस्था ट्रिलीयन इकॉनामीपर्यंत नक्की पोहोचेल, असा विश्वास 'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादात तज्ज्ञांनी व्यक्त केला.

दिल्ली येथील ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिला सत्रात 'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात संपादक पराग करंदीकर, 'केपीआयटी'चे प्रमुख रवी पंडित, 'बीव्हीजी ग्रुप'चे प्रमुख हणमंतराव गायकवाड सहभागी झाले होते. त्यांच्याशी निवेदक प्रसन्न जोशी यांनी संवाद साधला. यशवंतराव चव्हाण सभामंडपातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व्यासपीठावर या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

मराठी पाऊल पडते पुढे याचा अन्वयार्थ काय, त्याचे पडसाद कोणकोणत्या क्षेत्रात पडत आहेत, याविषयी जाणून घेण्यासाठी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

पराग करंदीकर बोलताना म्हणाले, मराठीचा डंका हा केवळ महाराष्ट्रात नव्हे तर महाराष्ट्राबाहेर देखील वाजला पाहिजे. भाषा जेव्हा प्रादेशिक बंध ओलांडून पुढे जाते तेव्हा भाषा-संस्कृती अधिक मोठी होते. त्या अर्थाने आपले पाऊल पुढे पडले आहे. गरज नसलेल्या गोष्टींमध्ये अडकून न राहता ताकद आणि बुद्धी लावून जात, धर्म, पंथ, भाषा यांच्या पलीकडे जाणे गरजेचे आहे.



'मराठी पाऊल पडते पुढे' या परिसंवादात सहभागी रवी पंडित, प्रमुख हणमंतराव गायकवाड, संपादक पराग करंदीकर, प्रसन्न जोशी.

> उद्योग क्षेत्रात भरारी घेताना आपल्या कामात गुणवत्ता राखली पाहिजे. त्यात सर्वोत्कृष्टपणा आणला पाहिजे. कोणत्याही कामाची लाज न बाळगता ते काम सर्वोत्कृष्ट पद्धतीने केले पाहिजे. जगात संधी आहेत; संधींचा शोध घेतला पाहिजे.
>
> **-हणमंतराव गायकवाड**

- १) जगाची गरज आणि आपली शिक्षण पद्धती यात असलेल्या तफावतीमुळे निर्माण झालेली दरी भरून काढणे गरजेचे
- २) जगात संधी खूप आहेत; आपल्याला त्या शोधता आल्या पाहिजेत.
- ३) मराठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे.
- ४) जिद्दीने कष्ट करण्याची तयारी ठेवावी.
- ५) काम करताना आपला देश पुढे जाईल यासाठी ध्येय निश्चित केले पाहिजे.
- ६) गावे सर्वार्थाने समृद्ध, सक्षम झाली पाहिजेत.

### कार्यक्रमाला भावनिक किनार

- बीव्हीजीचे प्रमुख हणमंतराव गायकवाड यांच्या मातोश्री मराठी भाषेच्या शिक्षिका होत्या. त्यांचे नुकतेच निधन झाले आहे. असे असतानाही त्यांना आदरांजली म्हणून गायकवाड साहित्य संमेलनात सहभागी झाले.

# कवी कट्टा म्हणजे साहित्याचे ऊर्जा केंद्र

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांचे प्रतिपादन

महिलांचे साहित्य संमेलन आणि बालकवी संमेलन आयोजित करणे, सर्व कवींना एकत्र आणणारे अखिल भारतीय कवी संमेलन भरवणे, विद्यापीठांच्या धर्तीवर साहित्य विश्वात माजी कवी-सदस्य संकल्पना राबवणे महत्वपूर्ण आहे.



**दिल्ली :** दिल्ली येथे सुरू असलेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी (२३ फेब्रुवारी २०२५) महात्मा ज्योतिराव फुले सभामंडपात "कवी कट्ट्याचे" उद्‌घाटन महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी कवी कट्ट्याचा दहा वर्षांचा प्रवास उलगडून दाखवला आणि मराठी साहित्याच्या संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे समन्वयक राजन लाखे व गोपाळ कांबळे यांनी समन्वयाची जबाबदारी पार पाडली. प्रारंभी राजन लाखे यांच्या प्रास्ताविकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

> "कवी कट्ट्याच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे दरवर्षी मंडपाचा आकार वाढवत न्यावा लागतो, ही अत्यंत आनंदाची बाब आहे."
>
> **-डॉ. नीलम गोऱ्हे,** उपसभापती


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत सौ. शामीन बानू मर्द शरीफ खान, रा. राम आळी, शिरूर, ता. हवेली, जि. पुणे यांच्या खरेदी मालकी हक्काची आहे. सदर मिळकत आमचे अशिलांस कायम खुषखरेदी देण्याचे ठरविले असून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी बोजारहित असल्याचा भरवसाही आमचे अशिलांस दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लीन व कुळ वहिवाट, दावा, साठेखत वा अन्य कोणताही हक्क हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आंत आम्हास लेखी कळवून व आमचे खालील पत्त्यावर येऊन मूळ कागदपत्रे आम्हांस दाखवून व त्याचे सत्यप्रती आम्हास देऊन समक्ष खात्री करून द्यावी अन्यथा सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
परिशिष्ट -: तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका शिरुर, मे. सब रजिस्ट्रार साहेब शिरुर यांचे हद्दीतील तसेच शिरूर नगरपालीका यांचे हद्दीतील सिटी सर्व्हे नं. १११० क्षेत्र १८० चौरस मिटर ही मिळकत यासी चतुः सिमा खालीलप्रमाणे,

**पूर्वेस :** रस्ता
**पश्चिमेस :** रस्ता
**दक्षिणेस :** सिटी सर्व्हे नं. ११११
**उत्तरेस :** सिटी सर्व्हे नं. ११०९
**येणेप्रमाणे जाहिर नोटीस दिली असे,**

शिरुर
दिनांक : २२/०२/२०२५

ॲड. कुणाल रमेश गायकवाड,
बीए. एल.एल. बी.
शिरुर -6261/2023

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५ जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. १०/२०२५/५१७२

**अर्जदार**
अर्बन ब्लिस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स.नं.286/1ड (पैकी), लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे - 411047. तर्फे, अध्यक्ष : श्री. तुकाराम सोनबा डुंबरे, सचिव : श्री. मधुप सांगवीकर

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

विकसक / प्रवर्तक / जागा मालक नं. 1 / जाब देणार नं. 1
1. मे. व्यंकटेश डेव्हलपर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- दुकान क्र.1,ब्लॉक ए, गरीराज कॉम्प्लेक्स, कस्तुरबा हौसिंग सोसायटी, विश्रांतवाडी, पुणे- तर्फे भागीदार, अ. श्री. सचिन दत्तात्रय टिंगरे, ब. श्री. सुजीत दत्तात्रय टिंगरे
जाब देणार नं.2 अ व ब
रा. आदर्श कॉलनी, रोड नं.2, तिरूपती मंगल कार्यालय जवळ, टिंगरेनगर, धानोरी, ता. हवेली, जि. पुणे-
जागा मालक / जाब देणार नं. 2
2. बबन भिकु निंबाळकर, 3. श्री. बाळासाहेब बबन निंबाळकर, 4. श्री. दशरथ बबन निंबाळकर
5. सौ. सिंधुबाई पांडुरंग काटे, 6. सौ. इंदूबाई बबन निंबाळकर, 7. सौ. लक्ष्मीबाई बाळासाहेब निंबाळकर 8. श्री. संदीप बाळासाहेब निंबाळकर, 9. सौ. ज्योती संदीप निंबाळकर, 10. श्री. निलेश बाळासाहेब निंबाळकर 11. श्री. रविंद्र बाळासाहेब निंबाळकर, 12. सौ. संजीवनी दशरथ निंबाळकर, 13. सौ. श्रध्दा योगेश मोरे 14. श्री. गणेश दशरथ निंबाळकर, 15. नम्रता दशरथ निंबाळकर, 16. सुंदराबाई मुरलीधर निंबाळकर 17. श्री. सुरेश मुरलीधर निंबाळकर, 18. अंजना वाल्मिकी कोतवाल, 19. सविता मारूती निंबाळकर 20. पुजा मारूती निंबाळकर, 21. आरती मारूती निंबाळकर, 22. श्री. सुमित मारूती निंबाळकर जा. दे. नं. 2 ते 22 सर्व रा. पत्ता: स.नं. 286/ 1ड (पैकी), लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे - 411047.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये अर्बन ब्लिस सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं.286/ 1ड (पैकी), लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे - 411047 या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. १०/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २२ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते २२ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी **दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा.** जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते २२ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २१/०२/२०२५
शिक्का
**(संजय राऊत)**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५ जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०३ /२०२५ ५५

**अर्जदार**
टॅमरिंड पार्क जी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं.1/13/13/1/1, स.नं. 52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे - 411041 तर्फे, अध्यक्ष: श्री. परीक्षित विवेक द्रविड, सचिव : श्री. गौतम शिंदे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक / जाब देणार नं. 1
1. मे. धनकवडे पोकळे डेव्हलपर्स तर्फे भागीदार
अ. श्री. दादासाहेब मुरलीधर पोकळे, ब. श्री. बाबासाहेब मुरलीधर पोकळे
अनु क्रं. अ व ब रा. मु.पो. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
क. श्री. शिवाजी विठ्ठलराव धनकवडे, ड. श्री. विक्रांत शिवाजी धनकवडे, इ. श्री. अक्षय विठ्ठलराव धनकवडे
अनु क्रं. क ते इ रा. स.नं. 20/2, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे - 411043
2. मे. पी. डी. कंस्ट्रक्शन, तर्फे भागीदार, अ. श्री. बापूसाहेब बाबासाहेब पोकळे, ब. सौ. शारदा बाबासाहेब पोकळे अनु क्रं. अ व ब रा. स.नं. 53 / 1, महादेव मंदीराजवळ, धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
क. श्री. विक्रांत शिवाजी धनकवडे, ड. सौ. वर्षा शिवाजी धनकवडे,
अनु क्रं. क व ड रा. देवई बंगला, 20/2, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे - 411043
( अनु क. 3 ते 17 तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. 1 )
जागा मालक / जाब देणार नं. 2
3. सौ. शुभदा राजेंद्र पोकळे, 4. श्री. राजेंद्र गोपीचंद पोकळे, अनु क्रं. 3 ते 4रा. मु.पो. धायरी, ता. हवेली, पुणे- 5. श्री. बाबासाहेब मुरलीधर पोकळे, 6. श्री. दादासाहेब मुरलीधर पोकळे, 7. सौ. विमल मुरलीधर पोकळे
अनु क्रं. 5 ते 7 रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
8. कु. वर्षा मुरलीधर पोकळे, रा. वाकड, ता. मुळशी, जि. पुणे - 411057.
9. कु. रोहिणी मुरलीधर पोकळे, रा. संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे - 411026
10. सौ. शैला शंकर वाघचौरे, रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
11. सौ. नंदा शांताराम बहिरट, रा. रेजी हिल्स, 5 टाईप, पुणे - 411020
12. सौ. रेखा चंद्रकांत बहिरट, रा. बोपोडी, पुणे - 411009 13. सौ. जयश्री ज्ञानेश्वर काशिद, रा. औंध गाव, पुणे - 411007 14. सौ. स्वाती कैलास रानवडे, रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
15. सौ. राजश्री प्रसाद काशिद, रा. औंध, पुणे - 411007
16. सौ. कल्पना पंढरीनाथ पोकळे, 17. श्री. पंढरीनाथ गोपीचंद पोकळे अनु क. 16 व 17 रा. सर्वे नं. 52/7, धायरी, ता. हवेली, पुणे - 411041 इतर सहकारी संस्था / जाब देणार नं. 3
18. "टॅमरिंड पार्क ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित" 19. "टॅमरिंड पार्क बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 20. "टॅमरिंड पार्क सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 21. "टॅमरिंड पार्क डी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 22. "टॅमरिंड पार्क इ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 23. "टॅमरिंड पार्क एफ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 24. "टॅमरिंड पार्क एच सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 25. "टॅमरिंड पार्क आय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित" 26. "टॅमरिंड पार्क जे सहकारी गृहरचना संस्था मर्यादित "
27. "टॅमरिंड पार्क के, एल, एम, एन, ओ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1/13/11/1/1 (पार्ट) स.नं.52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे - 411041.

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये टॅमरिंड पार्क जी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1/1/1/1/1, स.नं. 52, हिस्सा नं.7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे- 411041 या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ०३/ २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २१/०२/२०२५
शिक्का
**(संजय राऊत)**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५ जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०२/२०२५१५७७६

**अर्जदार**
टॅमरिंड पार्क डी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1 / 1अ / 1अ / 1 /1 (पार्ट), स नं.52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे - 411041
तर्फे, अध्यक्ष : श्री. अर्जुनसिंह सुर्यकांतसिंह राजपूत, सचिव : श्री. अजिंक्य पेशवे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक / जाब देणार नं. 1
1. मे. धनकवडे पोकळे डेव्हलपर्स तर्फे भागीदार
अ. श्री. दादासाहेब मुरलीधर पोकळे, ब. श्री. बाबासाहेब मुरलीधर पोकळे
अनु क्रं. अ व ब रा. मु.पो. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
क. श्री. शिवाजी विठ्ठलराव धनकवडे, ड. श्री. विक्रांत शिवाजी धनकवडे, इ. श्री. अक्षय विठ्ठलराव धनकवडे, अनु क्रं. क ते इ रा. स.नं. 20/2, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे - 411043
2. मे. पी. डी. कंस्ट्रक्शन, तर्फे भागीदार, अ. श्री. बापूसाहेब बाबासाहेब पोकळे, ब. सौ. शारदा बाबासाहेब पोकळे अनु क्रं. अ व ब रा. स.नं. 53 / 1, महादेव मंदीराजवळ, धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
क. श्री. विक्रांत शिवाजी धनकवडे, ड. सौ. वर्षा शिवाजी धनकवडे
अनु क्रं. क व ड रा. देवई बंगला, 20/2, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे - 411043
( अनु क. 3 ते 17 तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. 1 )
जागा मालक / जाब देणार नं. 2
3. सौ. शुभदा राजेंद्र पोकळे, 4. श्री. राजेंद्र गोपीचंद पोकळे, अनु क्रं. 3 ते 4रा. मु.पो. धायरी, ता. हवेली, पुणे - 41. 5. श्री. बाबासाहेब मुरलीधर पोकळे, 6. श्री. दादासाहेब मुरलीधर पोकळे, 7. सौ. विमल मुरलीधर पोकळे अनु क्रं. 5 ते 7 रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
8. कु. वर्षा मुरलीधर पोकळे, रा. वाकड, ता. मुळशी, जि. पुणे - 411057.
9. कु. रोहिणी मुरलीधर पोकळे, रा. संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे - 411026
10. सौ. शैला शंकर वाघचौरे, रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
11. सौ. नंदा शांताराम बहिरट, रा. रेजी हिल्स, 5 टाईप, पुणे - 411020
12. सौ. रेखा चंद्रकांत बहिरट, रा. बोपोडी, पुणे - 411009 13. सौ. जयश्री ज्ञानेश्वर काशिद, रा. औंध गाव, पुणे - 411007 14. सौ. स्वाती कैलास रानवडे, रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
15. सौ. राजश्री प्रसाद काशिद, रा. औंध, पुणे - 411007
16. सौ. कल्पना पंढरीनाथ पोकळे, 17. श्री. पंढरीनाथ गोपीचंद पोकळे अनु क. 16 व 17 रा. सर्वे नं. 52/7, धायरी, ता. हवेली, पुणे - 411041 इतर सहकारी संस्था / जाब देणार नं. 3
18. "टॅमरिंड पार्क ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित"
19. "टॅमरिंड पार्क बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 20. "टॅमरिंड पार्क सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 21. "टॅमरिंड पार्क इ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 22. "टॅमरिंड पार्क एफ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 23. "टॅमरिंड पार्क जी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 24. "टॅमरिंड पार्क एच सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 25. "टॅमरिंड पार्क आय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित"
26. "टॅमरिंड पार्क जे सहकारी गृहरचना संस्था मर्यादित"
27. "टॅमरिंड पार्क के, एल, एम, एन, ओ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1/13/13/1/1 (पार्ट) स. नं. 52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे - 411041

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये टॅमरिंड पार्क डी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं.1 / 1अ / 1 अ/1/1, स.नं. 52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे- 411041 या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ०२/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २१/०२/२०२५
शिक्का
**(संजय राऊत)**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये नोटीस. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ०५ जाहीर नोटीस

मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०१/२०२५ / ५१९३

**अर्जदार**
टॅमरिंड पार्क बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1/13/13/1/1 (पार्ट), स नं. 52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे - 411041
तर्फे, अध्यक्ष: श्री. महादेव दामू निचळ, सचिव : श्री. मयुर बापुराव चोरगे

**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**

प्रवर्तक / जाब देणार नं. 1
1. मे. धनकवडे पोकळे डेव्हलपर्स तर्फे भागीदार
अ. श्री. दादासाहेब मुरलीधर पोकळे, ब. श्री. बाबासाहेब मुरलीधर पोकळे
अनु क्रं. अ व ब रा. मु.पो. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
क. श्री. शिवाजी विठ्ठलराव धनकवडे, ड. श्री. विक्रांत शिवाजी धनकवडे, इ. श्री. अक्षय विठ्ठलराव धनकवडे
अनु क्रं. क ते इ रा. स.नं. 20/2, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे - 411043
2. मे. पी. डी. कंस्ट्रक्शन, तर्फे भागीदार, अ. श्री. बापूसाहेब बाबासाहेब पोकळे, ब. सौ. शारदा बाबासाहेब पोकळे अनु क्रं. अ व ब रा. स.नं. 53 / 1, महादेव मंदीराजवळ, धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
क. श्री. विक्रांत शिवाजी धनकवडे, ड. सौ. वर्षा शिवाजी धनकवडे
अनु क्रं. क व ड रा. देवई बंगला, 20/2, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे-411043
( अनु क. 3 ते 17 तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. 1 )
जागा मालक / जाब देणार नं.2
3. सौ. शुभदा राजेंद्र पोकळे, 4. श्री. राजेंद्र गोपीचंद पोकळे, अनु क्रं. 3 ते 4रा. मु.पो. धायरी, ता. हवेली, पुणे - 41. 5. श्री. बाबासाहेब मुरलीधर पोकळे, 6. श्री. दादासाहेब मुरलीधर पोकळे, 7. सौ. विमल मुरलीधर पोकळे अनु क्रं. 5 ते 7 रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
8. कु. वर्षा मुरलीधर पोकळे, रा. वाकड, ता. मुळशी, जि. पुणे - 411057.
9. कु. रोहिणी मुरलीधर पोकळे, रा. संत तुकाराम नगर, भोसरी, पुणे - 411026
10. सौ. शैला शंकर वाघचौरे, रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041
11. सौ. नंदा शांताराम बहिरट, रा. रेजी हिल्स, 5 टाईप, पुणे - 411020 12. सौ. रेखा चंद्रकांत बहिरट, रा. बोपोडी, पुणे - 411009
13. सौ. जयश्री ज्ञानेश्वर काशिद, रा. औंध गाव, पुणे - 411007 14. सौ. स्वाती कैलास रानवडे, रा. धायरी, ता. हवेली, पुणे - 411041 15. सौ. राजश्री प्रसाद काशिद, रा. औंध, पुणे - 411007
16. सौ. कल्पना पंढरीनाथ पोकळे, 17. श्री. पंढरीनाथ गोपीचंद पोकळे अनु क. 16 व 17 रा. सर्वे नं. 52/7, धायरी, ता. हवेली, पुणे - 411041 इतर सहकारी संस्था / जाब देणार नं. 3
18. "टॅमरिंड पार्क ए सहकारी गृहरचना संस्था मर्यादित "
19. "टॅमरिंड पार्क सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 20. "टॅमरिंड पार्क डी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित" 21. "टॅमरिंड पार्क इ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 22. "टॅमरिंड पार्क एफ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 23. "टॅमरिंड पार्क जी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित" 24. "टॅमरिंड पार्क एच सहकारी गृहरचना संस्था मर्यादित " 25. "टॅमरिंड पार्क आय सहकारी गृहरचना संस्था मर्यादित "
26. "टॅमरिंड पार्क जे सहकारी गृहरचना संस्था मर्यादित"
27. "टॅमरिंड पार्क के, एल, एम, एन, ओ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1/13/1/1/1 (पार्ट) स.नं.52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे - 411041

उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये टॅमरिंड पार्क बी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: स.नं. 53, हिस्सा नं. 1/13/13/1/1 (पार्ट), स.नं. 52, हिस्सा नं. 7, धायरी, ता. हवेली, जि. पुणे- 411041 या संस्थेचे मानीव हस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ०१/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दि. ०६/०२/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेतर्फे ॲड. भार्गवी हिवाळे हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ गैरहजर, गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च सुनावणी दिनांक २७/०२/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते २७ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

पुणे दिनांक : २१/०२/२०२५
शिक्का
**(संजय राऊत)**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



"भारतीय संघात प्रत्येक विभागात मजबूत खेळाडू आहेत. टीम इंडियात असे खेळाडू आहेत जे स्वतःहून सामना बदलू शकतात, परंतु पाकिस्तानकडे असे खेळाडू नाहीत. जर पाकिस्तानला भारताविरुद्ध चांगले खेळायचे असेल, तर त्यांना भारतासारख्या मजबूत खेळाडूंची आवश्यकता आहे." "इतर संघांकडे जरा पाहा,या संघांकडे एडन मार्करामपासून ते ग्लेन फिलिप्सपर्यंत अगदी खालच्या क्रमवारीत दमदार खेळ करणारे खेळाडू आहेत. इतर संघांच्या खेळाडूंची तंदुरुस्ती देखील उत्कृष्ट आहे. अन्य संघांमध्ये ३० चेंडूत ५० धावा करू शकणारे आणि गरज पडल्यास शतक देखील करू शकणारे खेळाडू आहेत. हे संघ वेगळे क्रिकेट खेळत नाहीत. त्यांच्या पद्धती सेट आहेत. पाकिस्तान वाईट क्रिकेट खेळत आहे." "खरं सांगायचं तर, आमच्या खेळाडूंमध्ये परिपक्वतेचा अभाव आहे. धावसंख्या लक्षात ठेवून, सामन्याची परिस्थिती समजून घेऊन खेळणे, जमत नाही. — शोयब अख्तर

# आज भारत-पाकिस्तान सामना

## दुबईच्या मैदानावर टीम इंडिया अजिंक्य : विराटचा जोरदार सराव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दुबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी सामन्याला दणक्यात सुरूवात झाली आहे. पहिल्या तिन्ही सामन्यांमध्ये शतकं पाहायला मिळाली. एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळत आहेत. आता क्रिकेटमधील हायव्होल्टेज सामना म्हणजेच भारत वि. पाकिस्तान सामना खेळवला जाणार आहे. हा सामना आज दुबईमध्ये होणार आहे. दुबईमध्ये दोन्ही संघांचा एकमेकांविरूद्ध रेकॉर्ड कसा आहे, जाणून घेऊया.

भारतीय संघाने बांगलादेशविरुद्ध ६ विकेट्सने विजय मिळवत विजयासह मोहिमेची सुरूवात केली. आता टीम इंडियाचा सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी आज दुबईच्या मैदानावर होणार आहे. या मैदानावर टीम इंडियाचा रेकॉर्ड उत्कृष्ट आहे आणि या मैदानावर बांगलादेश, पाकिस्तान, हाँगकाँग आणि अफगाणिस्तानविरुद्ध सामने खेळले आहेत.




भारतीय संघाने दुबईच्या मैदानावर आतापर्यंत एकूण ७ एकदिवसीय सामने खेळले आहेत, त्यापैकी ६ जिंकले आहेत आणि एक सामना बरोबरीत राहिला आहे. या मैदानावर टीम इंडियाला एकदिवसीय क्रिकेटमध्ये पराभवाचा सामना करावा लागला नाही आणि भारताने सर्व प्रतिस्पर्धी संघांना पराभूत केले आहे.

भारताने दुबईच्या मैदानावर पाकिस्तानविरुद्ध दोन एकदिवसीय सामने खेळले असून दोन्ही सामने जिंकले आहेत. दोन्ही संघांमधील हे सामने एकदिवसीय आशिया चषक २०१८ मध्ये खेळले गेले. एका सामन्यात भारताने ८ विकेट्सने तर दुसऱ्या सामन्यात ९ विकेटने विजय मिळवला होता. आता ७ वर्षांनंतर दोन्ही संघ पुन्हा एकदा दुबईच्या मैदानावर एकदिवसीय सामना खेळणार आहेत.

भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांकडे स्टार खेळाडू आहेत, जे अवघ्या काही चेंडूंमध्ये सामन्याचा रोख बदलू शकतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हायव्होल्टेड सामना असतो. फक्त भारत पाकिस्तान नाही सर्वच संघांचे चाहते हा सामना पाहत असतात. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानी संघाची सुरुवात खूपच खराब झाली होती. त्यांना पहिल्याच सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध ६० धावांनी पराभव पत्करावा लागला होता. दुसरीकडे, पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने बांगलादेशवर ६ विकेट्सने विजय मिळवला होता.

### विराट वेळेच्या ९० मिनिटे आधी सरावाला पोहोचला

- भारत-पाकिस्तान मेगा मॅचपूर्वी, स्टार फलंदाज विराट कोहली नियोजित वेळेच्या ९० मिनिटे आधी सरावासाठी पोहोचला. त्याने स्थानिक गोलंदाजांसोबत सराव केला. भारत उद्या दुपारी २:३० वाजता पाकिस्तानविरुद्ध सामना खेळेल.
- शनिवारी, कोहली दुबई स्टेडियमवर सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायरसह कारमधून मैदानावर येताना दिसला. भारताचा सराव वेळ दुपारी २:३० वाजता निश्चित करण्यात आला होता, पण कोहली सकाळी ११:३० वाजता मैदानावर पोहोचला. रिपोर्ट्सनुसार, कोहली स्थानिक नेट गोलंदाजांसोबत सराव करताना दिसला. तो ऑफ स्टंपच्या बाहेरील चेंडूंवर सातत्याने ड्राइव्ह खेळत असे. विराटसोबत अभिषेक नायरनेही त्याच्या बचावावर काम केले.

## मुंबई इंडियन्सचा रोमांचक विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** महिला प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सने गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर ४ विकेट्सनी रोमांचक विजय मिळवला. शुक्रवारी रात्री शेवटच्या षटकापर्यंत चाललेल्या सामन्यात एक चेंडू शिल्लक असताना संघाने ६ विकेट गमावून १६७ धावांचे लक्ष्य गाठले. कमलिनीने एकता बिश्तच्या चेंडूवर चौकार मारून विजय मिळवून दिला.

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबईची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरू संघाने २० षटकांत ७ गडी गमावून १६७ धावा केल्या. अमनजोत कौरला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. तिने ३४ धावांची नाबाद खेळी केली. तसेच ३ विकेट घेतल्या. या विजयासह, मुंबई पॉइंट्स टेबलमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आली आहे. संघाने सलग दुसरा विजय मिळवला आहे. त्याच वेळी, पराभवानंतरही बंगळुरू संघ अव्वल स्थानावर आहे. दोन्ही संघांच्या खात्यात ४-४ गुण आहेत. बंगळुरूचा नेट रन रेट मुंबईपेक्षा चांगला आहे.

## आरव, साद, अभिजीत, मुर्तझा यांचा उप-उपांत्यपुर्व फेरीमध्ये प्रवेश



**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयर्डस आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) तर्फे आयोजित स्नुकर (१५-रेड) मानांकन स्पर्धेत १४ वर्षीय आरव संचेती, साद सय्यद, अभिजीत रानाडे आणि मुर्तझा अझदार या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून स्पर्धेच्या उप-उपांत्यपुर्व फेरीमध्ये प्रवेश केला. कोथरूड येथील क्यु स्टीक क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेच्या मुख्य ड्रॉच्या दुसऱ्या फेरीमध्ये १४ वर्षीय आणि युवा खेळाडू आरव संचेती याने सौरभ जाधव याचा ४४-११, ४९-२९, ६३-४४ असा एकतर्फी पराभव करून आपल्या गुणवत्तेला साजेसा विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यामध्ये साद सय्यद यानेखलील अहमद २२-५९, ७९-०३, ७२-१५, ६४-२८ असा पराभव करून अंतिम १६ खेळाडूंमध्ये प्रवेश केला. डेक्कन जिमखानाच्या अभिजीत रानाडे याने कार्तिक दिवेदी याचे आव्हान ३४-५९, ७०-१६, ७०-०८, ७०-३७ असे संपुष्टात आणले. मुर्तझा अझदार याने अमरदीप घोडके याचा ६३-३२, ३४-६८, ५७-३६, ६७-१८ असा पराभव आगेकूच केली.

## एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे 'समिट-२०२५' क्रीडास्पर्धा


**पुणे :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे १८वी राष्ट्रीय पातळीवरील आंतर-विद्यापीठ व महाविद्यालय 'समिट-२०२५' या क्रीडास्पर्धेचे मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५ ते शनिवार, दि.१ मार्च २०२५ पर्यंत आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २००४ पासून घेण्यात येत आहेत. सर्वसाधारणपणे अभियांत्रिकी बरोबर अन्य शाखेतील विद्यार्थांना त्यांच्या अभ्यासक्रमामुळे विद्यापीठाच्या क्रीडा स्पर्धा व इतर स्पर्धांमध्ये सहभागी होण्यास अडचणी येतात. त्यामुळे बहुतांशी विद्यार्थ्यांना इच्छा असूनही व क्रीडा नैपुण्य असूनही त्यांना क्रीडा कौशल्य दाखविण्याची संधी मिळत नाही. ही निकड दूर करण्यासाठी एमआयटी संस्था गेली १८ वर्षे समिट क्रीडा स्पर्धाचे आयोजन करत आलेली आहे. सर्वप्रथम २००४ साली स्पर्धेची सुरूवात झाली, २००७ सालापासून सातत्याने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेचे उद्घाटक म्हणून याआधी व्ही.व्ही.एस. लक्ष्मण, सुशील कुमार, विजेंदर सिंग, मेरी कोम, दिलीप वेंगसरकर, इरफान पठाण, योगेश्वर दत्त, चेतेश्वर पुजारा, बायचुंग भुतिया, पी.आर.श्रीजेश, रेहान पोंचा व रंजन सोढी हे लाभले होते. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सायं ५.०० वा. एमआयटी डब्ल्यूपीयूच्या क्रीडांगणावर होणार आहे. या समारंभासाठी अर्जुन पुरस्कार सन्मानीत व पॅरा ऑलम्पिक सुवर्ण पदक विजेते श्री.मुरलीधर पेठकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. ही स्पर्धा एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात संपन्न होत आहे. या समारंभात क्रीडा क्षेत्रात भरीव कामगीरी केल्याबद्दल ऑलम्पिकमध्ये हॉकी खेळात अद्वितीय खेळी खेळल्याबद्दल अर्जुन पुरस्कार विजेत्या रेखा भिडे यांना एमआयटी-डब्ल्यूपीयू क्रीडा महर्षि पुरस्कार तसेच, ज्युडो खेळातील शिवछत्रपती पुरस्कार सन्मानीत योगेश धाडवे यांना एमआयटी-डब्ल्यूपीयू क्रीडा आचार्य पुरस्कार प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेमध्ये क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धीबळ, कबड्डी व ई स्पोर्टस अशा एकूण ९ क्रीडाप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी एकूण ११ लाख रुपयांची बक्षिसे व प्रशस्तीपत्रके दिली जातील. सर्व साधारण विजेत्या संघाला रोख बक्षिस व करंडक दिले जाईल. प्रत्येक क्रीडाप्रकारातील विजेत्या संघाला करंडक, सुवर्ण पदक व रोख पारितोषिक देण्यात येईल. याखेरीज उपविजेत्या संघाला करंडक, रौप्य पदक व रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार, दि.१ मार्च २०२५ रोजी सायं ४.०० वा. माईर्स एमआयटी, पुण्येच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात होणार आहे. या समारंभासाठी कुस्ती खेळासाठी अर्जुन अवार्ड आणि द्रोणाचार्य पुरस्कार सन्मानीत पै. सुजीत मान हे अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## ब्रँडन होल्ट, खुमोयुन, ॲलेक्सिस, दलिबोर यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) यांच्या वतीने व क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र सरकार, पीएमसी, पीसीएमसी आणि पीएमडीटीए यांच्या संलग्नतेने आयोजित पीएमआरडीए पुरस्कृत महा ओपन एटीपी चॅलेंजर १०० पुरुष टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये उपांत्यपूर्व फेरीत ब्रँडन होल्ट, खुमोयुन सुलतानोव, ॲलेक्सिस गॅलार्नौ, दलिबोर सेव्हर्सिना यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. दुहेरीत भारताच्या जीवन नेद्दुचेझियान व विजय सुंदर प्रशांत या जोडीचा अंतिम फेरीत प्रवेश केला.

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील टेनिस संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत सहाव्या मानांकित अमेरिकेच्या ब्रँडन होल्टने अव्वल मानांकित ग्रेट ब्रिटनच्या बिली हॅरिसचा ४-६, ६-३,




६-४ असा पराभव करून सनसनाटी निकालाची नोंद केली. हा सामना 1 तास ५९ मिनिटे चालला. सामन्यात पहिल्या सेटमध्ये बिलीने ब्रँडनची दहाव्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट ६-४ असा जिंकून आघाडी मिळवली. दुसऱ्या सेटमध्ये पिछाडीवर असलेल्या ब्रँडनने जोरदार कमबॅक करत आठव्या गेममध्ये बिलीची सर्व्हिस भेदली व स्वतःची सर्व्हिस राखत हा सेट ६-३ जिंकून सामन्यात बरोबरी साधली. तिसऱ्या व निर्णायक सेटमध्ये ब्रँडनने सुरेख खेळ करत बिलीला कमबॅक करण्याची फारशी संधी दिली नाही.

## बॅडमिंटन स्पर्धेत शौर्य सातव, अर्चित खानदेशे, विहा गुरव, सिद्धी जगदाळे, नितीन एस यांची आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टू एल्व्हस क्राफ़्टेड सोल्युशन्स आयोजित टू एल्व्हस क्राफ़्टेड सोल्युशन्स पुरस्कृत योनेक्स सनराईज शटल चॅम्प्स बॅडमिंटन स्पर्धेत उपांत्य फेरीत शौर्य सातव, अर्चित खानदेशे, विहा गुरव, सिद्धी जगदाळे, नितीन एस यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

डेक्कन जिमखाना व पीडीएमबीए बॅडमिंटन हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत ९ वर्षाखालील मुलांच्या गटात बिगरमानांकीत शौर्य सातव याने अव्वल मानांकित प्रयाण महाशब्देचा १३-१५, १५-१०, १५-०८ असा तीन सेटमध्ये पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. मल्हार भोसलेने शिवांश नाडगोंडेवर ०८-१५, १५-०८, १५-०९ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला. ११ वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित अर्चित



खानदेशेने चौथ्या मानांकित शौनक केळकरचा १५-०२, १५-०८ असा तर, तिसऱ्या मानांकित कृष्णा सावंतने दुसऱ्या मानांकित कबीर देसाईचा १५-०९, १५-१२ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

याच मुलींच्या गटात अव्वल मानांकित कियारा साखरेने चौथ्या मानांकित काशवी सिंगला 15-०३,१५-०८ असे पराभूत केले. दुसऱ्या मानांकित विहा गुरवने आराध्या डोंगरेचे आव्हान १५-१३, ११-१५, १५-१३ असे मोडीत काढले.

१५ वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित सिबतेनरझा सोमजीने यश हांडेला १५-०४, १५-०६ असे नमविले. दुसऱ्या मानांकित जीवराज पाटीलने अवधूत कुंभारचा १५-१०, १५-०८ असा पराभव केला. मुलींच्या गटात तिसऱ्या मानांकित सिद्धी जगदाळेने अव्वल मानांकित स्वराली थोरवेवर १५-०४, १७-१५ असा विजय मिळवला. बिगरमानांकित मौसम माने पाटीलने दुसऱ्या मानांकित शिवांजली कर्दीलेचे आव्हान १५-११, ११-१५, १५-१३ असे संपुष्टात आणले..

## सेंट पॅट्रिक्स 'अ' संघाने जिंकली सेंट व्हिन्सेंट ज्युनियर हॉकी लीग




**पुणे :** सेंट पॅट्रिक्स 'अ' संघाने सांघिक कामगिरीमध्ये कमालीचे सातत्य राखताना सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीगच्या हॉकी २०२४-२५ स्पर्धेचे जेतेपद पटकावले. सेंट व्हिन्सेंट एचएस मैदानावर झालेल्या स्पर्धेत सेंट पॅट्रिक्सने (१४ गुण - ४ विजय, २ अनिर्णित) एका गुणाच्या फरकाने अव्वल स्थान पटकावले. लोयोला 'ब' संघाला (१३ गुण - ४ विजय, १ पराभव, १ अनिर्णित) दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. यजमान सेंट व्हिन्सेंट 'अ' संघाला (१२ गुण - ३ विजय, ३ अनिर्णित) तिसरे स्थान मिळाले. लीगच्या शेवटच्या आठवड्यामध्ये (सहावा आठवडा) अमेय गरडच्या (३) सर्वोत्तम कामगिरीच्या जोरावर लॉयोला 'अ' संघाने दस्तूरचा ६-० असा पराभव केला. त्याला आहिल पठाण (२) आणि शौर्य मोजे (१) यांची चांगली साथ लाभली. अन्य सामन्यात सेंट व्हिन्सेंट 'अ' संघाने लोयोला 'ब' संघाला २- १ असे पराभूत केले. यजमान सेंट व्हिन्सेंटसाठी क्लाईड अँड्रयूज आणि जोहान शेख आणि लोयोला 'ब' संघाकडून मार्क दासने गोल केला. त्यानंतर, प्रमुख पाहुणे रेव्ह. फादर डॉ. केनेथ मिस्किटा यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी जेनएसतर्फे सिनियर मॅरेथॉनचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी येत्या रविवारी २३ फेब्रुवारी २०२५ रोजी जेनएस लाईफने रनिंग इव्हेण्ट सिम्पल स्टेप्स एजलेस वंडर वॉक एन जॉगच्या चौथ्या पर्वाची घोषणा केली आहे. नॉन- कॉम्पीटिटिव्ह ३ किमी फन रन आणि कॉम्पीटिटिव्ह ५ किमी व १० किमी रेसेस्. विशेष 'ॲथलीट ऑन व्हील्स 39; श्रेणी विकलांग सहभागींना सहभागी होता येणार आहे.

या मॅरेथॉनबाबत अधिक माहिती देताना जेनएस लाइफच्या संस्थापिका मीनाक्षी मेनन म्हणाल्या, "सिम्पल स्टेप्स एजलेस वंडरमध्ये प्रत्येक फिनिशरमध्ये मानवी उत्साहाची असाधारण



क्षमता आहे. ज्येष्ठ नागरिक फिनिशर्स आहेत. आपल्या प्रत्येकाची आरोग्यदायी व तंदुरूस्त राहण्याची इच्छा आहे. तसेच आपली वाढत्या वयासह येणाऱ्या वेदना व त्रास टाळण्याची देखील इच्छा आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ६० वर्षांहून अधिक वय असलेल्या सहभागींमधील उत्साह मोठा आहे. यंदा आम्हाला जेनएस सारख्या अत्यंत प्रेरणादायी ब्रँडसोबत सहयोग करण्याचा अभिमान वाटतो, जो भारतातील ६० वर्षांहून अधिक वय असलेल्या पिढीला सक्षम करण्याप्रती समर्पित आहे.

स्टेप्स फिटनेसचे संस्थापक आणि बॅडवॉटर १३५ अल्ट्रा मॅरेथॉन फिनिशर आशिष कसोडेकर म्हणाले.

यंदाच्या एडिशनमध्ये अद्वितीय सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले आहेत. जेथे मुंबई व पुण्यातील वरिष्ठ डान्सर्स इव्हेण्टमध्ये परफॉर्म करतील, ज्यामधून चिरस्थायी जीवनाची क्षमता दिसून येईल. या रेससोबत अद्वितीय सेलिब्रेशन देखील असेल, जेथे २२ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या प्री-इव्हेण्ट एक्स्पोमध्ये विंटेज कारचे प्रदर्शन, जुन्या गाण्यांवरील परफॉर्मन्स, हास्य योग सत्रे आणि सर्वसमावेशक आरोग्य कार्यशाळांचा समावेश आहे.

सहभागींना फिनिशर मेडल्स, ई-सर्टिफिकेट्स आणि गूडी बॅग्ज, तसेच ६०-६४ वर्ष ते ८५ वर्षांहून अधिक वय अशा विविध वयोगटांमध्ये स्पेशल बक्षीसे मिळतील. या इव्हेण्टमध्ये स्पर्धा व समुदायासोबत रनर्ससाठी टाइम चिप ट्रॅकिंग सारखी वैशिष्ट्ये आणि समर्पित रिफ्रेशमेंट स्टेशन्स आहेत.

नोंदणी www.townscript.com/e/simple-steps-ageless-wonder-walknjog-edition-4 या वेबसाइटच्या माध्यमातून सुरू आहे.

## स्केल अप क्रिकेट अ संघाची विजय क्रिकेट अकादमीवर मात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** थर्ड आय स्पोर्टस अँड इव्हेंटस एलएलपी यांच्या वतीने आयोजित थर्ड आय १३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत दक्ष राज(१३३ धावा व ३-९) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर स्केल अप क्रिकेट अकादमी अ संघाने विजय क्रिकेट अकादमीवर २८ धावांनी विजय मिळवला.

भुकुम येथील मानसाके जिमखाना क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत दुसऱ्या सामन्यात श्रोत मराठे ३२ धावा व ४-२१) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर पुनीत बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी (पीबीकेजेसीए) संघाने स्केल अप अ संघावर १३ धावांनी विजय मिळवला.





## बुद्धिबळ स्पर्धेत एकुण २०० खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कुंटे चेस अकादमी आणि कुमार पॅसिफिक मॉल यांच्या सहकार्याने आयोजित दुसऱ्या कुमार पॅसिफिक मॉल व कुंटे चेस अकादमी पुरस्कृत विविध वयोगटातील एकदिवसीय रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत जिल्ह्यातून एकुण २०० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा कुमार पॅसिफिक मॉल, ग्राउंड फ्लोअर, सेव्हन लव्ह चौक, पुणे येथे रविवार, २३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे.

स्पर्धेच्या संचालिका मृणालिनी कुंटे यांनी सांगितले की, हि स्पर्धा पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या मान्यतेखाली होत आहे. तसेच, हि स्पर्धा स्विस लीग पद्धतीने सात



फेऱ्यांमध्ये खेळविण्यात येणार आहे. पुण्यात बुद्धिबळ खेळाचा प्रसार व्हावा याहेतूने कुमार पॅसिफिक मॉलने या स्पर्धेसाठी ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

स्पर्धेत २०० खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा चार गटात होणार असून यामध्ये वरद मुळ्ये (१५०५), विवान चिटणीस (१५३०), एकांश शर्मा (१५०३), युग बर्दिया (१६६५), मार्मिक शाह (१५६७), अमेय चौधरी (१७००).यांचा समावेश आहे.

हि स्पर्धा अ गटात (९ वर्षाखालील), ब गटात (११ वर्षाखालील), क गटात(13 वर्षाखालील) आणि ड गटात( १५ वर्षाखालील गट)अशा गटात ही स्पर्धा पार पडणार आहे. स्पर्धेत एकूण ३२,०००/- रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी नितिन शेणवी हे चीफ आरबीटर आणि श्रद्धा विंचवेकर डेप्युटी चीफ आरबीटर म्हणून काम पाहणार आहेत.

### अखिल महाराष्ट्र आंतरक्लब टेनिस स्पर्धेत

## सीसीआय, खार जिमखाना, डेक्कन चार्जर्सचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या वतीने आयोजित नवव्याअखिल महाराष्ट्र आंतरक्लब टेनिस स्पर्धेत साखळी फेरीत क्रिकेट क्लब ऑफ इंडिया(सीसीआय), खार जिमखाना, डेक्कन चार्जर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पीवायसी हिंदू जिमखाना येथील टेनिस कोर्ट या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत



साखळी फेरीत क्रिकेट क्लब ऑफ इंडिया(सीसीआय) संघाने कम्बाईन डिस्ट्रिक्ट ब संघाचा ३२-१७ असा पराभव करून विजयी सलामी दिली. विजयी संघाकडून निखिल संपत, लव कोठारी, विक्रम संपत, इंतिखाब अली, इम्रान युसुफ, धर्मेंद्र शर्मा, गोविंद मोहन, आयुष यांनी सुरेख कामगिरी केली.

दुसऱ्या सामन्यात अजय कामत/अजित सैल, मदन गोखले, नितीन किर्तने, मुकुंद जोशी, मंदार वाकणकर यांच्या सुरेख कामगिरीच्या जोरावर डेक्कन चार्जर्स संघाने कम्बाईन डिस्ट्रिक्ट ब संघाचा ३२-०८ असा पराभव करून शानदार सुरुवात केली. चुरशीच्या लढतीत खार जिमखाना संघाने पीवायसी अ संघाचा २६-२५ असा संघर्षपूर्ण पराभव केला. खार जिमखाना संघाकडून अभिजित एम, अमित तांबे, रोहन गज्जर, अमन कोहली यांनी अफलातून कामगिरी केली.

#रा